१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• पुणे, शुक्रवार २९ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२४९, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 249 Marathi - Daily - Pune, 29 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
मनोज जरांगे पाटील ३० मे पासून पुन्हा आमरण उपोषणावर!
navakal.in
@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

# इन्स्टाग्राम! फेसबुक! व्हॉट्सअ‍ॅप! आता मोफत नाही
# मेटा कंपनीने नव्या फिचरसाठी शुल्क आकारले!

■ कॅलिफोर्निया

**इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप या सर्वांच्या आवडत्या व मोफत असलेल्या सोशल मीडियाला ब्रेक लागणार आहे. याचे कारण म्हणजे त्यांची मालक कंपनी 'मेटा'ने आता इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅपच्या नव्या फिचरसाठी शुल्क आकारले आहे. हे नवे फिचर काही काळाने विकत घ्यावेच लागणार आहेत. त्यामुळे या सोशल मीडियाच्या विशिष्ट नव्या प्रगत फिचर असलेल्या सेवेचा वापर करण्यासाठी दर महिन्याला पैसे मोजावे लागणार आहेत. या निर्णयाचा परिणाम भारतासह जगभरातील कोट्यवधी वापरकर्त्यांवर होणार आहे.**




**मेटाच्या** उत्पादन प्रमुख नाओमी ग्लीट यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट करून ही घोषणा केली आहे. मेटाच्या नव्या प्लॅनमध्ये 'प्लस' आणि 'मेटा वन' असे पर्याय देण्यात आले आहेत. खास फीचर वापरण्यासाठी आता दरमहा पैसे द्यावे लागणार आहेत. मेटाने म्हटले आहे की, आता केवळ जाहिरातींवर अवलंबून न राहता कंपनी सब्सक्रिप्शनमधूनही पैसे मिळवणार आहे. या नवीन मॉडेलनुसार, प्रीमियम फीचर फक्त पैसे देणाऱ्या युजरसाठी उपलब्ध असतील.

'इन्स्टाग्राम प्लस' आणि 'फेसबुक प्लस'साठी सुमारे ३.९९ डॉलर (सुमारे ३८७ रुपये) प्रति महिना शुल्क ठेवण्यात आले आहे, तर व्हॉट्सअ‍ॅप प्लससाठी २.९९ डॉलर (सुमारे २९० रुपये) प्रति महिना आकारले जाणार आहे. भारतासाठी तूर्त शुल्क अद्याप जाहीर केलेले नाही. पण ते काही दिवसांत जाहीर होईल. इन्स्टाग्राम प्लस वापरकर्त्यांना स्टोरीज किती लोकांनी पुन्हा पाहिल्या याची माहिती, लपून स्टोरीज पाहण्याची सुविधा, स्टोरीजची मर्यादा २४ तासांपेक्षा जास्त वाढवण्याची सुविधा मिळणार आहे. याशिवाय प्रोफाईल कस्टमायझेशन, नवीन इमोजी आणि खास फॉन्ट्ससारखे फीचर मिळतील. 'व्हॉट्सअ‍ॅप प्लस'मध्ये चॅट कस्टमायझेशन, नवीन थीम, खास रिंगटोन, प्रीमियम स्टिकर आणि चॅट पिनिंगसारखे फीचर दिले जातील.

'मेटा वन' नावाचे नवीन एआय आणि बिझनेस प्लॅनही सादर केले आहेत. यामध्ये एआय वापरासाठी दोन सशुल्क प्लॅन असतील. यातील एक ७७५ रुपये प्रति महिना आणि दुसरा १,९३९ रुपये प्रति महिना असेल. या प्लॅनमध्ये इमेज जनरेशन, व्हिडिओ क्रिएशन आणि एआय टूल्सचा जास्त वापर करण्याची सुविधा मिळेल. याशिवाय क्रिएटर आणि व्यावसायिकांसाठीही स्वतंत्र सब्सक्रिप्शन प्लॅन आणले आहेत, ज्यात व्हेरिफिकेशन, चांगली पोहोच, अ‍ॅडव्हान्स अ‍ॅनालिटिक्स आणि ग्राहक सहाय्य यांसारख्या सुविधा मिळणार आहेत.

सोशल मीडिया अ‍ॅपची सवय लागलेल्यांना शेवटी सशुल्क पर्यायाकडे वळावेच लागणार आहे. कारण तिथेच नवे फिचर उपलब्ध असणार आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या पायाभूत सुविधांवरील प्रचंड खर्चामुळे मेटावर दबाव वाढत असल्याने हे पाऊल उचलण्यात आले आहे.

खर्च कमी करण्यासाठी नुकतीच मेटाने नोकरकपातही केली आहे. कंपनीने यावर्षी तब्बल १२५ अब्ज ते १४५ अब्ज डॉलर खर्चाचा अंदाज वर्तवला आहे. तो प्रामुख्याने एआय डेटा सेंटर आणि संबंधित तंत्रज्ञानावर होणार आहे. मायक्रोब्लॉगिंग साईट 'एक्स'ने काही दिवसांपूर्वी सशुल्क सेवा सुरू केल्यावर त्यांच्या महसुलात वाढ झाली होती. त्याच धर्तीवर मेटानेही सशुल्क प्रीमियम सेवा सुरू केली आहे. त्यातून महसूल वाढण्याची मेटाला अपेक्षा आहे.

## कर्नाटकात अखेर शिवकुमार मुख्यमंत्री सिद्धरमय्या शेवटी पायउतार झाले

**कर्नाटकात प्रदीर्घ काळ काँग्रेसची सत्ता आहे आणि प्रदीर्घ काळ काँग्रेसचे सिद्धरमय्या हे कर्नाटकचे मुख्यमंत्रिपदावर राहिले आहेत. मात्र कर्नाटकात काँग्रेसचेच दुसरे नेते डी. के. शिवकुमार यांचीही तितकीच ताकद आहे. अर्थातच शिवकुमार यांनाही मुख्यमंत्रिपदाची आशा होती. मात्र सिद्धरमय्या हे पद सोडायला तयार नव्हते. आज अखेर सिद्धरमय्या पायउतार झाले आणि डी.के. शिवकुमार हे येत्या दोन दिवसांतच मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. काँग्रेससाठी हा महत्त्वाचा क्षण आहे. याचे कारण कोणतेही नाराजीनाट्य न होता दोन प्रभावी नेत्यांची महत्त्वाकांक्षा सांभाळत काँग्रेसने मुख्यमंत्री बदलण्यात यश मिळविले आहे. याचे सर्व श्रेय राहुल गांधी यांना दिले जाते. काँग्रेसच्या वयोवृद्ध नेत्यांना बाजूला सारून नव्या दमाच्या नेत्यांना पदावर बसविण्याचा हट्ट राहुल गांधी यांनी धरला आहे.**

■ बंगळुरू



**सिद्धरमय्या** हे ओबीसी नेते आहेत. शिवाय सर्वाधिक काळ ते मुख्यमंत्रिपदावर विराजमान आहेत. त्यामुळे त्यांना पद सोडण्यास सांगणे कठीण होते. त्याचवेळी डी. के. शिवकुमार यांचीही ताकद मोठी आहे. काँग्रेस पक्षात त्यांना संकटविमोचक म्हणून ओळखले जाते. काँग्रेसचे कोणत्याही राज्यातील सरकार अडचणीत आले तर काँग्रेसच्या आमदारांना सुरक्षित स्थळी नेणे आणि त्यांना योग्यवेळी मतदानासाठी

» पान ७ वर

## राज्यात जातींवरून डोकी फोडणे सुरू राज ठाकरेंचा सत्ताधाऱ्यांवर आरोप

■ मुंबई

**स्वातंत्र्यवीर** विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यातील सध्याच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवर टीका केली आहे. ज्या महाराष्ट्राने जातीअंताचा लढा दिला, त्या महाराष्ट्रात आज जातींवरून डोकी फोडली जात आहेत आणि याला सत्ताधारीच खतपाणी घालत आहेत, असा आरोप त्यांनी एक्स पोस्टद्वारे केला. व्हॉट्सअ‍ॅप विद्यापीठात काय आले आहे ते चूक बरोबर काही न तपासता खरे मानण्याची चढाओढ लागली आहे, असा टोला त्यांनी लगावला आहे.



राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये सावरकरांच्या विचारांचा उल्लेख करताना म्हटले की, सावरकर हे हिंदू राष्ट्रवाद मांडणारे तत्त्वज्ञ, क्रियाशील धर्मसुधारक, समाजसुधारक आणि तितकेच विज्ञाननिष्ठ विचारवंत होते. माझ्या मते, सावरकर हे असे महापुरुष आहेत की, त्यांच्या टीकाकारांना पूर्ण सावरकर कधी कळले नाहीत किंवा झेपत असतील का? ज्या भूमीत सावरकर जन्माला आले त्या महाराष्ट्रात व्हॉट्सअ‍ॅप विद्यापीठात काय आले आहे ते चूक बरोबर काही न तपासता किंवा साधा विचार पण न करता खरे मानण्याची चढाओढ लागली आहे.

» पान ७ वर

## रखरखत्या उन्हात अन्नपाणी न घेता ३० मेपासून जरांगेंचे टोकाचे आंदोलन

■ जालना

**मराठा** आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांनी आज सरकारला निर्वाणीचा इशारा देत ३० मेपासून अंतरवाली सराटीमध्ये रखरखत्या उन्हात अन्नपाण्याविना आमरण उपोषण करण्याचा निर्धार जाहीर केला.



सरकारबरोबर अनेक वेळा चर्चा केल्या, निवेदने दिली, उपोषण केले, निर्णय घेण्यासाठी एक महिन्याचा अवधी मागितला होता तो दिला, त्याला आता दहा महिने पूर्ण होत आहेत. त्यामुळे यापुढे सरकारशी कोणतीही चर्चा करणार नाही. ५८ लाख नोंदी सापडलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र दिल्याशिवाय मागे हटणार नाही, अशी टोकाची भूमिका जरांगे यांनी घेतली.

जरांगे म्हणाले की, सरकारला बराच वेळ दिला. गेल्या वर्षी २९ ऑगस्टला मुंबईला गेलो तेव्हा सरकारने मराठा आरक्षणावर निर्णय घेण्यासाठी एक महिन्याची मुदत मागितली होती. आम्ही ती मुदत दिली. त्याला आता दहा महिने पूर्ण होत आहेत. सरकारने काहीही हालचाल केलेली नाही. त्यामुळे आता मी कठोर निर्णय घेतला आहे. आधी सांगितल्याप्रमाणे ३० मे पासून मी आमरण उपोषण सुरू

» पान ७ वर

## अमेरिकेचा इराणवर, इस्रायलचा लेबनॉनवर हल्ला युद्धबंदी समाप्त! तणावाचे वातावरण

■ तेहरान

**अमेरिका** आणि इराण यांच्यातील संघर्ष पुन्हा झाला असून, हवाई हल्ले, ड्रोन कारवाया आणि प्रत्युत्तरात्मक कारवायांमुळे मध्य पूर्वेत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. याच दरम्यान इस्त्रायलने लेबनॉनवरही हल्ले सुरू केल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. कुवेतमध्ये ड्रोन हल्ल्याचा इशारा देण्यात आला आहे. इराण-अमेरिका दरम्यान असलेली शस्त्रसंधी संपुष्टात आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारावरही याचा परिणाम दिसून येत असून, तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे.

अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाला नवे वळण आले असून, अमेरिकन सैन्याने इराणवर एका आठवड्यात दुसऱ्यांदा हल्ला केल्याचा दावा केला आहे. हा हल्ला स्वसंरक्षण म्हणून करण्यात आल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. इराणकडून काही आक्रमक हालचाली दिसून आल्या होत्या, असे अमेरिकेचे म्हणणे आहे. अमेरिकन लष्करातील दोन अधिकाऱ्यांनी म्हटले आहे की, त्यांनी इराणचे चार ड्रोन पाडले आणि पाचवा ड्रोन उडण्यापूर्वीच त्याच्या तळावर हल्ला केला. हे ड्रोन होर्मूज सामुद्रधुनीला धोका निर्माण करत होते. ही सामुद्रधुनी

» पान ७ वर

## नसरापूर अत्याचार प्रकरणी कांबळेविरोधात आरोप निश्चित

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ पुणे

**पुण्यातील** भोर तालुक्यातील नसरापूर येथील अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणात आरोपी भीमराव कांबळे याच्याविरोधात न्यायालयाने आरोप निश्चित केले आहेत. न्यायालयाने प्राथमिकदृष्ट्या (प्राईमा फेसी) पुरावे असल्याचे नमूद करत खटल्याची पुढील सुनावणी रोज 'इन कॅमेरा' पद्धतीने घेण्याचे आदेश दिले आहेत.

आज विशेष न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान भीमराव कांबळेला प्रथमच प्रत्यक्ष न्यायालयात हजर केले होते. यावेळी आरोपीच्या वकिलांनी आरोप फेटाळले. मात्र, सरकारी पक्षाने सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीविरोधात आरोप निश्चित केले.

या प्रकरणात पोलिसांनी अवघ्या १५ दिवसांत दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल केले होते. सुनावणीदरम्यान लैंगिक अत्याचारासंदर्भातील वैद्यकीय अहवाल, सीसीटीव्ही फुटेज तसेच इतर तांत्रिक आणि परिस्थितीजन्य पुरावे न्यायालयासमोर सादर करण्यात आले. दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तिवाद झाला. मात्र आरोपीच्या वकिलांना त्याच्या बाजूने ठोस पुरावे सादर करण्यात अपयश आले. या सुनावणीस विशेष सरकारी वकील अजय मिसर, तक्रारदाराचे वकील, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल व अधिकारी उपस्थित होते.

## महाराष्ट्रात १५ दिवसांत सीएनजी दरात पुन्हा वाढ

■ मुंबई

**पेट्रोल** आणि डिझेलच्या दरात गेल्या दहा दिवसांत चौथ्यांदा वाढ झाल्यानंतर आता सीएनजीच्या दरातही वाढ करण्यात आली आहे. मुंबईपाठोपाठ पुणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये आजपासून वाढीव दर लागू झाल्याने रिक्षा, टॅक्सी आणि खासगी वाहनधारकांच्या इंधन खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पुण्यात एमएनजीएल कंपनीने सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपये ५० पैशांची वाढ जाहीर केली आहे. त्यामुळे शहरातील सीएनजीचा दर ९२ रुपये २५ पैशांवरून ९४ रुपये ७५ पैसे प्रति किलो इतका




झाला आहे. गॅसखरेदीचा खर्च वाढल्यामुळे दरवाढ करावी लागल्याचे स्पष्टीकरण कंपनीकडून देण्यात आले आहे. नाशिकमध्ये सीएनजीच्या दरात प्रति किलो १ रुपया ३५ पैशांची वाढ झाली आहे. त्यामुळे शहरातील सीएनजीचा नवा दर ९६ रुपये ५० पैसे प्रति किलो झाला आहे. यापूर्वी वाहनधारकांना ९५ रुपये १५ पैशांमध्ये सीएनजी उपलब्ध होत होता. नागपूरमध्येही सीएनजीच्या दरात किलोमागे २ रुपयांची वाढ करण्यात आली असून, नव्या दरानुसार सीएनजी ९४ रुपये ९० पैसे प्रति किलो दराने विकला जात आहे. छत्रपती संभाजीनगरच्या चिकलठाणा परिसरातील बीपीसीएल पंपावर सीएनजीच्या दरात किलोमागे २ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. गेल्या १५ दिवसांत येथे सीएनजीच्या दरात तब्बल १२ रुपयांची वाढ झाल्याने वाहनधारकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

## बविआच्या राजीव पाटील यांना भाजपाची उमेदवारी? खासदार भेटले

■ विरार

**विधान परिषद** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने बविआ अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांचे आत्येबंधू राजीव पाटील यांना रिंगणात आणण्यासाठी चाचपणी सुरू केली आहे. खासदार हेमंत सवरा आणि आमदार राजन नाईक यांनी बुधवारी रात्री राजीव पाटील यांची भेट घेतल्याने राजकीय खळबळ उडाली असून चर्चांना उधाण आले आहे.


स्थानिक स्वराज संस्थांच्या ठाणे-पालघर मतदारसंघासाठी भाजपा आणि शिंदे शिवसेनेत मतभेद वाढले आहेत. त्यामुळे भाजपाला शह देण्यासाठी शिवसेनेने माजी आमदार क्षितीज ठाकूर यांना उमेदवारी देण्याची तयारी सुरू केली होती. बुधवारी रात्री भाजपा खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजन नाईक यांच्यासह भाजपा शिष्टमंडळाने विरार येथील राजीव पाटील यांच्या कार्यालयात भेट घेतली. यामुळे भाजपा विधान परिषदेवर राजीव पाटील यांना उमेदवारी देणार का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. खासदार नालेसफाईच्या पाहणीसाठी आले होते. माझ्या कार्यालयाजवळ गाड्या उभ्या असल्याने ते चहा पिण्यासाठी फक्त माझ्याकडे आले होते, अशी मिश्किल प्रतिक्रिया राजीव पाटील यांनी दिली. भेटीतील राजकीय चर्चा 'गुप्त' असतात, अशी सावध प्रतिक्रिया

» पान ७ वर

## चांद्रयान-२ मोहिमेचे चंद्रावर पाण्याचे संकेत

**विश्वाच्या अफाट पसाऱ्यामध्ये फक्त एकट्या पृथ्वीवरच आपल्यासारखी जीवसृष्टी आहे की अन्य कोणत्या ग्रहावरही जीवसृष्टी आहे याचा शोध जगभरातील शास्त्रज्ञ मागील कित्येक वर्षांपासून घेत आहेत. मात्र अद्याप कोणत्याही ग्रहावर जीवसृष्टीचे ठोस संकेत आढळलेले नाहीत. परंतु भारताची अवकाश संशोधन संस्था इस्त्रोच्या चांद्रयान-२ मोहिमेतून चंद्रावर पाणी असल्याचे संकेत मिळाले आहेत.**

■ नवी दिल्ली




**चांद्रयान-२** हे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारे जगातील पहिले अंतराळयान आहे. या यानाने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरून गोळा केलेल्या माहितीचे गुजरातच्या अहमदाबाद येथील प्रयोगशाळेमध्ये विश्लेषण केले असता चंद्रावरील काही अतिथंड अशा विवरांमध्ये गोठलेल्या अवस्थेत पाणी असल्याचे संकेत मिळाले आहेत.

चंद्राच्या पृष्ठभागावर असंख्य विवरे आहेत. त्यातली फौस्तिनी नावाच्या विवरामध्ये आणखी एक लहान विवर आढळून आले आहे. या लहान विवराचा व्यास सुमारे १.१ किलोमीटर आहे. या विवराच्या आत भूगर्भामध्ये गोठलेल्या स्वरूपात म्हणजेच बर्फाच्या अवस्थेत पाणी असू शकते, असा निष्कर्ष चांद्रयान-२ ने दिलेल्या माहितीवरून शास्त्रज्ञांनी काढला आहे.

## कल्याण पश्चिम सर्वोदय सोसायटीत कुर्बानीला मनाईने मुस्लीम संतप्त

■ कल्याण

**मिरा रोड,** घाटकोपर आणि गोरेगावनंतर आज कल्याणमध्येही बकऱ्यांच्या कुर्बानीवरून वाद निर्माण झाला. कल्याण पश्चिमेतील सर्वोदय पार्क गृहसंकुलात मुस्लीम समाजाकडून बकऱ्याची कुर्बानी दिली जात असल्याचे कळताच पोलिसांनी हस्तक्षेप करत त्याला विरोध केला. सोसायटीच्या परिसरात कुर्बानी दिली जात असल्याचे कारण देत पोलिसांनी मज्जाव केल्याने मुस्लीम समाजात संतापाचे वातावरण निर्माण झाले. या सोसायटीमध्ये सर्वच रहिवासी मुस्लीम असून, कुर्बानी देण्यास कुणाचाही आक्षेप नसताना पोलिसांनी विरोध का केला, असा सवाल स्थानिकांनी उपस्थित केला. या पार्श्वभूमीवर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

येथील मुस्लीम रहिवाशांनी सांगितले की, नमाज अदा करणे, कुर्बानी देणे किंवा मंदिरात जाऊन पूजा करणे हा प्रत्येक व्यक्तीचा धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार आहे. मात्र, केडीएमसी पोलीस विभाग आणि बाजारपेठ पोलीस ठाण्याने कल्याण पश्चिम भागात आम्हाला एक दिवस आधी नोटीस दिली आणि त्या नोटीसमध्ये तारीखही नमूद केलेली नाही. हे पूर्णपणे संविधानाच्या विरोधात आहे. हा मुस्लीम समाजावर होत असलेला अन्याय आहे.

## नीट पेपर वाटपासाठी हवाई दलाची मदत घेणार! शिक्षणमंत्र्यांची माहिती

■ नवी दिल्ली

**नीटची** नव्याने घेतली जाणारी परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी हवाईदलाची मदत घेतली जाणर असल्याची माहिती शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज दिली. हवाईदलाच्या विमानाने नीटचे पेपर परीक्षा केंद्रापर्यंत पोहचवले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. नीट मुद्द्यावरून आज केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या निवासस्थानी एक उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीला शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, ज्योतिरादित्य शिंदे, एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह व पंतप्रधान कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीनंतर प्रधान म्हणाले की, नीट परीक्षा प्रक्रिया राबवताना पोस्ट खाते, गृहखाते अशी अनेक सरकारी विभागांची मदत घेतली जाते. आता २१ जून रोजी परीक्षा होणार असून त्यासाठी वेळ कमी आहे. त्यामुळे पोस्ट विभागाकडून जाणारे पेपर आता हवाई दलाची मदत घेऊन परीक्षा केंद्रापर्यंत नेले जाणार आहेत.

दरम्यान, परीक्षा रद्द झाल्यानंतर, नॅशनल टेस्टिंग एजन्सीने शुल्क परताव्यासाठी बँक खात्याची माहिती जमा करण्याची अंतिम मुदत २२ जून रोजी रात्री ११.५० वाजेपर्यंत वाढवली आहे. उमेदवारांना परतावा लिंकवर पोहोचण्यासाठी आणि त्यांच्या बँक खात्याची माहिती जमा करण्यासाठी त्यांच्या क्रेडेन्शियल्सचा वापर करून लॉग इन करावे लागेल.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**

**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

मालाड वेस्ट येथे इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुली/ महिला पाहिजेत. **9987577655** {NC260667}

पाण्याची टाकी (मेकॅनिकल) किलिनिंगसाठी पुरुष लेबर पाहिजेत. संपर्क : **9321319809 / 9819543826** {NC260703}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

सुरक्षारक्षक, हाऊसकीपिंग, सुपरवायझर, पँट्रीबॉय- मुलुंड, दादर, गोवंडी, वरळी, मुंबईसेंट्रल, ठाणे, **8422880511/ 8291056761/ 8422880515/9221560330/ 9326200875** {NC260571}

ऑफीस मध्ये अनुभवी हाऊसकीपिंग ladies पाहिजे BKC Kurla **9699927271** {NC260668}

नामांकित कंपनीमध्ये हेल्थकेअर सर्वे/प्रमोशनसाठी दहावी ते पदवीधर मुली/स्त्रिया पाहिजेत. फिक्स पगार - १५०००/- कांजुरमार्ग- **7302037159/ 9223222843** {NC260644}

विलेपार्ले (पूर्व) येथील मॉड्युलर फर्निचरमध्ये सुतारासोबत काम करण्यासाठी एका मदतनीसाची आवश्यकता आहे. दुचाकी चालवण्याचा परवाना आवश्यक, वय २५-३५, कामाची वेळ सकाळी ९.३० ते रात्री ८.३०. पगारः ₹ ७०० अधिक गाडी भाड्यापोटी प्रतिदिन ₹५०. संपर्कः **9820149975** {NC260671}

ड्रीम्स हॉलिडे कांदिवली ऑफिसमध्ये कामासाठी मुले/ ड्रायव्हर पाहिजे. **8850238132, 9082602172.** {NC260670}

## पाहिजेत

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुली पाहिजेत. दहिसर ईस्ट, संपर्क **7021374861** {NC260715}

अर्धवेळ काम पोलीस/सैन्य दलातून निवृत्त झालेल्यांसाठी १२वी पासः **9870231322** {NC260682}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकिंगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact : **8169999128** {NC260439}

सोसायटी मध्ये हाऊसकीपिंगसाठी मुले पाहिजे चिंचपोकळी, कॉटनग्रीन संपर्क **9699927271** {NC260625}

दादर वेस्टमध्ये ऑफीस बॉय पाहिजेत संपर्कः **7506053891/ 7410056007**. (फोन 3 ते 5 करा). {NC260699}

समता विद्या मंदिर, मोहिली व्हिलेज, परेरावाडी, साकीनाका, मुंबई ७२ या शाळेत कामासाठी महिला व पुरुष शिपाई, वॉचमन, इलेक्ट्रीशियन पाहिजेत. दि. १२ जून रोजी सकाळी ११.०० ते ४.०० या वेळेत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी हजर राहावे. संपर्क क्र. **9820131017/ 9819493390/ 8108781702** {NC260701}

ग्रँटरोड (केम्सकॉर्नर) हाऊसकीपिंग कामाकरिता त्वरित मुले/ मुली पाहिजेत. संपर्क- **9819292051** {NC260681}

कुरीयर कंपनीमध्ये नाईट शिफ्टसाठी मुले पाहिजे अंधेरी- **9833908233** {NC260721}

भुमी वर्ल्ड भिवंडी येथील प्रिंटींग प्रेसकरीता पंचींग मशीन, फॉयलिंग मशीन, लॅमिनेशन मशीनसाठी ऑपरेटर व ऑफसेट मशीन SM-74 करीता फीडरमॅन, बॉयलर, प्रिंटर हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार, PF, ESIC, ग्रॅच्युईटी, बोनस योगेश- **9769232850.** {NC260688}

## पाहिजेत

त्वरित नियुक्ती ऑफीस बॉय/ प्युन CST (फोर्ट ऑफीसमध्ये), बाईक चालवता आली पाहिजे (वैध लायसन्ससह), चांगली सॅलरी मिळेल, संपर्क **022-40792222/ 9821538299** किंवा थेट मुलाखतीसाठी या दिनांक 30 मे, वेळ दुपारी 2 ते संध्या. 6 वाजेपर्यंत. पत्ता- संजीत कम्युनिकेशन्स प्रा.लि., 155, व्हिक्टोरिया बिल्डिंग, मोदी स्ट्रीट, अग्यारी लेनच्या जवळ, फोर्ट, मुंबई-400001. {NC260722}

हाऊसकीपिंग बॉईज, पगार रु. १५००० ते रु. १६०००, येण्या जाण्याचा रेल्वे पास मिळेल. ट्युलीप्स हाऊसकीपिंग संपर्क- आशिष- **7506802071** {NC260720}

अनुभवी डीटीपी ऑपरेटर (पगार २५,००० ते ३५,०००), स्क्रिन प्रिंटर, हेल्पर पाहिजे. ठिकाण- तुर्भे, नवी मुंबई. संपर्क **8108048686/ 9892496886** {NC260719}

## Situation Vacant

Wanted courier boys for international Couriers at Khar. call **9930011100** {NC260686}

Required male production supervisor for packaging co at Chakan. Contact: **8080000700** {NC260705}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260552}


**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

- मॅनेजर, 'नवाकाळ'

# गायक संगीतकार राजकमल

**राजकमल हे स्वत: गायक होते. राजकमल यांनी सावन को आने दो, कथा, चष्मे बद्दुर पायल की झंकार या सारख्या काही मोजक्याच दहा-बारा चित्रपटाला संगीत दिले. त्यांचे खरे नाव दलपत होते ते नाव नंतर त्यांनी बॉलीवूडसाठी राज कमल असे बदलले. राजकमल यांनी १९७० मध्ये काम करायला सुरुवात केली होती,राजस्थानहून मुंबईत आल्यानंतर वर्षभराच्या प्रतीक्षेनंतर,१९७१ मध्ये त्यांना दोस्त और दुश्मन हा चित्रपट मिळाला, ज्यामध्ये कोणीही मोठा स्टार नव्हता, त्या चित्रपटात रेखा जरी होती, पण त्यावेळेस तिचे नावही मोठे नव्हते.**



**यानंतर** त्यांना किरकोळ कामे मिळत राहिली, पण प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर १९७६ मध्ये ताराचंद बडजात्या यांचे सावन को आने दो आले, ज्यात येसुदास आणि जसपाल सिंग यांचा साधा आणि भावपूर्ण आवाज, व राजकमल यांचे सूर प्रत्येक घराघरात पोहोचले. या गाण्यांचा गोडवा अजूनही आहे. ८० च्या दशकाच्या सुरुवातीस, सई परांजपे यांचे हलके फुलके १९८१ मध्ये चशम-ए-बद्दूर आणि १९८३ मध्ये कथा चित्रपट आले होते.फारुख शेख, दीप्ती नवल, राकेश बेदी, नसीरुद्दीन शाह, सईद जाफरी आणि इतर अनेक दिग्गज कलाकारांनी या दोन्ही चित्रपटांमध्ये काम केले.या दोन्ही चित्रपटांचे संगीत राजकमल यांनी दिले होते.चश्म-ए-बद्दूर मधील गाणी खास करून कहां से आए बदरा व काली घोड़ी द्वार खड़ी, खूप गाजली. राजकमल यांनी येसुदास यांना हिंदी मध्ये पहिल्यांदा संधी दिली.

येसुदास यांनी गायलेले 'चांद जैसे मुखडे पे' हे त्यांचे गाणे खूपच गाजले. राज कमल यांची गायक म्हणूनही 'गुंजे गुंजे रे', 'जाने क्यू हैं' आणि 'मैंने तुमको ही' अशी काही गाणी गायली.

या नंतर त्यांनी कुठल्या प्रसिद्ध चित्रपटाना संगीत दिले नाही.१९८४ मध्ये एक मल्याळम चित्रपट 'आझी'ला त्यांनी संगीत दिले होते. १९८८ मध्ये बी.आर. चोप्रा यांची महाभारत मालिका दूरदर्शनवर आली आणि त्यात महेंद्र कपूर यांच्या आवाजात राजकमल जी यांनी संगीतबद्ध केलेल्या अथ श्री महाभारत कथा हे शब्द ऐकण्यासाठी संपूर्ण भारत आतुर असे.या मालिकेला संगीत राजकमल यांनीच दिले होते. या सोबतच त्यांनी बहादूर शाह जफर, विष्णू पुराण आणि मा शक्ती यांसारख्या टेलिव्हिजन मालिकां साठी काम केले होते. राजकमल यांनी चित्रपट बनवण्याचाही प्रयत्न केला. २००१ मध्ये ''जख्मी हसीना'' हा त्यांचा दिग्दर्शक म्हणून एक चित्रपट प्रदर्शित झाला, पण तो यशस्वी झाला नाही. राजकमल यांचे १ सप्टेंबर २००५ रोजी निधन झाले.

# खासदार श्रीकांत शिंदे यांच्या ताफ्यातील गाड्यांचा अपघात

■ नांदेड

**खासदार** श्रीकांत शिंदे यांच्या ताफ्यातील चार गाड्यांचा नांदेडमध्ये अपघात झाला. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. ताफ्यातील वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

श्रीकांत शिंदे हे नांदेड जिल्ह्यात शिवसंवाद यात्रेनिमित्त दौऱ्यावर होते. सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात हा अपघात घडला. नायगाव येथे बिलोली, देगलूर आणि मुखेड या तीन विधानसभा मतदारसंघांच्या कार्यकर्त्यांची बैठक



आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी श्रीकांत शिंदे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसेच आमदार आणि पदाधिकारी नायगावकडे जात होते.

अण्णाभाऊ साठे चौकातून ताफा जात असताना अचानक एक दुचाकी ताफ्यासमोर आली. दुचाकीला वाचवण्याच्या प्रयत्नात ताफ्यातील एका वाहन चालकाने अचानक ब्रेक लावला. त्यानंतर मागील चार गाड्या एकमेकांवर धडकल्या. अपघातग्रस्त वाहनांमध्ये श्रीकांत शिंदे यांचे काही कार्यकर्ते तसेच आरोग्य विभागातील कर्मचारी होते. गाड्यांचे नुकसान झाले असले तरी कोणालाही दुखापत झालेली नाही.

# गुळदुवे शाळेसमोरील खचलेल्या रस्त्याकडे दुर्लक्ष! ग्रामस्थांमध्ये संताप

■ सावंतवाडी

**सावंतवाडी** मार्गावरील गुळदुवे शाळा क्रमांक १ समोरील रस्त्याचा काही भाग गेल्या वर्षी कोसळला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्याप दुरुस्ती करण्यात आलेली नाही. वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने दखल न घेतल्याने ग्रामस्थ आणि वाहनचालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.पावसाळा तोंडावर आला असतानाही रस्त्याच्या दुरुस्तीचे काम प्रलंबित असल्याने ग्रामस्थांनी पुन्हा एकदा सह्यांचे निवेदन संबंधित विभागाकडे सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गुळदुवे शाळेसमोरील रस्त्याला धोकादायक वळण असून दरीकडील सुमारे २५ फुटांचा भाग खचला आहे. त्यामुळे वाहतुकीस मोठा धोका निर्माण झाला आहे. रस्त्यालगत सुमारे ३० फूट खोल दरी असल्याने एखादे वाहन घसरल्यास मोठी जीवित आणि वित्तहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पावसामुळे रस्त्याचा आणखी भाग कोसळण्याची शक्यता असून, वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याचा धोका निर्माण झाला आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळा सुरू होण्यापूर्वी तातडीने रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अशी मागणी ग्रामस्थ आणि वाहनचालकांनी केली आहे.

# कुर्बानीला विरोध केल्याने नगरसेविका सातम यांना धमकी

■ मुंबई

**गोरेगाव** पूर्व येथील गोकुळधाम सोसायटी परिसरात बकऱ्यांच्या कुर्बानीला विरोध केल्यामुळे भाजपा नगरसेविका प्रीती सातम यांना फोन व सोशल मीडियाच्या माध्यमातून धमक्या मिळाल्या आहेत. या प्रकरणी त्या दिंडोशी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात तक्रार दाखल करण्यात येणार आहे.

सातम म्हणाल्या की, सकाळपासून मला अनेक फोन कॉल्स आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून धमक्या येत आहेत. या संदर्भात मी माझ्या वरिष्ठांशी चर्चा केली असून, उद्या पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल करणार आहे.

# गुंतवणुकीचा नवा ट्रेंड बाजारात तांब्याचे बार

■ छत्रपती संभाजीनगर

**सोने-चांदीच्या** मोठे चढउतार होत असताना पहिल्यांदाच तांब्याचे बार विक्रीसाठी दाखल झाले आहेत. त्यामुळे आता सर्वसामान्य गुंतवणूकदारांसाठी गुंतवणुकीचा नवा पर्याय उपलब्ध झाल्याचे म्हटले जात आहे.

पंतप्रधान मोदी यांनी पुढील वर्षभर सोने-चांदीची खरेदी कमी करण्याचे आवाहन केल्यानंतर सोने-चांदीच्या बाजारात काही प्रमाणात मंदी दिसून आली. त्यानंतर प्रामुख्याने औद्योगिक वापरापुरते मर्यादित असलेले तांबे आता गुंतवणुकीचा नवा पर्याय म्हणून पुढे येत आहे. गेल्या दोन महिन्यांत तांब्याच्या दरात मोठी वाढ झाली असून किलोमागे १ हजार रुपयांवरून दर थेट २ हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. यामुळे बाजारात १०० ग्रॅम, ५०० ग्रॅम आणि १ किलो वजनाचे तांब्याचे बार विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. या बारची किंमत ५०० रुपयांपासून असल्याने छोट्या गुंतवणूकदारांमध्येही याबाबत उत्सुकता वाढली आहे. तज्ज्ञांच्या मते, इलेक्ट्रिक वाहन, सौर ऊर्जा आणि डेटा सेंटर उद्योगांच्या वाढत्या मागणीमुळे तांब्याचा वापर झपाट्याने वाढत आहे. त्यामुळेच तांब्याला आता भविष्यातील सोने असे संबोधले जात आहे. गुंतवणूकदार तांब्याचे बार किंवा वीट स्वरूपात साठवणूक करून दीर्घकालीन नफा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. देशात राजस्थान, झारखंड आणि मध्य प्रदेशात तांब्याचे उत्पादन होते. चिली, ऑस्ट्रेलिया आणि पेरू या देशांतून मोठ्या प्रमाणावर तांब्याची आयात केली जाते.

# आजचे राशी भविष्य

शुक्रवार ता. २९ मे २०२६

ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | उत्साही दिवस. उत्पादकता वाढेल. नवीन उपक्रमांसाठी अनुकूलता राहील. |
| वृषभ | इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. आनंदवार्ता मिळेल. उत्साह व जोमाने कामे कराल. |
| मिथुन | भावनातिरेक टाळा. संयमाने व नियोजनपूर्वक गोष्टी हाताळणे हिताचे ठरेल. स्वत:च्या कामात लक्ष द्या. |
| कर्क | दिवस फारसा अनुकूल नाही. नकारार्थी विचार टाळा. आत्मविश्वास व उमेद कायम ठेवा. बचतीवर भर द्या. |
| सिंह | अनपेक्षित मार्गाने धनलाभाची शक्यता. वेळापत्रकानुसार वागणे हिताचे ठरेल. तब्येतीला प्राधान्य द्या. |
| कन्या | जोडीदाराशी सामंजस्य राखणे महत्त्वाचे राहील. कौटुंबिक खर्चामुळे मन खट्टू होईल. कामाचे नियोजन गरजेचे आहे. |
| तूळ | कामाचा ताण वाढेल. एकाग्रता महत्त्वाची ठरेल. जोडीदाराशी संवाद साधणे हिताचे राहील. |
| वृश्चिक | दिवस पूर्णपणे अनुकूल नसला तरी संथगतीने काही लाभ होतील. खर्चात वाढ झाली तरी योग्य ठिकाणी पैसा खर्च होईल. |
| धनु | अतिशय उत्साही दिवस. कठीण कामेही सहजगत्या आणि वेळेआधीच पार पडतील. वरिष्ठांची प्रशंसा लाभेल. |
| मकर | खंबीरपणे घेतलेले निर्णय फायदेशीर ठरतील. मेहनतीचे चीज होईल. बोनस व बढतीचे योग. |
| कुंभ | शांतपणे व संयमाने वाटचाल करा. नाहक चिंता करणे टाळा. कामे एकाग्रचित्ताने करा. |
| मीन | अतिशय सावधपणे व दक्षतापूर्वक कामे करा. अन्यथा चुकांना आमंत्रण मिळेल. योग्य ठिकाणी पैसा खर्च होईल. |

# शुभ राशी ता. २९/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| ० | ५ | ६ |
| ०१ | ५१ | ६० |
| ०६ | ५६ | ६५ |
| १४५ | २६७ | २६८ |
| २५० | ३४८ | ३४९ |

# लॉटरी

## महाराष्ट्र आकर्षक पुष्कराज विकली लॉटरी

सोडत दर गुरुवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 22 | सोडत दिनांक 28/05/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **AP-01 : 6261**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी — **6261** — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई; श्री एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **3936** — डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1004 | 1708 | 1718 | 2776 | 4668 | 6660 | 7187 | 8000 | 8472 | 9386 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2303 | 5724 | 7044 | 7785 | 7840 | 8105 | 8282 | 8434 | 9298 | 9581 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0787 | 1380 | 2063 | 4365 | 4472 | 5606 | 6426 | 6658 | 8852 | 8854 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0070 | 0159 | 0496 | 1520 | 3135 | 5391 | 5834 | 6033 | 6515 | 9307 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1279 | 1984 | 2669 | 3437 | 4245 | 5021 | 5555 | 6364 | 6959 | 7707 | 8387 | 9192 |
| | | 1289 | 1988 | 2675 | 3443 | 4270 | 5022 | 5557 | 6388 | 6960 | 7712 | 8426 | 9216 |
| | | 1303 | 1990 | 2682 | 3456 | 4308 | 5025 | 5558 | 6392 | 6976 | 7720 | 8474 | 9255 |
| | | 1306 | 2002 | 2724 | 3493 | 4333 | 5031 | 5560 | 6396 | 6994 | 7726 | 8487 | 9269 |
| | | 1351 | 2023 | 2727 | 3494 | 4348 | 5041 | 5583 | 6397 | 7054 | 7733 | 8525 | 9300 |
| 0011 | 0619 | 1361 | 2026 | 2734 | 3519 | 4384 | 5051 | 5586 | 6401 | 7057 | 7758 | 8549 | 9321 |
| 0023 | 0630 | 1371 | 2065 | 2773 | 3523 | 4394 | 5052 | 5591 | 6414 | 7073 | 7765 | 8577 | 9351 |
| 0024 | 0637 | 1377 | 2109 | 2809 | 3535 | 4416 | 5055 | 5592 | 6436 | 7078 | 7771 | 8583 | 9399 |
| 0032 | 0639 | 1380 | 2122 | 2811 | 3537 | 4421 | 5058 | 5593 | 6442 | 7091 | 7795 | 8611 | 9419 |
| 0035 | 0644 | 1393 | 2175 | 2845 | 3601 | 4432 | 5069 | 5594 | 6515 | 7107 | 7796 | 8636 | 9443 |
| 0058 | 0720 | 1395 | 2183 | 2853 | 3643 | 4434 | 5123 | 5595 | 6525 | 7119 | 7816 | 8638 | 9459 |
| 0071 | 0756 | 1410 | 2189 | 2882 | 3685 | 4441 | 5125 | 5608 | 6571 | 7160 | 7875 | 8676 | 9469 |
| 0081 | 0823 | 1419 | 2198 | 2922 | 3699 | 4451 | 5133 | 5658 | 6607 | 7167 | 7877 | 8688 | 9588 |
| 0082 | 0830 | 1443 | 2202 | 2925 | 3703 | 4455 | 5152 | 5663 | 6628 | 7176 | 7896 | 8701 | 9592 |
| 0098 | 0850 | 1480 | 2204 | 2926 | 3718 | 4488 | 5155 | 5687 | 6630 | 7217 | 7930 | 8751 | 9640 |
| 0105 | 0901 | 1491 | 2225 | 2948 | 3740 | 4527 | 5228 | 5695 | 6632 | 7237 | 7987 | 8786 | 9679 |
| 0120 | 0904 | 1493 | 2232 | 2952 | 3748 | 4528 | 5245 | 5704 | 6638 | 7283 | 7990 | 8798 | 9688 |
| 0155 | 0905 | 1518 | 2251 | 2966 | 3765 | 4544 | 5254 | 5753 | 6663 | 7284 | 8007 | 8805 | 9690 |
| 0160 | 0906 | 1523 | 2269 | 2974 | 3775 | 4567 | 5320 | 5758 | 6670 | 7291 | 8037 | 8808 | 9691 |
| 0172 | 0950 | 1531 | 2320 | 2992 | 3776 | 4577 | 5322 | 5763 | 6673 | 7324 | 8041 | 8815 | 9692 |
| 0182 | 0981 | 1559 | 2322 | 3023 | 3800 | 4604 | 5325 | 5775 | 6675 | 7342 | 8074 | 8825 | 9724 |
| 0220 | 0990 | 1624 | 2353 | 3029 | 3823 | 4625 | 5339 | 5822 | 6677 | 7348 | 8083 | 8829 | 9729 |
| 0227 | 0997 | 1661 | 2379 | 3039 | 3873 | 4636 | 5345 | 5834 | 6691 | 7388 | 8085 | 8838 | 9752 |
| 0230 | 1014 | 1671 | 2412 | 3066 | 3912 | 4662 | 5374 | 5859 | 6696 | 7397 | 8090 | 8864 | 9758 |
| 0253 | 1116 | 1681 | 2420 | 3121 | 3969 | 4687 | 5405 | 5865 | 6711 | 7447 | 8095 | 8881 | 9792 |
| 0277 | 1121 | 1714 | 2422 | 3130 | 3976 | 4719 | 5454 | 5885 | 6726 | 7464 | 8101 | 8888 | 9793 |
| 0285 | 1126 | 1719 | 2432 | 3131 | 3990 | 4726 | 5458 | 5956 | 6729 | 7490 | 8119 | 8898 | 9829 |
| 0305 | 1135 | 1721 | 2449 | 3167 | 3993 | 4728 | 5471 | 5982 | 6732 | 7503 | 8138 | 8909 | 9830 |
| 0315 | 1136 | 1730 | 2515 | 3251 | 4014 | 4748 | 5479 | 6012 | 6755 | 7507 | 8165 | 8941 | 9842 |
| 0385 | 1139 | 1780 | 2521 | 3261 | 4036 | 4750 | 5493 | 6042 | 6763 | 7567 | 8169 | 8943 | 9850 |
| 0400 | 1145 | 1805 | 2527 | 3273 | 4044 | 4768 | 5500 | 6056 | 6766 | 7578 | 8175 | 8948 | 9855 |
| 0472 | 1147 | 1818 | 2529 | 3303 | 4055 | 4782 | 5501 | 6064 | 6777 | 7585 | 8184 | 8982 | 9899 |
| 0490 | 1169 | 1819 | 2545 | 3321 | 4064 | 4821 | 5507 | 6067 | 6779 | 7596 | 8196 | 9050 | 9905 |
| 0504 | 1171 | 1828 | 2556 | 3357 | 4104 | 4862 | 5508 | 6068 | 6788 | 7597 | 8208 | 9052 | 9949 |
| 0511 | 1182 | 1871 | 2590 | 3364 | 4143 | 4913 | 5525 | 6072 | 6796 | 7610 | 8229 | 9094 | 9953 |
| 0530 | 1216 | 1888 | 2603 | 3368 | 4147 | 4918 | 5529 | 6116 | 6863 | 7627 | 8260 | 9144 | 9974 |
| 0567 | 1221 | 1917 | 2625 | 3381 | 4206 | 4922 | 5534 | 6142 | 6869 | 7647 | 8271 | 9160 | 9977 |
| 0576 | 1241 | 1926 | 2626 | 3386 | 4218 | 4938 | 5541 | 6196 | 6880 | 7694 | 8277 | 9169 | 9979 |
| 0600 | 1271 | 1942 | 2632 | 3415 | 4234 | 4940 | 5544 | 6205 | 6910 | 7695 | 8350 | 9183 | 9983 |
| 0606 | 1273 | 1981 | 2642 | 3428 | 4242 | 4949 | 5550 | 6246 | 6913 | 7705 | 8368 | 9189 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री — दीपलक्ष्मी विकली लॉटरी

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 22 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 28/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SD-06 : 8468**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0535 | 0543 | 0881 | 2845 | 3248 | 5261 महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर | 6176 महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर | 6573 विराग एन्टरप्रायझेस, नाशिक | 8603 | 9032 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1113 | 1280 | 1818 | 2617 | 2713 | 6242 | 6413 | 6860 | 6972 | 9757 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0309 | 2421 | 2707 | 3126 | 4948 | 7328 | 7953 | 8042 | 9341 | 9628 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1219 | 2859 | 3693 | 4745 | 6220 | 7329 | 7827 | 8809 |
| | 1269 | 2871 | 3698 | 5138 | 6406 | 7437 | 7838 | 8812 |
| 0046 | 1312 | 2920 | 3877 | 5203 | 6424 | 7447 | 7851 | 8826 |
| 0153 | 1523 | 3032 | 3901 | 5329 | 6488 | 7470 | 7971 | 8857 |
| 0509 | 1605 | 3070 | 4033 | 5363 | 6556 | 7510 | 8044 | 8935 |
| 0580 | 1656 | 3083 | 4410 | 5412 | 6614 | 7528 | 8088 | 8978 |
| 0640 | 1984 | 3173 | 4425 | 5538 | 6653 | 7574 | 8108 | 9128 |
| 0652 | 2122 | 3233 | 4494 | 5576 | 6786 | 7578 | 8249 | 9239 |
| 0740 | 2162 | 3234 | 4498 | 5701 | 6956 | 7602 | 8348 | 9777 |
| 0770 | 2259 | 3282 | 4499 | 5788 | 7021 | 7702 | 8361 | 9894 |
| 0805 | 2521 | 3304 | 4588 | 5905 | 7112 | 7744 | 8626 | 9919 |
| 0874 | 2729 | 3439 | 4741 | 5912 | 7113 | 7761 | 8789 | 9934 |
| 1036 | 2818 | 3608 | 4743 | 6024 | 7216 | 7776 | 8797 | 9948 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी

निकाल | सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 22 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 28/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-06 : 6912**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **7218** — अंबिका एजन्सी - दादर, मुंबई

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **6352** — श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1187 | 1980 | 2184 | 2236 | 3182 | 3247 | 4349 | 8798 | 8822 | 9832 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0284 | 1461 | 2368 | 3148 | 4825 | 5908 | 6365 | 6431 | 6437 | 8976 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0402 | 1402 | 1984 | 3189 | 3639 | 4645 | 5848 | 5856 | 7028 | 8950 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1196 | 2325 | 3573 | 4464 | 5502 | 6004 | 6671 | 7689 | 8858 |
| | | 1212 | 2331 | 3641 | 4479 | 5511 | 6029 | 6696 | 7743 | 8864 |
| | | 1242 | 2399 | 3733 | 4524 | 5527 | 6030 | 6702 | 7749 | 9048 |
| 0000 | 0660 | 1341 | 2527 | 3753 | 4548 | 5539 | 6148 | 6771 | 7777 | 9059 |
| 0021 | 0666 | 1351 | 2609 | 3803 | 4633 | 5549 | 6161 | 6846 | 7786 | 9090 |
| 0040 | 0700 | 1377 | 2622 | 3825 | 4674 | 5557 | 6181 | 6905 | 7788 | 9250 |
| 0081 | 0710 | 1423 | 2842 | 3838 | 4824 | 5563 | 6196 | 6962 | 7847 | 9338 |
| 0104 | 0713 | 1458 | 2850 | 3993 | 4830 | 5566 | 6226 | 7024 | 7880 | 9359 |
| 0189 | 0802 | 1527 | 2857 | 4047 | 4834 | 5576 | 6313 | 7031 | 8087 | 9394 |
| 0207 | 0805 | 1671 | 2893 | 4101 | 4843 | 5586 | 6332 | 7036 | 8242 | 9531 |
| 0217 | 0906 | 1799 | 2942 | 4172 | 4874 | 5595 | 6336 | 7088 | 8297 | 9558 |
| 0240 | 0952 | 1893 | 3077 | 4210 | 4924 | 5610 | 6350 | 7172 | 8328 | 9679 |
| 0280 | 0956 | 1925 | 3100 | 4219 | 4932 | 5644 | 6391 | 7209 | 8437 | 9784 |
| 0327 | 0998 | 1927 | 3137 | 4277 | 4955 | 5701 | 6402 | 7228 | 8552 | 9791 |
| 0333 | 1005 | 1964 | 3238 | 4304 | 5114 | 5705 | 6434 | 7298 | 8580 | 9818 |
| 0360 | 1016 | 1981 | 3265 | 4342 | 5178 | 5710 | 6466 | 7332 | 8582 | 9900 |
| 0369 | 1034 | 2120 | 3310 | 4394 | 5245 | 5745 | 6555 | 7517 | 8698 | 9931 |
| 0456 | 1053 | 2125 | 3338 | 4402 | 5257 | 5750 | 6563 | 7587 | 8705 | 9956 |
| 0511 | 1132 | 2210 | 3439 | 4412 | 5331 | 5772 | 6602 | 7604 | 8720 | 9995 |
| 0518 | 1141 | 2232 | 3485 | 4422 | 5357 | 5842 | 6623 | 7628 | 8798 | 9996 |
| 0609 | 1181 | 2260 | 3509 | 4459 | 5406 | 5961 | 6661 | 7652 | 8856 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# कुलाब्यात निवासी इमारतीला आग! महिला किरकोळ जखमी

■ मुंबई

**कुलाबा** परिसरातील ससून डॉकजवळील एका निवासी इमारतीला आज सकाळी आग लागल्याची घटना घडली. या आगीत महिला किरकोळ जखमी झाली असून, अग्निशमन दलाने वेळीच आग आटोक्यात आणल्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

शहीद भगत सिंग मार्गावरील ससून डॉकसमोर असलेल्या किस्मत बिल्डिंगमध्ये सकाळी सुमारे ७:५५ वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. तळमजला अधिक पाच मजली इमारतीच्या पाचव्या मजल्यावरील खोली क्रमांक २ मध्ये आग लागली होती. या आगीत विद्युत तारा, विविध इलेक्ट्रिक उपकरणे, लाकडी फर्निचर तसेच घरातील खाद्यपदार्थांचे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि आपत्कालीन प्रतिसाद पथके तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन दलाने अवघ्या काही मिनिटांत आग नियंत्रणात आणत सकाळी ८.१२ वाजता आग पूर्णपणे विझवली.

## महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 22 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 28/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-02 : 3640** — महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1130 | 2353 | 3410 हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा | 5206 | 5372 | 5379 | 6364 | 6759 | 7700 | 7801 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1330 | 1399 | 1405 | 2253 | 4144 | 4886 | 8690 | 9008 | 9274 | 9558 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0434 | 0861 | 0890 | 1994 | 3066 | 3573 | 6461 | 7821 | 7853 | 8629 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0523 | 2039 | 3208 | 3267 | 3576 | 5056 | 5670 | 6331 | 6719 | 8181 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1119 | 2008 | 2802 | 3589 | 4305 | 5255 | 6261 | 7378 | 8520 | 9345 |
| | | 1126 | 2122 | 2823 | 3609 | 4317 | 5343 | 6408 | 7443 | 8523 | 9349 |
| 0027 | 0680 | 1150 | 2137 | 2868 | 3637 | 4321 | 5345 | 6494 | 7472 | 8564 | 9389 |
| 0083 | 0710 | 1171 | 2152 | 2874 | 3702 | 4345 | 5365 | 6546 | 7578 | 8582 | 9418 |
| 0092 | 0712 | 1187 | 2200 | 2927 | 3708 | 4354 | 5378 | 6562 | 7611 | 8588 | 9419 |
| 0163 | 0732 | 1212 | 2212 | 3045 | 3724 | 4361 | 5416 | 6696 | 7682 | 8602 | 9519 |
| 0177 | 0735 | 1264 | 2242 | 3113 | 3734 | 4414 | 5454 | 6708 | 7726 | 8666 | 9594 |
| 0190 | 0808 | 1402 | 2267 | 3121 | 3750 | 4415 | 5460 | 6789 | 7751 | 8688 | 9619 |
| 0226 | 0863 | 1418 | 2324 | 3140 | 3779 | 4437 | 5504 | 6817 | 7756 | 8708 | 9692 |
| 0322 | 0899 | 1431 | 2327 | 3206 | 3808 | 4532 | 5518 | 6942 | 7821 | 8800 | 9749 |
| 0330 | 0907 | 1454 | 2385 | 3238 | 3868 | 4647 | 5537 | 7002 | 7857 | 8821 | 9797 |
| 0404 | 0909 | 1572 | 2408 | 3279 | 3873 | 4715 | 5556 | 7037 | 7869 | 8830 | 9849 |
| 0420 | 0920 | 1579 | 2425 | 3333 | 3892 | 4848 | 5616 | 7057 | 7953 | 8844 | 9854 |
| 0463 | 0950 | 1611 | 2429 | 3386 | 4019 | 4946 | 5623 | 7072 | 8021 | 8879 | 9879 |
| 0502 | 0954 | 1619 | 2473 | 3388 | 4035 | 4973 | 5695 | 7095 | 8053 | 8986 | 9888 |
| 0600 | 0963 | 1741 | 2522 | 3395 | 4047 | 5008 | 5755 | 7107 | 8061 | 9016 | 9894 |
| 0602 | 0980 | 1784 | 2524 | 3405 | 4100 | 5045 | 5853 | 7130 | 8233 | 9029 | 9934 |
| 0622 | 1017 | 1815 | 2627 | 3416 | 4140 | 5124 | 5924 | 7157 | 8262 | 9091 | 9937 |
| 0624 | 1021 | 1819 | 2688 | 3433 | 4148 | 5157 | 5925 | 7295 | 8276 | 9193 | 9938 |
| 0645 | 1063 | 1921 | 2723 | 3442 | 4238 | 5229 | 5950 | 7351 | 8288 | 9198 | 9939 |
| 0660 | 1107 | 1947 | 2732 | 3477 | 4276 | 5238 | 6144 | 7353 | 8327 | 9239 | 9946 |
| 0663 | 1118 | 1954 | 2800 | 3519 | 4294 | 5240 | 6195 | 7374 | 8328 | 9269 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# गुंतवणुकीचा नवा ट्रेंड बाजारात तांब्याचे बार



■ छत्रपती संभाजीनगर

**सोने-चांदीच्या** मोठे चढउतार होत असताना पहिल्यांदाच तांब्याचे बार विक्रीसाठी दाखल झाले आहेत. त्यामुळे आता सर्वसामान्य गुंतवणूकदारांसाठी गुंतवणुकीचा नवा पर्याय उपलब्ध झाल्याचे म्हटले जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढील वर्षभर सोने-चांदीची खरेदी कमी करण्याचे आवाहन केल्यानंतर सोने-चांदीच्या बाजारात काही प्रमाणात मंदी दिसून आली. त्यानंतर प्रामुख्याने औद्योगिक वापरापुरते मर्यादित असलेले तांबे आता गुंतवणुकीचा पर्याय म्हणून पुढे येत आहे. गेल्या दोन महिन्यांत तांब्याच्या दरात मोठी वाढ झाली असून किलोमागे १ हजार ते १,१०० रुपयांवरून दर थेट २ हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. यामुळे बाजारात १०० ग्रॅम, ५०० ग्रॅम आणि १ किलो वजनाचे तांब्याचे बार विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. या बारची किंमत ५०० रुपयांपासून असल्याने छोट्या गुंतवणूकदारांमध्येही याबाबत उत्सुकता वाढली आहे. तज्ज्ञांच्या मते, इलेक्ट्रिक वाहन, सौर ऊर्जा आणि डेटा सेंटर उद्योगांच्या वाढत्या मागणीमुळे तांब्याचा वापर झपाट्याने वाढत आहे. त्यामुळेच तांब्याला आता भविष्यातील सोने असे संबोधले जात आहे. अनेक गुंतवणूकदार तांब्याचे बार किंवा वीट स्वरूपात साठवणूक करून दीर्घकालीन नफा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

# खासदार हेमंत सवरा यांचा वसईत मान्सूनपूर्व पाहणी दौरा

■ वसई

**पालघरचे** खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी वसई-विरार महानगरपालिकाहद्दीतील विविध भागांचा दौरा करून मान्सूनपूर्व कामांची आणि नालेसफाईची पाहणी केली. गेल्या काही वर्षापासून पावसाळ्यात वसईत पूरपरिस्थिती निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ सवरा यांनी वसई विरार शहराच्या नालेसफाईच्या कामांची पाहणी करून मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेतला. सवरा यांनी वसईतील कृष्णा टाऊनशीप, गोखिवरे आणि नवघर, नासोसापारा मधील संतोष भुवन, अलकापुरी, विरार मधील रायपाडा, प्रगती नगर आदी प्रमुख नाल्यांची पाहणी केली.

# मोटर अपघात न्यायाधिकरणातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरा

**राज्य सरकारला आदेश**

■ मुंबई

**मोटर** अपघात न्याय प्राधिकरणातील (मॅक्ट) रिक्त असलेली कर्मचाऱ्यांची पदे तातडीने भरण्याचे आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. न्यायालयाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी सहाय्यक कर्मचारी हा अत्यंत महत्त्वाचा कणा असतो, असे निरीक्षण नोंदवत न्या. भारती डांगरे आणि न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला.

मॅक्ट बार असोसिएशनने प्रलंबित रिक्त पदे भरण्यासाठी आणि वकिलांना येणाऱ्या अडचणींसंदर्भात २०२२ मध्ये एक याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर न्या. भारती डांगरे आणि न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने दीर्घ सुनावणी घेतली. लेखा अधिकारी, सहाय्यक अधीक्षक आणि टायपिस्ट यांसारखी महत्त्वाची पदे रिक्त असल्याने न्यायालयाच्या दैनंदिन कामकाजात मोठा अडथळा निर्माण होत आहे. सध्या न्यायाधिकरणात सर्व ८ पीठासीन अधिकारी (न्यायाधीश) कार्यरत आहेत. मात्र, त्यांना पुरेशा कर्मचाऱ्यांचे पाठबळ मिळणे आवश्यक आहे. न्यायाधिकरणात हजारो खटले प्रलंबित आहेत. पीडितांना जलद गतीने न्याय मिळण्यासाठी न्यायालयाकडे पूर्ण कर्मचारी वर्ग असणे गरजेचे आहे, याकडे याचिकाकर्त्यांनी लक्ष वेधले. त्यांच्या याचिकेची गंभीर दखल घेत खंडपीठाने राज्य सरकारला न्यायाधिकरणातील रिक्त पदे तातडीने भरण्याचे आदेश दिले. याचिका जुनी असल्याने रिक्त पदांच्या संख्येत बदल झाला असू शकतो. त्यामुळे न्यायालयाने बार असोसिएशनला सामान्य प्रशासन विभागाकडे नवीन निवेदन सादर करण्याची परवानगी दिली आहे. राज्य सरकारने या निवेदनाची 'अत्यंत तातडीने' दखल घ्यावी, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सरकारने वेळेत पावले न उचलल्यास पुन्हा उच्च न्यायालयात येण्याचे स्वातंत्र्यही याचिकाकर्त्यांना दिले.

# वर्सोवा-दहिसर उन्नत मार्गासाठी १ हजार झाडांची होणार कत्तल

**बदल्यात १९ हजार झाडांचे पुनर्रोपण**

■ मुंबई

**वर्सोवा** - दहिसर एलिव्हेटेड म्हणजेच उन्नत मार्गामुळे मुंबईची वाहतूक कोंडी कमी करण्यास मोठी मदत होणार असली तरी या मार्गासाठी तब्बल १ हजार झाडांवर कुऱ्हाड चालवली जाणार आहे. यासंबंधीचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकणात मंजुरीसाठी मांडण्यात येणार आहे. दुसरीकडे या झाडांच्या बदल्यात १९ हजार ५७३ झाडांचे पुनर्रोपण पनवेलमध्ये करण्यात येणार आहे.

वर्सोवा-दहिसर मार्गाची कार्यवाही सध्या वेगाने सुरू आहे. यामध्ये वर्सोवा इंटरचेंज ते गोरेगावच्या बांगुर नगर दरम्यान रस्त्यात येणारी १८४ झाडे तोडण्यात येणार असून, १६४ झाडांचे पुनर्रोपण करण्यात येणार आहे. यारी रोड बोगदा परिसरातील झाडांच्या पुनर्रोपणाला प्राधान्य देण्यात येणार असून, त्याच्या बदल्यात ३७९५ नवीन झाडांचे पुनर्रोपण मुंबईबाहेर करण्यात येणार आहे. तर बांगूर नगर ते मालाड मायंडस्पेस या टप्प्यात २३६ झाडे तोडली जाणार असून, ३९३ झाडांचे पुनर्रोपण केले जाणार आहे, ही झाडे पवर्ड उद्यानात लावली जाणार असून पनवेल परिसरात ६१०७ झाडे लावण्यात येणार आहेत. मालाड मायंडस्पेस परिसरातील एमडीपी रोड या उपनगरातील महत्त्वाच्या मार्गावर सर्वाधिक परिणाम होणार आहे. येथे एकूण ८१५ झाडे बाधित होणार असून, त्यापैकी ११८ झाडे तोडली जाणार आहेत, तर ६९३ झाडांचे पुनर्रोपण केले जाणार आहे तर पनवेल परिसरात ६१०७ झाडे लावण्यात येणार आहेत.

# पाटण्यात गंगा नदीत बोट उलटली! ३ मृत! ५ बेपत्ता

**सात जणांना वाचवण्यात यश**

■ पाटणा

**बिहारच्या** पाटणा जिल्ह्यात गंगा नदीत आज १५ प्रवाशांना घेऊन जाणारी बोट उलटली. यात तीन जणांचा मृत्यू झाला आहे, तर पाच जण अद्याप बेपत्ता आहेत. ही घटना बरह येथील उमानाथ गंगा घाटाजवळ घडली.

दियारा परिसरात भाजीपाला तोडण्यासाठी गेलेले हे सर्वजण सकाळी परत येत असताना अचानक जोरदार वारा सुटल्याने बोट उलटली. बोट पलटताच प्रवाशांमध्ये एकच आरडाओरडा झाला. जवळील नावाड्यांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत सात जणांना वाचवण्यात यश मिळवले. मात्र उर्वरित प्रवासी नदीत बुडाले. या दुर्घटनेत लीला देवी (४०), नीलम कुमारी (३०) आणि काशी कुमार (१५) यांचा मृत्यू झाला आहे. पाच जणांचा शोध अद्याप सुरू असून, बचावकार्य सुरू आहे.

# पुण्यामध्ये पुन्हा गाड्यांची तोडफोड

■ पुणे

**पुण्यात** गाड्यांच्या तोडफोडीचे सत्र सुरूच आहे. पुण्यातील जनता वसाहत परिसरात अज्ञात व्यक्तींनी कोयत्याच्या सहाय्याने दुचाकी, चारचाकी तसेच टेम्पो वाहनांची तोडफोड करत परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

पर्वती पोलीस स्टेशनच्या हद्दीत काल रात्रीच्या सुमारास काही जणांनी हातात कोयते घेऊन परिसरात धुमाकूळ घातला. त्यांनी उभ्या असलेल्या २ चाकी चार चाकी आणि टेम्पोची काच फोडून मोठे नुकसान केले. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# शिरोळमधील यड्राव रस्त्यात खड्ड्यांचा वाढदिवस साजरा

■ कोल्हापूर

**शिरोळ** तालुक्यातील यड्राव फाटा चौकातील रस्ता गेल्या दीड वर्षांपासून खड्ड्यांमुळे अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्याच्या दुरवस्थेने नागरिक त्रस्त असल्याने सामाजिक कार्यकर्ते श्याम आठवले यांनी एक अनोखे आंदोलन छेडले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग हातकणंगले व लोकप्रतिनिधींच्या अक्षम्य दुर्लक्षाचा निषेध करत रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांचा वाढदिवस केक कापून साजरा केला.

यड्राव फाटा चौकातील या रस्त्यावर दररोज लहान-मोठे अपघात, वाहतूक कोंडी आणि धुळीचे साम्राज्य हे येथील नागरिकांच्या नशीबाचा भाग बनले आहे. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग हातकणंगले याकडे कायम दुर्लक्ष करत आला आहे.

# सोलापूरची प्रसिद्ध रीलस्टार रोहिणी पाराध्येची आत्महत्या



■ सोलापूर

**सोशल** मीडियावर व्हिडीओ करुन फार कमी वेळात प्रसिद्धी मिळवणारी सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील विवाहित रीलस्टार रोहिणी नीलेश पाराध्ये हिने स्वतःच्या हॉटेलच्या स्वयंपाकघरात गळफास लावून आत्महत्या केली. या घटनेमुळे तिचे चाहते आणि सोशल मीडिया वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी प्रसिद्ध रीलस्टार रोहिणी पाराध्ये (२५) हिचे पती नीलेश यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मागील काही वर्षापासून रोहिणी पाराध्ये व निलेश पाराध्ये हे पतीपत्नी विविध सामाजिक घटना व खाद्यपदार्थावर रील करीत सोशल मीडियामध्ये लोकप्रिय ठरले होते. या लोकप्रियतेनंतर त्यांनी रत्नागिरी-नागपूर या राष्ट्रीय महामार्गावर खवय्यासाठी ब्रह्मपुरी येथे 'हॉटेल ग्रामपंचायत' सुरू केले होते. या व्यवसायात ते स्थिर होऊन आणखी नवीन शाखा प्रस्तावित असताना अचानक पत्नी रोहिणी पाराध्ये हिने गळफास घेतला. पती निलेशने तिला उपचारासाठी मंगळवेढ्याच्या ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरानी मृत घोषित केले.

# मेट्रो २-बी मार्गिकेच्या कामात अडथळा ठरणारे स्टॉल हटवा

**उच्च न्यायालयाचे पालिकेला आदेश**

■ मुंबई

**मुंबई** मेट्रो २-बी मार्गिकेच्या कामात अडथळा ठरणारी रस्त्यावरील दुकाने, छोटेमोठे स्टॉल्स हटवा, असे सक्त आदेश उच्च न्यायालयाने महापालिका प्रशासनाला दिले. वैयक्तिक फायद्यासाठी सार्वजनिक पायाभूत सुविधांचे प्रकल्प रोखले जाऊ शकत नाहीत. व्यापक सार्वजनिक हित हे वैयक्तिक अडचणींपेक्षा जास्त महत्त्वाचे आहे, असे खडे बोल सुनावत न्यायालयाने मेट्रो मार्गिकेच्या प्रकल्पाच्या हद्दीतील स्टॉल हटवण्यास पालिकेला मुभा दिली.

मुंबईतील रहिवासी एन. तारानाथ शेट्टी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्या. जितेंद्र जैन यांनी निर्णय दिला. सुनावणीवेळी याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी स्टॉल्सवर कारवाई न करण्याबाबत युक्तिवाद केला. तथापि, न्यायालयाने सार्वजनिक प्रकल्पाचे महत्त्व विचारात घेत स्टॉलना दिलासा देण्यास स्पष्ट नकार दिला. काही खासगी व्यक्तींच्या विरोधामुळे महत्त्वाचे सार्वजनिक प्रकल्प रखडवता येणार नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. याचवेळी संबंधित दुकानदाराला १० दिवसांच्या आत जागा रिकामी करण्याचे आदेश दिले. तसेच मुदतीत जागा खाली न केल्यास पालिकेला पोलिसांच्या मदतीने दुकान हटवण्याचे आणि पाडण्याचे पूर्ण अधिकार न्यायालयाने दिले आहेत. मुंबई मेट्रो २-बी च्या स्टेशन बांधणीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नोव्हेंबर २०२५ मध्ये संबंधित दुकानदाराला दुकान इतरत्र हलवण्याची नोटीस बजावली होती. पालिकेने दुकानदाराला पुनर्वसनासाठी २७ पर्यायी जागांची ऑफर दिली होती. परंतु, या जागा व्यवसायासाठी सोयीस्कर नसल्याचे सांगत दुकानदाराने त्या नाकारल्या आणि न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने दुकानदाराच्या उपजीविकेच्या चिंतेची दखल घेतली. मात्र व्यापक सार्वजनिक हित हे वैयक्तिक अडचणींपेक्षा जास्त महत्त्वाचे असल्याचे नमूद करीत पालिका प्रशासनाला मेट्रो मार्गिका २-बीच्या कामासाठी तत्काळ जागा ताब्यात घेण्याची परवानगी दिली.

# सार्वजनिक बांधकाम विभागात शेकडो अभियंत्याच्या बदल्या

**एकाचवेळी घाऊक बदल्यांचा आदेश**

■ मुंबई

**राज्य** शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने एकाचवेळी ३२ कार्यकारी अभियंता आणि १९८ उपविभागीय अभियंत्यांच्या घाऊक बदल्यांचे जम्बो आदेश काढले आहेत. प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या या बदल्यांमध्ये मुंबई,पुणे, ठाणे, नाशिक. आणि छत्रपती संभाजीनगरसह राज्यातील अनेक महत्त्वाच्या विभागांतील अभियंत्यांचा समावेश आहे.

यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उत्तर मुंबई अंधेरी विभागाचे कार्यकारी अभियंता सचिन धात्रक यांची बदली ठाण्यात सार्वजिनक बांधकाम विभाग २ च्या कार्यकारी अभियंतापदी झाली आहे. तर धात्रक यांच्या जागी विशेष प्रकल्प विभाग आरे गोरेगावच्या कार्यकारी अभियंता गुंजन दिघावकर यांची वर्णी लागली आहे मुंबईतील एकात्मिक घटक विभागाचे कार्यकारी अभियंता भूषण फेगडे यांची बदली कार्यकारी अभियंता म्हणन विशेष प्रकल्प विभाग आरे गोरेगाव येथे झाली आहे. ठाणे क्रमांक २चे कार्यकारी अभियंता सत्यनारायण कांबळे यांची बदली महाड येथे करण्यात आली आहे. या बदल्यांमध्ये अनेक वर्षे एकाच जागी ठाण मांडून बसलेल्या अभियंत्यांचा मोठा भरणा आहे.

# शिरपूरमध्ये कठडे तोडून ट्रक अनेर नदीत

■ शिरपूर

**अंकलेश्वर-बऱ्हाणपूर** महामार्गावरील अनेर नदीच्या पुलावर आज पहाटे अपघात झाला. शिरपूरहून चोपड्याकडे जाणाऱ्या मालवाहू ट्रक अचानक पुलाच्या रेलिंगवर जाऊन आदळला. या धडकेने ट्रकने पुलाचे रेलिंग तोडले आणि थेट पुलावरून खाली कोसळल्याने अपघात झाला.

अपघाताचा जोरदार आवाज होताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ट्रक मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाला असून, चालक गंभीर जखमी झाला आहे. स्थानिकांच्या मदतीने जखमी चालकास बाहेर काढून तत्काळ शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# मुंबईतील वारसास्थळांना झळाळी खासगी संस्थेवर जबाबदारी



■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिकेच्या स्थायी समितीने फोर्ट परिसरातील फाऊंटन आणि १६ पुतळ्यांची स्वच्छता व देखभालीचे काम खासगी संस्थेकडे सोपवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. २.३७ कोटी रुपयांच्या या प्रस्तावाला मंजुरी देताना समितीने संवर्धन तज्ज्ञांची मदत घेण्याचे निर्देशही प्रशासनाला दिले. या कामासाठी 'जिर्णोद्धार कन्झर्व्हेटर्स प्रा. लि.' या संस्थेबरोबर कराराला मंजुरी देण्यात आली.

समिती सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की, अनेक वारसास्थळांची मूलभूत स्वच्छता आणि देखभाल होत नाही. फ्लोरा फाऊंटन, मेट्रो सिनेमा जंक्शनजवळील फिट्झगेराल्ड फाऊंटन, कूपरेज गार्डनमधील बँडस्टँड स्मारक, जीपीओजवळील देविदास पुरुषोत्तम कोठारी प्याऊ आणि मिंट रोडवरील रुस्तुमजी मुलजी फाऊंटन यांचा करारात समावेश आहे. देखभालीसाठी निवडण्यात आलेल्या १६ पुतळ्यांमध्ये गेटवे ऑफ इंडियाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, मादाम कामा रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा आणि कूपरेज गार्डनमधील राजीव गांधी यांचा पुतळा यांचा समावेश आहे. वीर नरिमन रोडवरील महादेव गोविंद रानडे, सोराबजी शापूरजी बंगाली, गोपाळ कृष्ण गोखले आणि डी. एन. रोडवरील भाटिया गार्डनमधील दिनशॉ माणेकजी पेटिट यांच्या संगमरवरी पुतळ्यांचाही या प्रस्तावात समावेश करण्यात आला आहे.

# अर्थखाते राष्ट्रवादीलाच द्यावे! युगेंद्र पवारांची मागणी

■ बारामती

**उपमुख्यमंत्री** अजित पवार यांच्या अपघाती निधनाला आज चार महिने पूर्ण झाले आहेत. ते सांभाळत असलेले अर्थखाते अद्यापही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच आहे. अर्थखाते उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना देण्यात आलेले नसल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत नाराजी व्यक्त केली होती. यावरून शरद पवार गटाचे नेते युगेंद्र पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे द्यावे, अशी मागणी केली आहे.



युगेंद्र पवार बारामती दौऱ्यावर असताना प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेसला अर्थातच सुनेत्रा पवारांना दिलेच पाहिजे, कारण ते यापूर्वी दादांकडे होते. केवळ आताच नाही, तर बऱ्याच वर्षांपासून अजितदादा अर्थमंत्री होते. यावर्षीचे अर्थसंकल्पीय अधिवेशन त्यांनी मांडले असते, तर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम अजितदादांच्या नावावर झाला असता. अजित पवार यांच्या अपघाताच्या चौकशीबाबत ते म्हणाले की, अजितदादांसारख्या मोठ्या नेत्याच्या अपघाताची चौकशी जर इतक्या धीम्या गतीने होत असेल, तर सर्वसामान्य जनतेने न्यायासाठी कुणाकडे बघायचे? असा गंभीर प्रश्न आमच्या मनात निर्माण होत आहे.

# लवकरच लॉकडाऊनसारखे दिवस काँग्रेसच्या विजय वडेट्टीवारांचा दावा



■ नागपूर

**देशातील** गरीब आणि मध्यमवर्गीय जनतेला मारण्यासाठीच हे सरकार आले आहे. आर्थिक अस्थिरतेमुळे भविष्यात पुन्हा लॉकडाऊनसारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते असा गंभीर दावा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. नागपुरात पत्रकार परिषदेत त्यांनी केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर टीका केली.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, देशात पुन्हा एकदा लॉकडाऊनसारखे दिवस येणार आहेत. जनतेने सरकारच्या विश्वासावर कुठेही पैसे गुंतवू नये. कारण ते परत मिळणार नाही. सरकारने बँकासुद्धा रिकाम्या केल्या आहेत. जनतेने पैसे सुरक्षित ठेवले पाहिजेत. रिझर्व्ह बँकेतील पैसे सरकारने काढून घेतले आहे. देश सर्वच बाजूनी संकटात आहे. लोकांचा जीव जात असताना सरकारचे त्याकडे लक्ष नाही. महत्त्वाच्या प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी पुन्हा धार्मिक तेढ निर्माण केली जाईल.

इंधन दरवाढीवर बोलताना ते म्हणाले की, पुढील महिनाभरात पेट्रोल १७० रुपये आणि डिझेल १५० रुपये प्रति लिटरपर्यंत जाऊ शकते. सरकार इंधन तुटवडा नसल्याचा दावा करत असले, तरी अनेक ठिकाणी विमानांची उड्डाणे रद्द केली जात आहेत. त्यामुळे इंधन टंचाई असल्याचे सरकारने मान्य केले पाहिजे. देशात धार्मिक तेढ निर्माण करणे हा सत्ताधाऱ्यांचा धंदाच झाला आहे. सरकारने जाहीरनाम्यात याचा उल्लेख केला पाहिजे. यांनी संविधानाची भाषा करूच नये. दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम सातत्याने सुरू आहे. सरकारमधील मंत्री हे असंवेदनशील आहेत. ते मंत्रिपदाच्या शपथेचा भंग करत आहेत.

# खारदांडा समुद्रात मासेमारी बोट उलटली! एकाचा मृत्यू

■ मुंबई

**वांद्रे** येथील खारदांडा परिसरातील समुद्रात मासेमारी करत असताना बोट उलटल्याने दोन जण पाण्यात बुडाल्याची घटना काल बुधवारी सायंकाळी ६.१५ वाजता घडली. या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला तर दुसरा सुदैवाने बचावला. खारदांडा परिसरातील वारिन पाडा येथील दीपगृहाजवळ घडलेल्या या दुर्घटनेत अशोक किशन राठोड (५५) यांचा मृत्यू झाला असून, केतन राठोड (३२) हे जखमी झाले. मासेमारीसाठी गेलेली बोट समुद्रात उलटल्याने दोघेही पाण्यात पडले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दोघांनाही समुद्रातून बाहेर काढत उपचारासाठी वांद्रे येथील भाभा पालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु अशोक राठोड यांना रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी ते मृत झाले असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. तर केतन राठोड (३२) यांची प्रकृती स्थिर असून त्यांना डिस्चार्ज देण्यात आला.

# महापालिका व म्हाडा यांच्यातील स्कायवॉकचा वाद पाच वर्षांनी मिटला

■ मुंबई

**धारावीत** म्हाडाने बांधलेला स्कायवॉक पालिकेने देखभाल दुरूस्तीसाठी ताब्यात घ्यावा या मागणीवरून दोघांमध्ये चर्चाच्या सातत्याने जोरबैठकांचे सत्र सुरू होते. अखेर पाच वर्षांनी या वादावर तोडगा निघाला आहे आणि स्कायवॉक पालिकेने ताब्यात घेतले आहे, अशी माहिती म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या कार्यालयातून देण्यात आली.

धारावी ते माहिम रेल्वे स्थानक जोडणारा ५३५ मीटर लांबीचा स्कायवॉक म्हाडाने दोन टप्प्यात बांधून सन २०२१ रोजी काम पूर्ण केले होते. यानंतर हा स्कायवॉक देखभाल दुरूस्तीसाठी महापालिकेने ताब्यात घ्यावा, असा तगादा लावण्यात येत होता. मात्र पालिकेची एकच अट होती. आम्ही स्कायवॉक ताब्यात घेतो. म्हाडाने स्ट्रक्चरल ऑडिट करून द्यावे किंवा या कामासाठी ७५ लाख रुपये द्यावेत. या अटींमुळे म्हाडा अक्षरशः बुचकळ्यात पडली होती, असे म्हाडा मुंबई मंडळ कार्यालयातून पुढे सांगण्यात आले की, अखेर हा प्रश्न निकाली काढण्यासाठी म्हाडाने आपल्या तिजोरीतील ७५ लाख रुपये महापालिकेला स्कायवॉकच्या स्ट्रक्चरल ऑडिटसाठी अदा करून स्कायवॉक पालिकेने ताब्यात घेतला. त्यामुळे स्ट्रक्चरल ऑडिटचा प्रश्न निकाली निघाला.

# माथेरान-नेरळ-कळंब रस्त्यावर जड वाहनांना बंदी



■ रायगड


**माथेरान**-नेरळ-कळंब (एसएच-१०९) या महत्त्वाच्या मार्गावरील रस्ता सुधारणा कामांमुळे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तात्पुरती बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, माथेरान हे प्रमुख पर्यटनस्थळ असल्यामुळे शनिवार, रविवार आणि सलग सुट्ट्यांच्या दिवशी येथे पर्यटकांची मोठी गर्दी होते. नेरळ-माथेरान घाट रस्ता हा प्रवेशासाठी एकमेव मार्ग असल्याने दस्तुरी नाका येथे पार्किंगची मर्यादित सुविधा आहे. परिणामी अनेक वाहनचालक घाट रस्त्यावरच वाहने उभी करतात, ज्यामुळे वाहतूक कोंडी आणि अपघाताचा धोका वाढतो. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी रस्ता दुरुस्तीची कामे फक्त सोमवार ते गुरुवार या कालावधीतच करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच काम सुरू असताना सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी लागू करण्यात आली आहे. दरम्यान, दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला आणि पाणी यांसारख्या जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना या बंदीतून सूट देण्यात आली आहे.

# धावत्या लोकलमधून प्रवाशाने मारली उडी

**दोन्ही हातपाय कापले**

■ बदलापूर




**बदलापूरहून** कर्जतकडे जाणाऱ्या लोकलमधील एका ४५ वर्षीय प्रवाशाने समोरून येणाऱ्या एक्स्प्रेस गाडीच्या दिशेने उडी मारल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत संबंधित प्रवाशाचे दोन्ही हात व पाय कापले गेले आहेत. त्याच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

बदलापूरहून कर्जतच्या दिशेने रवाना झालेल्या लोकलमध्ये संबंधित प्रवासी प्रवास करत होता. ही लोकल बदलापूर स्थानकापासून अवघ्या शंभर मीटर अंतरावर गेल्यानंतर समोरून मुंबईच्या दिशेने येणारी एक्स्प्रेस पाहताच त्या व्यक्तीने अचानक चालत्या लोकलमधून उडी मारली. यात त्याचे दोन्ही हातपाय कापले गेले. या प्रवाशाची उशिरापर्यंत ओळखली पटली नव्हती. सध्या या प्रवाशावर सायन येथील पालिकेच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याने लोकलमधून का उडी मारली याचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# तोंडचे पाणी पळवणाऱ्या झळा

उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागल्यानंतरच महाराष्ट्रातील पाण्याचा प्रश्न देखील गाजू लागतो. हा साधारणपणे दरवर्षीचा अनुभव आहे. यंदा मे महिन्यातच राज्यातील अनेक धरण आणि जलसाठे कोरडे पडायला सुरुवात झालेली आहे. गेल्यावर्षी इतकी तीव्रता जाणवत नव्हती. कारण पावसाचे प्रमाण भरपूर होते आणि पाणी टिकवून ठेवण्यात सगळ्याच संस्थांना यश आले होते. म्हणजेच महापालिका असतील किंवा राज्य सरकारचा जलसिंचन विभाग असेल. त्यांनी पाणी टिकवून ठेवण्यासाठी जे प्रयत्न केले ते यशस्वी ठरले होते. परंतु यंदाच्या अल निनोच्या धोक्यामुळे उष्णतेचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. तापमानामध्ये झालेली वाढ आता असलेल्या जलसाठ्यांचही बाष्पीभवन करते आहे. परिणामी जलसाठा असूनही पाणी वेगाने कमी होत असल्याचा प्रकार पाहायला मिळतो. विशेष म्हणजे वेधशाळांनी सुद्धा आता पाऊस लांबण्याची शक्यता व्यक्त केलेली आहे. दोन महिन्यांपूर्वी पाऊस जूनच्या पहिल्या आठवड्यात येईल अशा प्रकारचा अंदाज व्यक्त झाला होता. परंतु बदललेल्या हवामानाचे स्वरूप लक्षात घेता यंदाचा पाऊस हा १५ जूनपर्यंत लांबेल की काय अशी भीती व्यक्त होऊ लागलेली आहे. अशा परिस्थितीत आता १५ जून पर्यंत पाणीपुरवठा करणे ही गोष्ट खूपच कसोटी पाहणारी किंबहुना राज्याच्या अनेक भागांमध्ये पाण्याचं मोठं दुर्भिक्ष्य निर्माण करणारी ठरू शकते.

**पाणी प्रश्नाची प्राधान्यताच नाही**

पाण्याची टंचाई आणि त्यावर मात करण्यासाठी आतापर्यंत होत असलेल्या उपाययोजना ह्या पुरेशा ठरलेल्या नाहीत असा त्याचा दुसरा अर्थ होतो. म्हणूनच मुख्यमंत्र्यांनी अलीकडेच घेतलेल्या बैठकीमध्ये येणाऱ्या अल निनोच्या तडाख्याचा विचार करून पाणी साठवण्याची आतापासूनच व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या गेलेल्या आहेत. काही ठिकाणी बोअरवेल तर काही ठिकाणी रेन हार्वेस्टिंग सारखे प्रकार अंमलात आणण्याच्या सूचना दिल्या गेल्या आहेत. आता बोअरवेलच्या माध्यमातून पाणी शोधण्याचा प्रकार म्हणजे आग लागल्यानंतर बंब शोधण्यासारखी परिस्थिती ठरते. खरे तर राज्याच्या जलसिंचन विभागाला अल निनोची पूर्ण कल्पना आली होती. परंतु उपाययोजना करण्याबाबत ज्या वेगाने हालचाली व्हायला हव्या त्या झाल्या नाहीत आणि आता असलेले जलसाठे कसे टिकवता येतील यावर विचारविनिमय सुरू झालेला आहे. परंतु हा सगळाच प्रकार उशिरा सुचलेल्या शहाणपणासारखा ठरतो. एकीकडे दरवर्षी महाराष्ट्र पिण्याच्या पाण्यासाठी व्याकुळ होत असतो. परंतु एकही ठोस योजना अंमलात येत नाही. नदीजोड प्रकल्पाची घोषणा होऊन पाच वर्षे झाली. कोणतेही भक्कम पाऊल पुढे पडले नाही. काही नद्या जरी जोडल्या तरी ग्रामीण आणि निमशहरी भागाची पाण्याची तहान कायमच राहणार आहे. गुजरातने रेन हार्वेस्टिंग केले त्या पद्धतीचा अभ्यास करायला सांगितले जाते आहे का? महाराष्ट्र स्वत:च जलसिंचनाचे मॉडेल तयार करू शकत नाही का? जलयुक्त शिवार योजना मध्येच धीमी का झाली? कारण सरकार पाणी प्रश्नावर प्राधान्याने आणि गांभीर्याने कामच करत नाही. आता मुंबई-पुणे मिसिंग लिंक सुरू झाला. त्यासाठी काही हजार कोटी खर्च झाले. आता या महार्गावरच्या वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन पुन्हा नवा आठपदरी रस्ता बांधायला मंजुरी मिळाली. त्यासाठी केंद्राकडून मदत घेऊन ४० हजार कोटीचा खर्च केला जाणार आहे. म्हणजे तिथल्या भविष्यकाळातील वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन तातडीने उपाय केला गेला. परंतु पाण्यासाठी इतकी तातडी का नाही दाखवली जात? कारण सरकारला तो प्रश्न महत्त्वाचा वाटत नाही.

**टँकर लॉबी सक्रिय**

महाराष्ट्रातील निम्मा भाग आज दुष्काळाच्या छायेमध्ये आल्याची स्थिती पाहायला मिळते. अगदी मराठवाड्यातील प्रसिद्ध नाथसागर म्हणजेच जायकवाडी धरण सुद्धा कोरडे पडायला सुरुवात झालेली आहे. राज्यातील सगळी मोठी धरणे आज ३० ते ३५ टक्केच पाणी साठा टिकवून आहेत. हा पाणीसाठा फार उपयोगी पडणारा नाही. साधारणपणे जूनमध्ये पाऊस पडायला सुरुवात झाली की, या साठ्यामध्ये थोडीफार भर पडते आणि पुढे मग एक दीड महिना पाणीपुरवठा करणे शक्य होते. परंतु यावेळी जूनच्या अखेरीपर्यंत पुरेसा पाऊस पडण्याची शक्यता दिसत नाही. या पाणीटंचाईसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची काटकसर आणि अन्य मार्गाने म्हणजेच राज्याच्या अनेक भागांमध्ये रेल्वे टँकरने सुद्धा पाणी पुरवण्याची वेळ होऊ शकते. पाण्याचे रेशनिंगही करावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः सगळ्या मोठ्या शहरांमध्ये पाणीटंचाईच्या झळा पोहोचू लागल्या आहेत आणि ठिकठिकाणी दहा ते पंधरा टक्के पाणी कपातीला सुरुवात झालेली आहे. पण ती प्रत्यक्षात पाणीकपात आज २५ ते ३० टक्क्यांवर जाऊन पोहोचलेली आहे. कारण महापालिका किंवा ठिकठिकाणच्या नगरपरिषदेतर्फे पुरवले जाणारे पाणी हे कधीच पुरेसे ठरलेले नाही. आज अनेक भागांमध्ये चार ते पाच दिवसांनंतर केवळ दीड-दोन तास पिण्याचे पाणी उपलब्ध होते. तर मोठ्या म्हणजेच पुणे, नागपूर, संभाजीनगर यासारख्या शहरांमध्ये थोडावेळ उपलब्ध होणारे पाणी हे नागरिकांची तहान भागवू शकत नाही. परिणामी राज्यभरात मोठ्या प्रमाणावर टँकरच्या माध्यमातून अनेक गृहनिर्माण संस्थांना आपली पाण्याची गरज भागवून घ्यावी लागते आहे. आज राज्यभर टँकर लॉबी ही मोठ्या प्रमाणात सक्रिय झाली. कारण लोकांची मागणी इतकी प्रचंड वाढली आहे की, गेल्या वर्षीपेक्षा यंदा जवळपास दीडपट जास्त टँकर वेगवेगळ्या महानगरांमध्ये सोसायट्यांना पाणी पुरवताना दिसून येतात. अल निनोने केवळ तापमानात वाढ केलेली नाही. तर उन्हाळ्यापूर्वीच पाण्याच्या टंचाईच्या खर्चाचे तीव्र संकट निर्माण केले होते. एकीकडे अनेक प्रकारच्या वस्तूंची टंचाई जाणवत असताना पाण्यानेदेखील लोकांना कसोटी पाहायला सुरुवात केली आहे.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

समोरचा चुकतोय हे माहीत असतानाही
काही लोक त्याचं समर्थन करतात.
कारण त्यांना सत्यात नाही, तर स्वार्थात इंटरेस्ट असतो!
फायदा दिसला की हे लोक मातीला सोनं म्हणतात.

## पंचांग

**शुक्रवार, २९ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

*** अधिक ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशी**
**नक्षत्र : स्वाती**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० तूळ**

**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-१०**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबावदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### गोवन फिश करी

★ **साहित्य :** १/२ किलो मासे (सुरमई/पापलेट/रावस - आपल्या आवडीप्रमाणे) १ कप किसलेले ओले खोबरे, बारीक चिरलेले २ कांदे, बारीक चिरलेले २ टोमॅटो, २-३ कोकम (किंवा चिंच), २-३ हिरव्या मिरच्या, १ टीस्पून हळद, २ टीस्पून लाल तिखट, १ टीस्पून धणे पावडर, ६-७ लसूण पाकळ्या, १ इंच आल्याचा तुकडा, १ टीस्पून जिरे, ६-७ काळी मिरी, २ टेबलस्पून तेल, चवीनुसार मीठ.



★ **कृती :** सर्वप्रथम माशांचे तुकडे स्वच्छ धुऊन मीठ आणि थोडी हळद लावून १० मिनिटे बाजूला ठेवा.
मिक्सरमध्ये ओले खोबरे, लसूण, आले, जिरे, मिरी, लाल तिखट, धणे पावडर आणि थोडे पाणी घालून बारीक वाटून घ्या.
कढईत तेल गरम करून त्यात कांदे परता. कांदे सोनेरी रंगाचे झाले की, त्यात टोमॅटो घालून मऊ होईपर्यंत परता.
आता वाटलेला मसाला घालून ५ मिनिटे परतून घ्या.
त्यात २-३ कप पाणी घालून मीठ आणि हळद घाला. चांगले उकळू द्या. उकळी आल्यावर कोकम टाका आणि त्यात माशांचे तुकडे सावकाश सोडा. झाकण ठेवून ७-८ मिनिटे मंद आचेवर शिजू द्या. मासे शिजले की गॅस बंद करा. वरून थोडी ताजी कोथिंबीर भुरभुरा.
गोअन फिश करी गरम भाताबरोबर किंवा भाकरीसोबत खूपच टेस्टी लागते.

## क्रीडा

# अंतिम फेरीच्या उंबरठ्यावर गुजरात विरुद्ध राजस्थान भिडणार

## गिल-वैभवच्या बॅटिंगची आतषबाजीत कोण बाजी मारणार?




**गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स यांच्यातील क्वालिफायर-२चा सामना अंतिम फेरीचे तिकीट मिळवण्यासाठी चुरशीचा ठरणार आहे. चंदीगडच्या महाराजा यादवेंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणाऱ्या या लढतीत दोन्ही संघ विजयासाठी सर्वस्व पणाला लावतील. एका बाजूला कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वात गुजरात पुनरागमनाच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे, तर दुसरीकडे युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या तडाखेबाज फलंदाजीच्या जोरावर राजस्थानचा आत्मविश्वास उंचावलेला आहे. त्यामुळे चौकार-षटकारांची आतषबाजी, वेगवान गोलंदाजीचा थरार रंगणार आहे.**

■ चंदीगड

**राजस्थान** रॉयल्सने एलिमिनेटरमध्ये सनरायझर्स हैदराबादचा धुव्वा उडवला. वैभव सूर्यवंशीने खेळलेली २९ चेंडूंतील ९७ धावांची तुफानी खेळी अजूनही चर्चेत आहे. याशिवाय यशस्वी जैस्वाल, रियान पराग आणि शिमरॉन हेटमायर हे फलंदाज कोणत्याही गोलंदाजी आक्रमणाचा समाचार घेण्याची क्षमता ठेवतात. गोलंदाजीत जोफ्रा आर्चर आणि प्रसिद्ध कृष्णा यांच्यावर जबाबदारी असेल. आर्चरने यंदाच्या मोसमात २४ विकेट घेत राजस्थानसाठी सर्वाधिक यशस्वी गोलंदाज ठरला आहे.

दुसरीकडे, गुजरात टायटन्सला क्वालिफायर-१ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून पराभवाचा धक्का बसला होता. २५५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना गुजरातची फलंदाजी पूर्णपणे कोलमडली. मात्र, राहुल तेवतियाने अखेरपर्यंत झुंज देत संघाची लाज राखली. आता राजस्थानविरुद्ध पुनरागमन करण्यासाठी गुजरातला कर्णधार शुभमन गिल, साई सुदर्शन आणि जोस बटलरकडून मोठ्या खेळीची अपेक्षा असेल. गोलंदाजीत कागिसो रबाडा आणि रशीद खान यांची कामगिरी गुजरातसाठी निर्णायक ठरू शकते. पॉवरप्लेमध्ये विकेट मिळवण्यात गुजरात यशस्वी ठरल्यास राजस्थानवर दबाव निर्माण होऊ शकतो. सामन्याच्या अंदाजानुसार राजस्थान रॉयल्सचे पारडे किंचित जड आहे. वैभव सूर्यवंशीची स्फोटक फलंदाजी आणि आर्चरची वेगवान गोलंदाजी गुजरातसाठी मोठे आव्हान ठरू शकते. मात्र, शुभमन गिल आणि साई सुदर्शन फॉर्ममध्ये आल्यास गुजरातही सामन्याचे चित्र बदलू शकते.

## ब्लंडेलच्या शतकाने न्यूझीलंड मजबूत आयर्लंडवर पहिल्याच दिवशी दबाव

■ बेलफास्ट

**न्यूझीलंड** क्रिकेट संघाने आयर्लंडविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात पहिल्याच दिवशी मजबूत पकड मिळवली. बेलफास्ट येथे सुरू असलेल्या सामन्यात दिवसअखेर न्यूझीलंडने ५ बाद ३६१ धावांचा भक्कम डोंगर उभा केला. टॉम ब्लंडेल १४२ धावांवर, तर पदार्पणवीर डीन फॉक्सक्रॉफ्ट ३८ धावांवर नाबाद राहिला.

नाणेफेक जिंकून फलंदाजीला उतरलेल्या न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली आणि मार्क अडायर याने सुरुवातीला ४ मोठे धक्के दिले. मात्र रचिन रवींद्र आणि टॉम ब्लंडेलने पाचव्या विकेटसाठी २१७ धावांची विक्रमी भागीदारी करत डाव सावरला. रचिनने शतक झळकावले, तर ब्लंडेलने नाबाद शतकी खेळी करत न्यूझीलंडला मजबूत स्थितीत पोहोचवले. आयर्लंडकडून या सामन्यात तीन वेगवान गोलंदाजांनी पदार्पण केले. लियाम मॅकार्थी याने केन विल्यमसनचा महत्त्वाचा बळी घेत कसोटी कारकिर्दीतील पहिले विकेट मिळवले. मात्र उर्वरित गोलंदाजांना प्रभाव पाडता आला नाही.पहिल्या सत्रात वर्चस्व गाजवणाऱ्या आयर्लंडला रचिन- ब्लंडेल जोडी फोडण्यात अपयश आले आणि दिवसअखेर न्यूझीलंडने सामन्यावर मजबूत पकड निर्माण केली.

## नवा प्रवास सुरू! सूर्यकुमारच्या एक्स पोस्टमुळे चर्चांना उधाण

■ मुंबई

**भारतीय** टी-२० संघाचा स्टार फलंदाज आणि चाहत्यांचा लाडका क्रिकेटपटू सुर्य्कुमार यादव पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. रहस्यमय एक्स पोस्टमुळेक्रिकेटविश्वात चर्चांना उधाण आले आहे.

आयपीएलचा हंगाम रंगात आलेला असताना सूर्यकुमार यादवने अचानक एक पोस्ट करत चाहत्यांना संभ्रमात टाकले. त्याने एक्सवर लिहिले की,मित्रांनो, मी आता आणखी मोठ्या प्रवासाला सुरुवात करत आहे. आयुष्याच्या एका नव्या अध्यायात पाऊल ठेवत आहे. एका वेगळ्या वेगात. यालाच म्हणतात टी-६० जीवन. या पोस्टनंतर चाहत्यांच्या प्रतिक्रिया अक्षरशः पूरासारख्या येऊ लागल्या. अनेकांनी सूर्यकुमार कोणता मोठा निर्णय घेणार? तो क्रिकेटमधून काही नवीन घोषणा करणार का? टी-६० जीवन म्हणजे काय? असे प्रश्न उपस्थित केले.

## प्रज्ञानंदचा कार्लसनला शह तर दिव्या देशमुखची विजयी चाल

■ ओस्लो

**नॉर्वेमध्ये** सुरू असलेल्या प्रतिष्ठेच्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत भारतीय बुद्धिबळपटूंनी शानदार कामगिरी करत पुन्हा एकदा जगाचे लक्ष वेधून घेतले. पुरुष विभागात युवा ग्रँडमास्टर आर.प्रज्ञानंदने जगातील अव्वल बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसनला शह दिला. तर महिला विभागात दिव्या देशमुखने आपली विजयी मालिका कायम ठेवली.

प्रज्ञानंदच्या क्लासिकल फॉरमॅटमधील या विजयामुळे त्याने तीन गुणांची कमाई करत गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली. यापूर्वीही २०२४ मध्ये त्याने कार्लसनला पराभूत केले होते. सामना अत्यंत चुरशीचा झाला. मात्र टाइम प्रेशरमध्ये प्रज्ञानानंदाने अचूक चाली




खेळत कार्लसनला बचावाची संधी दिली नाही. महिला विभागात भारताच्या दिव्या देशमुखने जबरदस्त खेळ कायम ठेवत स्पर्धेतील आघाडीवर असलेल्या बिबिसारा असाउबायेवाला पराभूत केले. हा तिचा सलग तिसरा टायब्रेकर विजय ठरला. या विजयामुळे दिव्या ४.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचली.

दुसरीकडे, विश्वविजेता डी. गुकेश याची खराब मालिका कायम राहिली. फ्रान्सच्या अलीरेझा फिरोजाविरुद्धचा क्लासिकल डाव बरोबरीत सुटल्यानंतर टायब्रेकरमध्ये गुकेशला पराभव पत्करावा लागला. जवळपास पाच तास चाललेल्या लढतीनंतर फिरोजाने निर्णायक डावात अचूक खेळी करत विजय मिळवला. दुखापत असूनही फिरोजा प्रभावी खेळ करत असून तो ७.५ गुणांसह अव्वल स्थानावर आहे.

## २०३० राष्ट्रकुल स्पर्धांसाठी डिजिटल क्रीडा व्यवस्थेवर भर

**नवी दिल्ली -** भारत सरकार २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या तयारीसाठी क्रीडा क्षेत्रात मोठे बदल करण्याच्या तयारीत आहे. खेळाडूंना आधुनिक सुविधा मिळाव्यात आणि क्रीडा संघटनांचे काम अधिक वेगाने व व्यवस्थित व्हावे यासाठी क्रीडा मंत्रालय राष्ट्रीय क्रीडा संघटनांसाठी आयटी सल्लागार नेमणार आहे.

अहमदाबादमध्ये होणाऱ्या २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धांचा विचार करून हा निर्णय घेतला जात आहे. या माध्यमातून विविध क्रीडा संघटनांच्या डिजिटल प्रणाली अधिक मजबूत केल्या जाणार आहेत. स्पर्धांचे नियोजन, प्रशिक्षण शिबिरे, खेळाडूंची नोंदणी, प्रशासकीय कामे आणि स्पर्धांचे निकाल यासाठी आधुनिक डिजिटल प्रणालीचा वापर वाढवला जाणार आहे.

## पॅरा भालाफेकीत स्वत:चाच विक्रम मोडत सुमित अंतिलने पुन्हा रचला इतिहास

■ बंगळूरू

**भारतीय** पॅरा भालाफेकपटू सुमित अंतिलने पुन्हा एकदा इतिहास रचत स्वतःचाच जागतिक विक्रम मोडला आहे. बंगळूरूमध्ये झालेल्या इंडियन ओपन पॅरा थलेटिक्स स्पर्धेत सुमितने ७४.८२ मीटर लांब भाला फेकत नवा विश्वविक्रम आपल्या नावावर केला.

यापूर्वी सुमितने २०२३ मध्ये चीनमधील हांगझोऊ येथे झालेल्या आशियाई पॅरा गेम्समध्ये ७३.२९मीटरची फेक करत विश्वविक्रम केला होता. आता त्याने तो विक्रम १.२३ मीटरने सुधारला आहे. विक्रम केल्यानंतर सुमित म्हणाला, मी खूप दिवसांपासून विचार करत होतो की विश्वविक्रम का मोडता येत नाही. आज मी फक्त माझी सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी मैदानात उतरलो होतो. माझा विक्रम आणखी सुधारल्याचा



आनंद आहे. सुमितने आतापर्यंत तब्बल सात वेळा जागतिक विक्रम मोडला आहे. २०१९ मध्ये इटलीमध्ये त्याने पहिल्यांदा विश्वविक्रम केला होता. त्यानंतर दुबई, बेंगळुरू, टोकियो पॅरालिम्पिक, पॅरिस वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि आशियाई पॅरा गेम्समध्येही त्याने सातत्याने नवे विक्रम प्रस्थापित केले.

## दादरमध्ये रंगली खो-खोची लढत! अनेक संघांचा शानदार विजय

■ मुंबई

मुंबई खो-खो संघटनेतर्फे आयोजित मुंबई महापौर चषक खो-खो स्पर्धेत पुरुष आणि महिला गटातील सामने रंगतदार झाले. दादर येथील छत्रपती शिवाजी उद्यानात सुरू असलेल्या या स्पर्धेत अनेक संघांनी दमदार खेळ करत विजय मिळवला.

पुरुष गटात सरस्वती स्पोर्ट्स क्लब, प्रबोधन क्रीडा भवन, वैभव स्पोर्ट्स क्लब, श्री सह्याद्री, श्री समर्थ व्यायाम मंदिर, ॐ समर्थ भारत व्यायाम मंदिर आणि विद्यार्थी क्रीडा केंद्र यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजयी आगेकूच कायम ठेवली. महिला गटात ॐ साईश्वर सेवा मंडळ आणि अमरहिंद मंडळ यांनी प्रभावी कामगिरी करत विजय मिळवला.स्पर्धेचे उद्घाटन नगरसेवक व प्रभाग



समिती अध्यक्ष यशवंत किल्लेदार यांच्या हस्ते झाले. यावेळी ड. अरुण देशमुख, बाळासाहेब तोरसकर, सुरेंद्र विश्वकर्मा, प्रशांत पाटणकर, नरेंद्र कुंदर, पराग आंबेकर आणि नितीन पाष्टे उपस्थित होते.

पुरुषांच्या सामन्यात सरस्वती स्पोर्ट्स क्लबने समता क्रीडा भवनचा १६-८ असा पराभव केला. कुशांग वैश्य, शुभम कांबळे, रहीस शेख आणि विनय परीट यांनी उत्कृष्ट खेळ करत संघाचा विजय निश्चित केला.महिलांच्या गटात ॐ साईश्वर सेवा मंडळने समता क्रीडा भवनचा १०-४ असा सहज पराभव केला. वैष्णवी परबने तब्बल ९ मिनिटे संरक्षण करत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. तसेच प्रांजल पाठक, रिया कदम आणि विद्या मटकर यांनीही चांगली साथ दिली.

# मोहम्मद दीपकची जिम बंद होण्याच्या मार्गावर! 'आप'च्या संजय सिंहांची मदत



■ नवी दिल्ली

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**एका** मुस्लीम दुकानदाराची बाजू घेतल्याने देशभरात चर्चेत आलेला उत्तराखंडमधील जिम प्रशिक्षक दीपक कुमार, ज्याला मोहम्मद दीपक म्हणूनही ओळखले जाते, सध्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्याची जिम बंद होण्याच्या मार्गावर आहे.

अनेक महिने भाडे न भरल्याने इमारतीच्या मालकाने जिम रिकामी करण्यास सांगितली आहे. ही माहिती समजल्यानंतर आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह यांनी पुढाकार घेतला. त्यांनी दीपक कुमार यांना आपल्या पगारातून ५०,००० रुपये मदत म्हणून पाठवले. याबाबत त्यांनी एक्सवरही ही माहिती शेअर केली. संजय सिंह यांनी आपल्या पोस्टमध्ये सांगितले की, केवळ माणुसकीच्या नात्याने मदत केल्यामुळे कोणालाही शिक्षा होऊ नये. एका गरजू व्यक्तीला मदत करणे हे चुकीचे नाही. संजय सिंह इतर लोकांनाही दीपक यांना आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले आहे. दीपक यांची जिम सध्या बंद होण्याच्या मार्गावर आहे.

देश विदेश

# ढाक्यात रुग्णालयात गॅसगळती सहा नवजात बालकांचा मृत्यू

■ ढाका

**बांगलादेशची** राजधानी ढाका येथील अद-दिन रुग्णालयातील एका वॉर्डमध्ये वातानुकूल यंत्रातून (एसी) गॅसगळती झाल्याने सहा नवजात बालकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे.

एसी यंत्रणेत बिघाड झाल्यानंतर गॅसगळती झाली. त्यानंतर वॉर्डमधील काही नवजात बालकांची प्रकृती अचानक बिघडली. काही बालकांना तातडीने एनआयसीयूमध्ये हलवण्यात आले होते. मात्र सहा बालकांचा मृत्यू झाला. घटनेवेळी त्या वॉर्डमध्ये ११ महिला आणि त्यांची नवजात बालके दाखल होती. मृत बालकांच्या नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. रात्री पुरेसे डॉक्टर आणि नर्स उपस्थित नव्हते. तसेच वेळेवर उपचार मिळाले नसल्याचा दावा कुटुंबियांनी केला.

# सिंगापूर कोर्टाने बायजू रवींद्रनना सहा महिन्यांची शिक्षा सुनावली

■ सिंगापूर

**बायजूचे** संस्थापक बायजू रवींद्रन यांना सिंगापूरमधील न्यायालयाने न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. मागितलेली कागदपत्रे आणि माहिती वेळेत न दिल्यामुळे न्यायालयाने हा निर्णय दिला.

न्यायालयाने रवींद्रन यांना अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे, ९० हजार सिंगापूर डॉलर्सचा कायदेशीर खर्च जमा करण्याचे आणि त्यांच्या कंपनीतील हिस्सेदारीशी संबंधित कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, बायजू रवींद्रन यांनी आपण कोणताही गैरप्रकार केला नसल्याचे सांगितले. हा निर्णय कायदेशीर प्रक्रियेचा भाग असून, त्याविरोधात अपील करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कोरोना काळापासून बायजूला मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. कंपनीवर कर्जाचा मोठा बोजा असून, गुंतवणूकदारांसोबत वाद आणि न्यायालयीन खटलेही सुरू आहेत. हा खटला कतार इन्व्हेस्टमेंट ॲथॉरिटीशी संबंधित एका कंपनीने दाखल केला होता.

# मार्शल आर्ट फायटर केविन कुंटा अभिनेता राम चरणचा अंगरक्षक

■ हैदराबाद

**दाक्षिणात्य** सुपरस्टार राम चरणच्या 'पेड्डी' चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान त्याचा खास बॉडीगार्ड केविन कुंटा सोशल मीडियावर चर्चेत आला आहे. आफ्रिकन वंशाचा आणि व्यावसायिक एमएमए (मिक्स मार्शल आर्ट) फायटर असलेला केविन कुंटाची राम चरणने अंगरक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

केविन कुंटा हा मूळचा गांबियाचा आहे. राम चरणच्या सुरक्षेसाठी त्याला दररोज २ ते ४ लाख रुपये मानधन दिले जात असल्याची चर्चा आहे. केविन कुंटाने अनेक एमएमए स्पर्धांमध्ये भाग घेतला असून, २०२१ मध्ये तो इटलीच्या राष्ट्रीय एमएमए संघाचाही सदस्य होता. त्याने यापूर्वी अनेक व्हीआयपी आणि सेलिब्रिटींसाठी सुरक्षारक्षक म्हणून काम केले आहे.

राम चरणच्या अलीकडील कार्यक्रमांमध्ये केविन सतत त्याच्या सोबत दिसतो. उंच शरीरयष्टी, स्टायलिश सूट आणि सावध देहबोली यामुळे तो सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. गर्दी नियंत्रणात ठेवणे आणि अभिनेत्याच्या सुरक्षेची काळजी घेणे ही त्याची मुख्य जबाबदारी आहे.

# चिनाब नदीत पाणी वाढण्याची शक्यता वादानंतरही भारताकडून पाकला अलर्ट

■ नवी दिल्ली

**जम्मू-काश्मीरमधील** सलाल धरणाचे दरवाजे उघडल्यामुळे चिनाब नदीतील पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संभाव्य पुराचा धोका लक्षात घेऊन भारताने पाकिस्तानला आगाऊ इशारा दिला आहे. सिंधू जल करारावरून दोन्ही देशांमध्ये तणाव असतानाही भारताने मानवतेच्या दृष्टीने ही माहिती देत पाकिस्तानला सतर्क केले.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल करारावरून पाकिस्तानविरोधात कठोर भूमिका घेतली होती. त्यानंतर पाकिस्तानने भारतावर पाण्याचा शस्त्र म्हणून वापर केल्याचा आरोप करत आंतरराष्ट्रीय स्तरावर टीका सुरू ठेवली. तरीही भारताने शेजारी देश म्हणून आपली जबाबदारी पार पाडत पुराबाबत आगाऊ माहिती दिली. भारताने पाकिस्तानला सांगितले की, सलाल धरणातील सांडवे उघडल्यामुळे ३० मे पर्यंत चिनाब नदीतील पाण्याचा प्रवाह वाढू शकतो. त्यानंतर पाकिस्तानने पंजाब प्रांतात पुराचा इशारा जारी केला आणि बचाव पथकांना सतर्क केले. प्रशासनाने नदीकाठच्या भागांमध्ये खबरदारीचे आदेश दिले आहेत.

चिनाब नदी ही सिंधू खोऱ्यातील महत्त्वाची नदी असून, सिंधू जल करारानुसार तिचा प्रवाह पाकिस्तानकडे जातो, तर भारताला रावी, बियास आणि सतलज नद्यांवर पूर्ण हक्क आहे. भारत या नद्यांचा वापर सिंचन आणि जलविद्युत प्रकल्पांसाठीही करतो.

# कॅनडात खलिस्तान समर्थकांकडून भारतीय ध्वजाचा पुन्हा अपमान

■ ओटावा

**कॅनडामधील** व्हँकुव्हर येथे भारतीय उच्चायुक्त दिनेश पटनाईक यांच्या ताफ्याला खलिस्तान समर्थकांनी घेराव घातल्याची घटना समोर आली आहे. यावेळी भारतीय ध्वजाचा अपमान करण्यात आल्याने भारतीय समाजात संतापाची लाट पसरली आहे.

बंदी घालण्यात आलेल्या सिख्स फॉर जस्टिस या संघटनेशी संबंधित इंदरजित सिंग गोसाल नावाच्या व्यक्तीने सुरक्षा व्यवस्था भेदून उच्चायुक्तांच्या वाहनांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याने भारतीय ध्वज फाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. परिसरात भारतविरोधी घोषणाबाजीही करण्यात आली. ही घटना भारतीय उच्चायुक्त एका कार्यक्रमाला जात



असताना घडली. खलिस्तान समर्थक आधीपासूनच त्या ठिकाणी जमले होते. ताफा पोहोचताच ते आक्रमक झाले. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीला पोलीस आणि सुरक्षा अधिकारी फक्त हा गोंधळ बघत उभे होते.

इंदरजित सिंग गोसाल हा खलिस्तानी समर्थक गुरपतवंत सिंग पन्नूच्या जवळचा मानला जातो. हरदीप सिंग निज्जर हत्या प्रकरणानंतरही त्याचे नाव अनेक वादांत पुढे आले होते.

दरम्यान, भारतीय उच्चायुक्त दिनेश पटनायक यांनी कॅनडाच्या सुरक्षा यंत्रणांवर विश्वास व्यक्त करत भारत आणि कॅनडा यांच्यातील सुरक्षा सहकार्य मजबूत असल्याचे सांगितले. मात्र, या घटनेमुळे कॅनडामध्ये भारतविरोधी आणि खलिस्तानी कारवाया पुन्हा चर्चेत आल्या आहेत.


# राष्ट्रीय पुरस्कार विजेते छाया दिग्दर्शक, निर्माता, पटकथाकार व अभिनेता

## संतोष सिवन

**संतोष** सिवन यांनी फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामधून पदवी प्राप्त केली आहे आणि आजपर्यंत ५० फीचर फिल्म्स आणि ५० माहितीपटात त्यांनी कॅमेरामन म्हणून काम केलं आहे. त्यांनी 'सिन', 'बायोचेक', 'एनम', 'उर्मी: द वॉरियर हू वॉन्टेड टू किल वास्को द गामा',

**संतोष सिवन भारतातील सर्वोत्कृष्ट आणि सर्वोत्कृष्ट सिनेमॅटोग्राफर म्हणून ओळखले जातात. संतोष सिवन हे उत्कृष्ट सिनेमॅटोग्राफर आहेत. पण फार कमी लोकांना माहिती आहे की ते सिनेमॅटोग्राफर असण्यासोबतच एक कुशल चित्रपट दिग्दर्शक देखील आहेत.**

'केशू', 'तहान', 'बिफोर द रेन्स', 'आनंदभद्रम' यांसारख्या टीव्ही मालिकांमध्ये काम केले आहे. , 'नवरस'.', 'अशोका द ग्रेट' सारख्या चित्रपटांचे दिग्दर्शनही केले आहे. आत्तापर्यंत, त्यांना



लहान आणि मोठे असे २३ पुरस्कार मिळाले आहेत, ज्यात 'अले किनो - इंटरनॅशनल यंग ऑडियंस फिल्म फेस्टिव्हल' (चित्रपट 'द टेररिस्ट'), 'द इंटरनॅशनल इंडियन फिल्म ॲकॅडमी' (चित्रपट 'अशोका द'), 'कैरो' त्यांनी बारा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, सहा फिल्मफेअर पुरस्कार, चार केरळ राज्य चित्रपट पुरस्कार आणि तीन तमिळनाडू राज्य चित्रपट पुरस्कार जिंकले आहेत.

दिग्दर्शक म्हणून, संतोषजींनी त्यांचा पहिला राष्ट्रीय पुरस्कार १९८८ मध्ये स्टोरी ऑफ टिब्लू साठी जिंकला. त्यांचा हालो हा चित्रपट ४३ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट बालचित्रपट म्हणून गौरविण्यात आला.

अमेरिकन सोसायटी ऑफ सिनेमॅटोग्राफर्स या ऑर्गनायझेशन मध्ये सामील होणारे संतोष सिवन हे आशिया-पॅसिफिक प्रदेशातील पहिले सिनेमॅटोग्राफर ठरले आहेत. यांचा समावेश आहे.

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ('माली' चित्रपटासाठी दोन पुरस्कार). त्याच्या नावावर पाच राष्ट्रीय पुरस्कारही आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरव केला आहे.





# 'बेस्ट' ला निवडणूक कामाचे ४ कोटी ६० लाख रुपये मिळणार

■ मुंबई

**आर्थिक** संकटातून वाटचाल करत असलेल्या 'बेस्ट' उपक्रमाने मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत दिलेल्या सेवेतून तब्बल ४ कोटी ६० लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. पालिका निवडणुकीसाठी मतदान कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या प्रवासासाठी आणि मतदान साहित्य वाहतूक व्यवस्था करण्यासाठी बेस्ट उपक्रमाकडे प्रशासनाने बेस्टच्या गाड्यांची मागणी केली होती. यानुसार 'बेस्ट'ने निवडणूक कामासाठी १४ व १५ जानेवारी रोजी एकूण २०२४ बसचा पुरवठा केला होता. ४ कोटी ६० लाख २९ हजार ४४० इतके सेवाशुल्क आकारून बस उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.हे शुल्क देण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरीसाठी मांडण्यात येणार आहे.

# पलूस परिसरात दररोज रात्री वीज गायब! चोऱ्या वाढल्या

**स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण**

■ सांगली

**पलूस** शहर परिसरातील वाड्या-वस्त्यांवर दररोज रात्री वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. अंधाराचा फायदा घेऊन चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे हा वीजपुरवठा त्वरित सुरळीत करावा, अशा मागणीचे निवेदन नुकतेच रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र लाड यांनी महावितरणच्या सहाय्यक अभियंत्यांना दिले.

वास्तविक उन्हाळ्यामध्ये दिवस रात्री वाड्या-वस्त्यावरील एजी फिडरवर सिंगल फेज वीज असल्याने फोर्स लोड शेडिंग करण्याचे कोणतेही कारण नाही. मात्र, विनाकारण वीज कपातीचा त्रास शेतकरी व नागरिकांना होत आहे. त्यामुळे गावातील वाड्यावस्त्यांवर एजी फिडरवर असणारी सिंगल फेज वीज कायम चालू ठेवण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

प्रामुख्याने पलूस, बांबवडे, आंधळी, मोराळे, सांडगेवाडी या गावातील वाडीवस्तीवरील एजी फिडरवर असणारी विद्युत वाहिनी दररोज रात्री ९ ते पहाटे २ वाजेपर्यंत फोर्स लोड शेडिंगच्या नावाखाली बंद केली जात आहे. वीज बंद असल्याने रात्रीच्या वेळी चोरीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिक, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वीजपुरवठा बंद केला जात असल्याने नागरिक उकाड्याने हैराण होत आहेत.

# रायगडमध्ये वृद्ध दाम्पत्याची गळा चिरून निर्घृण हत्या! चेहऱ्यावर राख

■ नवी मुंबई

**रायगड** जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील निगडोली गावात एका वृद्ध दाम्पत्याची त्यांच्या वाड्यात निर्घृण हत्या करण्यात आली. दोघांच्याही गळ्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले होते. तसेच चेहऱ्यावर राख फासण्यात आली होती. या प्रकरणामागे वैयक्तिक वैर असल्याचा पोलिसांना संशय आहे. ही हत्या सोमवारी रात्री ते मंगळवारी संध्याकाळदरम्यान झाल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी खालापूर पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मृतांची ओळख रघुनाथ दत्तू फराट (७३) आणि त्यांची पत्नी सुरेखा फराट (६८) अशी झाली असून, ते दोघे घरात एकटे राहत होते. त्यांचा नातू आदित्य फराट (२१) याने दिलेल्या तक्रारीनुसार, त्याचे वडील रोहिदास फराट सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास आजी-आजोबांना भेटून घरी परतले होते. मंगळवारी संध्याकाळी आदित्य आई आणि बहिणीसह आजी-आजोबांना भेटण्यासाठी गेला. अनेकदा हाक मारूनही प्रतिसाद न मिळाल्याने त्याने मागील बाजूचा अर्धवट उघडा दरवाजा वापरून घरात प्रवेश केला. घरात सर्वत्र सुकलेली पाने, राख आणि घरातील सामान विस्कटलेल्या अवस्थेत पडलेले होते. हॉलमध्ये रघुनाथ फराट यांचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळला. त्यांच्या गळ्यावर धारदार शस्त्राने खोल जखमा करण्यात आल्या होत्या.

# ब्रेक लायनर गरम झाल्याने महानगरी एक्स्प्रेसमधून धूर

**कसारा :** मध्य रेल्वेच्या कसारा स्थानकावर महानगरी एक्स्प्रेसच्या जनरेटर व्हॅनमधून अचानक धूर निघाल्याने प्रवाशांमध्ये काही काळ घबराट पसरली. मात्र, रेल्वे कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली. इगतपुरीहून मुंबईकडे जाणारी महानगरी एक्स्प्रेस कसारा स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर आल्यानंतर जनरेटर व्हॅनमधून धूर येत असल्याचे निदर्शनास आले. ही बाब लक्षात येताच गार्डने तात्काळ रेल्वे प्रशासनाला माहिती दिली.अतिउष्णतेमुळे ब्रेक लायनर गरम होऊन त्यातून धूर निघत होता. माहिती मिळताच रेल्वे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

# नेकनूरमध्ये १५ वर्षीय नातीवर ६० वर्षीय आजोबाकडून अत्याचार

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत आजोबा-नातीच्या नात्याला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. ६० वर्षीय आजोबानी १५ वर्षीय अल्पवयीन नातीवर अत्याचार केल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी आरोपी आजोबा आणि चुलत भावाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

पीडित मुलीचे आई-वडील बाहेरगावी कामासाठी गेले होते. घरातील आजी आणि इतर भावंडे शेळ्या चारण्यासाठी शेतात गेल्यानंतर मुलगी घरी एकटी असल्याची संधी साधत आजोबानी तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच हा प्रकार कुणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली. काही दिवसांनी पीडितेला पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याने तिला रुग्णालयात नेण्यात आले. औषधे घेऊनही फरक न पडल्याने पुन्हा तपासणी करण्यात आली. यावेळी महिला डॉक्टरांनी विश्वासात घेऊन विचारपूस केल्यानंतर पीडित मुलीने तिच्यावर झालेल्या अत्याचाराची माहिती दिली. धक्कादायक बाब म्हणजे पीडितेवर तिच्या चुलत भावानेही अत्याचार केला होता. तसेच तो घरातील इतर लहान मुलींशीही अशाच प्रकारचे गैरवर्तन करत असल्याचा उल्लेख फिर्यादीत करण्यात आला आहे. पीडितेच्या जबाबावरून नेकनूर पोलिसांनी आजोबा आणि चुलत भावाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# राजकीय बैठकीसाठी दिल्लीत आलो नव्हतो! एकनाथ शिंदेंचे स्पष्टीकरण

पान ८ वरून-

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी महाराष्ट्रासाठी नेहमीच मदतीचा हात दिला असून, राज्याच्या विकासासाठी हजारो कोटींचा निधी केंद्राकडून मिळाला आहे. या दिल्ली दौऱ्यात प्रामुख्याने कांदा आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच ग्रामीण भागातील घराघरांत पाणी पोहोचवणाऱ्या 'जलजीवन मिशन' अंतर्गत रखडलेल्या प्रकल्पांना गती मिळावी, यासाठी केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांसोबत बैठक घेण्यात आली. या सर्व बैठका अत्यंत सकारात्मक झाल्या असून, केंद्राकडून या प्रश्नांवर लवकरच तोडगा निघेल विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या जागावाटपावरून महायुतीमध्ये रस्सीखेच सुरू आहे. याबाबत एकनाथ शिंदे म्हणाले की, महाविकास आघाडी १७ जागा लढवेल, पण एकही जागा जिंकेल असे मला वाटत नाही. महायुती १७ लढवेल आणि सर्व जागा जिंकेल.

# सीएसएमटी रेल्वे स्थानकातील ब्लॉकला १३ जूनपर्यंत मुदतवाढ

■ मुंबई

**सीएसएमटी** म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक १६ आणि १७ या दोन फलाटांच्या विस्तारीकरणाचे काम संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे या कामासाठी घेतलेल्या सीएसएमटीतील ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉकची मुदत २९ मे वरुन १३ जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईबाहेरून येणाऱ्या 'तेजस'सह अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या सीएसएमटीऐवजी दादरपर्यंतच धावणार आहेत.

**अनेक गाड्या दादर, ठाण्यापर्यंत चालवणार**

सध्या सीएसएमटीच्या पुनर्विकासाचे काम रेल लँण्ड डेव्हलपमेंट ॲथॉरिटीतर्फे सुरू आहे. त्यामध्ये फलाट क्रमांक १६ व १७ चे विस्तारीकरण केले जाणार आहे. या कामासाठी यापूर्वी १ फेब्रुवारी ते २६ एप्रिलपर्यंत ब्लॉक लागू करण्यात आला होता. नंतर त्याची मुदत २९ मेपर्यंत वाढवण्यात आली होती. त्यात आता पुन्हा १३ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, असे काल मध्य रेल्वेने जाहीर केले.

या ब्लॉकमुळे सीएसएमटीऐवजी दादर स्थानकापर्यंतच चालविल्या जाणाऱ्या गाड्यांमध्ये अमरावती - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्स्प्रेस, बल्लारशाह-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नंदीग्राम एक्स्प्रेस, हावडा-छत्रपती शिवाजी महाराज एक्स्प्रेस, भुवनेश्वर- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कोणार्प एक्स्प्रेस, बिदर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस, लातूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्स्प्रेस, मडगाव-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तेजस एक्स्प्रेस या गाड्यांचा समावेश आहे.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

सुचना-एसआरएम-१२

खालील निविदा https://eprocurement.mahagenco.in वर प्रकाशित केल्या आहेत.

| अ. क्र. | ई-निविदा क्र. | विषय | इसारा रक्कम/ अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ६६०मेगावॅट/वेल्फेअर/ टी-९१/आरएफएक्स- ३००००६८८८५ | ३x६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथील कॅन्टीनच्या संचालन आणि देखभालीसाठी २ वर्षांकरिता सेवा प्रदान करणे. | रू. ४६३,३१३.६० / रू. ४५,९८१,३६०.०० |

ई-निविदेसाठी विक्रेत्यांना त्यांच्या संस्थेची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
अधिक तपशिलासाठी संकेतस्थळावर लॉग ऑन करा.
कोणत्याही प्रश्नांकरीता संपर्क साधावा: कार्यकारी अभियंता (खरेदी), केटीपीएस, कोराडी, नागपूर.
मोबाईल क्र.: +९१-८४११९५८६२२, ई-मेल आयडी: eepurchasekoradi@mahagenco.in

हस्ता/-
मुख्य अभियंता (ओ ॲण्ड एम)
महानिर्मिती,केटीपीएस,कोराडी

चंदेरी च्विंगम
नवाकाळ
पुणे । शुक्रवार
२९ मे, २०२६
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# 'टाईपकास्टिंग' संस्कृतीची श्रियाला खंत



**अभिनेत्री** श्रिया पिळगावकरने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत चित्रपटसृष्टीतील कलाकारांना एकाच चौकटीत किंवा विशिष्ट लेबलखाली अडकवण्याच्या (टाईपकास्टिंग किंवा स्टिरियोटायपिंग) प्रवृत्तीवर उघडपणे भाष्य केले आहे. डिजिटल माध्यमांवर (ओटीटी) यशस्वी खेळी केल्यानंतर, ती आता पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर येण्यासाठी सज्ज झाली आहे. या वर्षात तिचे 'मिर्झापूर: द मुव्ही' आणि 'हैवान' हे दोन मोठे चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहेत. वेब सीरिजच्या माध्यमातून तिने ओटीटी प्लॅटफॉर्मवर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. डिजिटल माध्यमांवर सलग काम केल्यानंतर कलाकारांसमोर येणाऱ्या आव्हानांवर बोलताना श्रिया म्हणाली की, चित्रपटसृष्टी एखाद्या कलाकाराला खूप लवकर एका विशिष्ट चौकटीत किंवा लेबलमध्ये अडकवून टाकते. जेव्हा तुम्ही ओटीटीवर मोठ्या प्रमाणावर काम करता, तेव्हा इंडस्ट्री तुम्हाला लगेच 'ओटीटी ॲक्टर' म्हणून घोषित करते.

या अशा टॅग किंवा लेबलमुळे कलाकारांना मुख्य प्रवाहातील चित्रपटांमध्ये मिळणाऱ्या संधींवर अनेकदा नकारात्मक परिणाम होतो आणि चित्रपट मिळणे कठीण होऊन बसते. त्यामुळे एकाच प्रकारच्या भूमिकांमध्ये किंवा माध्यमात अडकून न पडता, स्वतःमधील अष्टपैलूत्व टिकवून ठेवण्याचा माझा नेहमीच प्रयत्न असतो, असे श्रिया सांगते.

# 'खलनायक-२'साठी संजयला हवाय दिग्दर्शक



**अभिनेता** संजय दत्त याने दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांना 'खलनायक रिटर्न्स' या चित्रपटाचे दिग्दर्शन करण्याची विनंती केली होती. परंतु संतोषी यांनी हा प्रस्ताव नम्रपणे नाकारला आहे. मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात संजय दत्त, सुभाष घई, जिओ स्टुडिओच्या ज्योती देशपांडे आणि अस्पेक्ट ग्लोबलच्या आकांक्षा कंबोज यांनी या चित्रपटाची अधिकृत घोषणा केली होती. मूळ 'खलनायक' चित्रपटाचे दिग्दर्शन सुभाष घई यांनी केले होते. मात्र त्यांनी या भागाचे दिग्दर्शन करण्यास असमर्थता दर्शवल्यानंतर संजय दत्त या प्रकल्पासाठी नवीन दिग्दर्शकाच्या शोधात होता.

राजकुमार संतोषी यांच्या व्यावसायिक सिनेमाच्या उत्तम समजपटू वृत्तीमुळे संजय दत्त त्यांना या चित्रपटाचे दिग्दर्शक बनवण्यास उत्सुक होता. तसेच या दोघांनी आजवर कधीही एकत्र काम केले नव्हते. मात्र, संतोषी सध्या सनी देओल स्टारर 'लाहोर १९४७' या चित्रपटाच्या उत्तर-निर्मितीच्या कामात व्यग्र आहेत आणि त्यानंतर ते सनी देओल व आमीर खान यांच्यासोबत इतर काही चित्रपटांच्या संहितांवर काम करणार आहेत. वेळेच्या अभावामुळे त्यांनी संजय दत्त यांच्या या प्रस्तावाला अत्यंत आदराने नकार दिला असून, 'खलनायक रिटर्न्स'च्या टीझरमधील संजय दत्तच्या लुकचे कौतुक करत चित्रपटाला शुभेच्छा दिल्या आहेत. संजय दत्तने या कार्यक्रमात सांगितले होते की, त्याला या चित्रपटाची कल्पना तुरुंगात असताना आली होती, जिथे तब्बल चार हजार कैद्यांनी एका सुरात 'खलनायक २' पाहण्याची इच्छा व्यक्त केली होती. सध्या संजय दत्त या विशेष प्रकल्पासाठी इतर दिग्गज दिग्दर्शकांच्या नावाचा विचार करत आहे.

# 'द गुरुग्राम स्कूल मर्डर' आता मोठ्या पडद्यावर?



**प्रसिद्ध** चित्रपट दिग्दर्शक श्रीराम राघवशप यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या मॅचबॉक्स शॉटस् या प्रॉडक्शन हाऊसने पत्रकार लीना धनखर यांच्या 'द गुरुग्राम स्कूल मर्डर' या पुस्तकाचे स्क्रीन राईट्स खरेदी केले आहेत. हे पुस्तक २०१७ मध्ये गुरुग्राममधील एका नामांकित शाळेत घडलेल्या सात वर्षांच्या विद्यार्थ्याच्या हत्येच्या सत्य घटनेवर आधारित आहे.

या संवेदनशील विषयावरील पडदा रूपांतराला पीडित मुलाच्या कुटुंबियांनीही पूर्ण पाठिंबा दिला आहे. 'अंधाधून' आणि 'स्कूप' सारख्या गाजलेल्या कलाकृतींची निर्मिती करणाऱ्या मॅचबॉक्स शॉट्सकडून या प्रोजेक्टची निर्मिती केली जाणार आहे.

# नेहाचा धक्कादायक खुलासा



**बॉलिवूडमधील** प्रसिद्ध अभिनेत्री नेहा धुपिया हिने तिच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यातील एका धक्कादायक अनुभवाचा खुलासा केला आहे. एका कास्टिंग डायरेक्टरच्या अत्यंत कटू आणि टोमणेवजा वक्तव्यामुळे तब्बल नऊ वर्षे तिने स्वतःचा आत्मविश्वास गमावला होता, अशी जाहीर कबुली नेहाने दिली आहे.

नेहा धुपिया आणि तिचा पती अंगद बेदी यांच्या 'डबल डेट विथ नेहा धुपिया अँड अंगद बेदी' या टॉक शोमध्ये तिने हा अनुभव शेअर केला. या भागामध्ये अभिनेत्री हुमा कुरेशी आणि अभिनेता साकिब सलीम पाहुणे म्हणून उपस्थित होते. कलाविश्वात वावरताना कलाकारांना भेडसावणारी न्यूनगंडाची भावना, शरीराच्या रचनेवरून होणारी टीका (बॉडी इमेज इश्यूज) आणि नकळत बोललेल्या शब्दांमुळे होणारे मानसिक नुकसान या विषयावर चर्चा सुरू असताना नेहाने तिच्यासोबत घडलेला हा जुना प्रसंग आठवला.

नेहाने सांगितले की, तिच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात एका कास्टिंग दिग्दर्शकाने तिच्या दिसण्यावर अत्यंत कठोर आणि आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. तो म्हणाला होता, तू जेव्हा हसतेस, तेव्हा खूप वाईट दिसतेस. हसताना तुझ्या चेहऱ्यावर कोणताही प्रभाव किंवा आत्मविश्वास जाणवत नाही. त्यामुळे तू हसू नकोस. हे शब्द नेहाच्या मनात इतके घर करून गेले की, त्याचा परिणाम तिच्या रोजच्या व्यावसायिक जीवनावर आणि फोटोशूट्सवर होऊ लागला. आपण हसताना खरोखरच वाईट दिसतो, या भीतीने तिने कॅमेऱ्यासमोर आणि जाहीर कार्यक्रमांमध्ये मनमोकळेपणाने हसणे हळूहळू पूर्णपणे बंद केले. जवळजवळ नऊ वर्षांनंतर तिला जाणीव झाली की, त्या एका निष्काळजी वक्तव्याने तिच्या मनात किती खोलवर असुरक्षिततेची भावना निर्माण केली होती.

# उर्वशी का संतापली?



**अभिनेत्री** उर्वशी रौतेला हिने तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून एका वादग्रस्त आणि व्हायरल झालेल्या प्रतिमेवर तीव्र संताप व्यक्त केला असून, अशा प्रकारची विषारी प्रवृत्ती ताबडतोब थांबवण्याचे आवाहन केले आहे. इंटरनेटवर सध्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) सहाय्याने तयार करण्यात आलेले एक छायाचित्र मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. यामध्ये उर्वशी रौतेला ही अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन आणि दीपिका पदुकोण यांच्यासमोर गुडघ्यावर बसलेली दाखवण्यात आली आहे. हे छायाचित्र पूर्णपणे बनावट असून, ते इंटरनेटवरील वाढत्या नकारात्मकतेचे प्रतीक असल्याचा आरोप उर्वशीने केला आहे.

हे एआय जनरेटेड छायाचित्र मूळचे एका फॅनपेजवरून पोस्ट करण्यात आले होते. यात ऐश्वर्या आणि पदुकोण यांच्यासमोर उर्वशी रौतेला ही अगदी लहान किंवा दुय्यम असल्याचे दर्शवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. इंटरनेटवरील नेटकऱ्यांनी या प्रतिमेचा वापर करून उर्वशीची मोठ्या प्रमाणावर खिल्ली उडवण्यास सुरुवात केली होती. यावर उर्वशीने संतापजनक पोस्ट लिहिली आहे. तिने म्हटले आहे की, कृपया ही विषारी प्रवृत्ती थांबवा. हे अत्यंत लाजिरवाणे आणि चुकीचे आहे. मी ऐश्वर्या आणि दीपिका या दोघींचाही मनापासून आदर करते. परंतु महिलांना एकमेकांविरुद्ध उभे करणे किंवा अशा प्रकारे कोणाला तरी कमी लेखणे ही विकृत मानसिकता आहे. हे छायाचित्र पूर्णपणे बनावट असून, एआयच्या सहाय्याने लोकांची दिशाभूल करण्यासाठी तयार केले गेले आहे.

# महाराष्ट्रात प्रत्येक वाईट घटनेत 'शहा कनेक्शन' नीट पेपरफुटीवरून राऊतांचा टोला

■ मुंबई

**महाराष्ट्रात** घडणाऱ्या प्रत्येक वाईट घटनेमध्ये शहा कनेक्शन आढळून येते,असा टोला शिवसेना उबाठाचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांनी नीट पेपरफुटी प्रकरणावरून सरकारला लगावला.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि नीट प्रकरणातील सुत्रधार तेजश शहा यांच्या समान आडनावावरून राऊत यांनी हा निशाणा साधला.

ते म्हणाले की, नीट पेपरफुटीचे केंद्र महाराष्ट्रच आहे, हे आता स्पष्ट झाले आहे. एकेकाळी महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचा केंद्रातही आदराने उल्लेख होत होता.परंतु आता महाराष्ट्राची ही दशा झाली आहे. पेपरफुटीचे केंद्र महाराष्ट्र असावे हे दुर्दैवी आहे. याची जबाबदारी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारली पाहिजे. मात्र फडणवीस या विषयावर बोलायला तयार नाहीत. लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य बरबाद झाले, पण फडणवीस गप्प बसले आहेत. हल्ली राज्यात घडणाऱ्या प्रत्येक वाईट गोष्टीत शहा कनेक्शन आढळते. तसेच मला तर असा संशय येतो की पेपरफुटीमागे भाजपाच असावा.कारण भाजपाने निवडणूक आयोग ताब्यात घेतला,ईडी,सीबीआय, पोलीस खाते ताब्यात घेतले,न्यायालये ताब्यात घेतली आता ते आपल्या माणसांना पेपर आधी मिळावा पेपर फोडण्यासाठी फिल्डिंग लावत असावे.

# कोकण रेल्वे मार्गावरील विशेष मान्सून वेळापत्रक अखेर जाहीर

■ मुंबई

**आगामी** पावसाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वेचे मान्सून वेळापत्रक काल जाहीर करण्यात आले. येत्या १५ जूनपासून २० ऑक्टोबरपर्यंत हे विशेष वेळापत्रक लागू राहणार आहे.त्यानुसार अनेक एक्सप्रेस गाड्यांच्या वेळेत बदल करण्यात येणार आहे. डोंगराळ भाग, बोगदा तसेच दरडी कोसळण्याच्या भीतीच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वे मार्गावर वेगमर्यादा लागू केली जाणार आहे.

कोकण रेल्वे मार्ग डोंगराळ भागातून जात असल्याने दरवर्षी पावसाळ्यात या मार्गावर विशेष खबरदार घेतली जाते. त्यानुसार गाड्यांच्या वेगाला मर्यादा आणि विशेष मान्सून वेळापत्रक जाहीर केले जाते. जून ते ऑक्टोबर या चार महिन्यांसाठी हे वेळापत्रक लागू राहते. पावसाळी हंगामात कोकण रेल्वे मार्गावर दरडी कोसळणे,रुळांवर पाणी साचणे, झाडे उन्मळन पडणे तसेच अतिवृष्टीमुळे इतर प्रकारच्या शक्यता आहे.

# 'शक्तिपीठ' साठी एक इंचही शेतजमीन घेऊ देणार नाही

## पारगांव ग्रामस्थांचा एकमुखी निर्धार

■ हातकणंगले

**शासनाच्या** प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाला एक इंचदेखील जमीन देणार नाही असा निर्धार करत पारगांव ग्रामस्थांच्यावतीने प्रांताधिकारी दीपक शिंदे यांच्याकडे हरकती दाखल करण्यात आल्या. या हरकतींमुळे शक्तीपीठ महामार्गाला असणारा विरोध वाढत चालला असून महामार्गामुळे बाधीत होणाऱ्या जमिनीच्या शेतकऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी आता एकजुटीने याविरोधात एल्गार पुकारला असल्याचे दिसत आहे.

या शक्तीपीठ महामार्गामुळे शेतकऱ्यांची पिकाऊ जमीन बाधीत होऊन त्याला अगदी कवडीमोल किंमत मिळणार आहे. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे साधनच उध्वस्त होणार असल्याने बेरोजगारीचा प्रश्न गंभीर बनणार आहे.शक्तिपीठ महामार्ग होण्यासाठी राज्यकर्ते राजकीय दबाव तंत्र वापरत असल्याचा आरोप विरोधी पक्ष आणि शेतकऱ्यांकडून होत आहे. तर दुसरीकडे शक्तीपीठ महामार्ग कोणत्याही परिस्थितीत होऊ द्यायचा नाही अशा इराद्याने विरोधी पक्ष आणि शेतकरी एकजुटीने रस्त्यावर उतरून आंदोलन, मोर्चे अशा विविध मार्गाने शक्तीपीठ महामार्गाला उघडपणे मोठा विरोध करत आहेत. याच अनुशंगाने पारगांव ग्रामस्थांच्या वतीने ॲड. नितीन हुजरे यांच्या पुढाकाराने शक्तीपीठ महामार्गाविरोधात ७५ शेतकऱ्यांच्या हरकती प्रांताधिकारी दिपक शिंदे यांच्याकडे दाखल केल्या. यावेळी शिवाजी सिद, प्रताप पाटील,यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट रद्द करा जयंत पाटलांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

■ मुंबई

**देशभरात** पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत असून त्याविरोधात विविध ठिकाणी आंदोलने सुरू आहेत. विरोधकांकडूनही इंधन दरवाढीवरून सत्ताधाऱ्यांवर टीका केली जात आहे. शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी राज्य सरकारने पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट आणि अधिभार तत्काळ रद्द करावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

जयंत पाटील यांनी एक्स पोस्टद्वारे ही भूमिका मांडत मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहिल्याची माहिती दिली. जयंत पाटील म्हणाले की, राज्य सरकार पेट्रोल-डिझेलवर आकारत असलेला व्हॅट आणि अधिभार रद्द केल्यास इंधनाचे दर लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतात. यामुळे केवळ वाहनधारकांनाच नव्हे, तर वाहतूक, शेती आणि उद्योग क्षेत्रालाही मोठा दिलासा मिळेल. सध्याच्या कठीण आर्थिक परिस्थितीत नागरिकांच्या हिताचा विचार करून राज्य शासनाने पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट आणि अधिभार तत्काळ रद्द करण्याचा निर्णय घ्यावा.

जयंत पाटील यांनी केंद्र सरकारवरही निशाणा साधला.

# बोंमनहळ्ळी धरणामध्ये मृत 'टस्कर' आढळला



■ बंगळुरू

**कर्नाटकच्या** हल्याळ तालुक्यातील सांबरानी वनपरिक्षेत्रातील बोंमनहळ्ळी धरणाच्या बॅकवॉटरमध्ये एक सुळे असलेला एक हत्ती (टस्कर) मृतावस्थेत आढळून आल्याने वनखात्यात खळबळ माजली आहे.पाण्यात मृत अवस्थेत हत्ती आढळणे संशयास्पद मानले जात आहे.

सोमवारी सकाळी स्थानिक रहिवाशांना एका हत्तीचे कलेवर बॅकवॉटरमध्ये तरंगताना आढळले. त्यांनी तातडीने याची माहिती वनखात्याला दिली.त्यानंतर वनाधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होत पाहणी केली. हत्तीचे कलेवर पाण्याच्या मध्यभागी असल्याने ते बाहेर काढण्यासाठी वनखात्याच्या पथकाला मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला.

स्थानिकांच्या सहकार्याने अथक प्रयत्नांनंतर मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. त्यानंतर पशुवैद्यकीय अधिकारी व वनाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उत्तरीय तपासणी पार पडली. त्यानंतर पर्यावरणीय व सुरक्षेच्या कारणास्तव बोम्मनहळ्ळी बॅकवॉटर परिसरातच हत्तीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या हत्तीचे सुळे सुरक्षितरीत्या ताब्यात घेऊन म्युझियम ऑफ मैसूरमध्ये पाठविण्यात आले आहेत. हत्तीच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट करण्यासाठी हृदय व मूत्रपिंडाचे नमुने बंगळूरमधील न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

# शायर बशीर बद्र यांचे निधन उर्दू गझलविश्वावर शोककळा

■ मुंबई



**उर्दू** साहित्यातील ज्येष्ठ शायर आणि आधुनिक गझलचे उस्ताद म्हणून ओळखले जाणारे बशीर बद्र याचे वयाच्या ९१ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने साहित्यविश्व आणि चाहत्यांमध्ये शोककळा पसरली आहे. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

बशीर बद्र यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९३५ रोजी उत्तर प्रदेशातील अयोध्या येथे झाला. त्यांनी अलिगढ मुस्लीम विद्यापीठातून पदवी आणि पीएचडीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर तेथेच त्यांनी उर्दूचे प्राध्यापक म्हणून दीर्घकाळ अध्यापन केले.सोप्या आणि भावस्पर्शी भाषेत गझल मांडण्याची त्यांची खास शैली होती. दैनंदिन जीवनातील साध्या शब्दांना त्यांनी आपल्या शायरीत अत्यंत प्रभावीपणे गुंफले.

# ऑनलाईन बेटिंग प्रकरणी भाजपाचे नगरसेवक नितेश पोवार अटकेत

■ मुंबई

**इचलकरंजी** - ऑनलाईन बेटिंग प्रकरणात भाजपचे नगरसेवक गोट्या उर्फ नितेश पोवार यांना पोलिसांनी अटक केल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. प्रभाग क्रमांक १२ मधून प्रतिनिधित्व करणारे पोवार हे भाजपा आमदार राहुल आवाडे यांचे कट्टर समर्थक मानले जातात.

आयपीएलच्या मुंबई-राजस्थान सामन्यादरम्यान चप्पलच्या गोदामातून सुरू असलेल्या बेटिंग रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला होता. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार अमेय बडवे, अभिजीत बडवे, गणेश पाटील, उत्तमसिंग बग्गा, याकूब मुजावर आणि रिषभ पाटील हे सहा जण सध्या पोलीस कोठडीत असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. तपासादरम्यान या रॅकेटचे मोठे नेटवर्क असल्याचे उघड झाले. विविध संशयितांकडून मिळालेल्या माहितीनंतर या प्रकरणात काही राजकीय व्यक्तींचा सहभाग असल्याची चर्चा सुरू होती. त्यानुसार पोलिसांनी मध्यरात्री गोपनीय कारवाई करत नितेश पोवार यांना त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेत अटक केली. या बेटिंग रॅकेटमागील आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेण्यासाठी पोलिसांकडून मोबाईल डेटा, बँक खात्यांची माहिती आणि इतर पुराव्यांची सखोल तपासणी सुरू आहे.

# संगमेश्वर तालुक्यात गव्याच्या कळपाने 'रास्ता रोको' केला

■ संगमेश्वर

**तालुक्यातील** डोंगराळ आणि ग्रामीण भागात वन्यप्राण्यांचा वावर दिवसेंदिवस वाढत असून आता गव्यांचे कळप थेट मुख्य रस्त्यांवर दिसू लागले आहेत. सोनवडे-कोसुंब घाट मार्गावर सकाळी १० ते १२ गवे रेडे आणि एका पाडसाने मुख्य रस्त्यावर ठाण मांडले. यामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

मुचरी येथील रहिवासी योगेश सप्रे हे आपल्या स्कूटरने देवरुखच्या आठवडा बाजारासाठी जात असताना कोसुंब बौद्धवाडीनजीकच्या तीव्र वळणावर अचानक त्यांच्यासमोर गव्यांचा मोठा कळप उभा ठाकला.समोर अवाढव्य गवे पाहताच क्षणभर त्यांची घाबरगुंडी उडाली. विशेष म्हणजे,गव्यांचा कळपही काही वेळ रस्त्यावरच उभा राहून सप्रे यांच्या दिशेने पाहत होता.अत्यंत तणावपूर्ण वातावरणातही योगेश सप्रे यांनी धीर न गमावता सुरक्षित अंतरावरून या घटनेचे व्हिडिओ व छायाचित्रे मोबाईलमध्ये कैद केली.

# ठाण्यात रिक्षा-टॅक्सीला ४ रुपये भाडेवाढ हवी

■ ठाणे




**इंधन** दरवाढीमुळे रिक्षा आणि टॅक्सी चालवणे परवडत नसल्याने रिक्षा-टॅक्सी युनियनच्या संयुक्त कृती समितीने ४ रुपये भाडेवाढ करण्याची मागणी केली आहे. याबाबत प्रादेशिक परिवहन विभागाला (आरटीओ) पत्र देण्यात आले आहे.

रिक्षाचालकांनी प्रतिकिलोमीटर किमान चार रुपये आणि त्यानंतर प्रत्येक अतिरिक्त किलोमीटरसाठी दोन रुपयांची वाढ देण्याची मागणी केली आहे. ही मागणी मान्य झाल्यास ठाण्यातील रिक्षा आणि टॅक्सी प्रवास लवकरच महागण्याची शक्यता आहे. शहरातील रिक्षा आणि टॅक्सी चालक-मालक गेल्या काही दिवसांपासून भाडेवाढीसाठी आग्रही आहेत. दररोज सीएनजीचे दर वाढत असल्याने वाहन चालवणे परवडत नाही अशी भूमिका चालक संघटनांनी घेतली आहे.

सध्या सीएनजीचा दर ८४ रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचला असून त्यामुळे चालक आणि वाहनमालकांचे आर्थिक गणित कोलमडल्याचा दावा करण्यात येत आहे. ठाणे शहरात सुमारे आठ लाख वाहने सीएनजीवर धावत असून त्यात दोन लाख रिक्षा, एक लाखांहून अधिक टॅक्सी आणि पाच लाखांपेक्षा अधिक खासगी कारचा समावेश आहे.भाडेवाढीचा सर्वाधिक फटका घोडबंदर पट्ट्यातील नोकरदार वर्गाला बसणार आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१६२०



**आडवे शब्द –**

२. सुरुवातीपासून शेवटपर्यंत, संपूर्ण ४. पार्वती ७. काठोकाठ भरलेले १०. गंगा नदीचे एक नाव ११. रुष्टता, नाराजी १२. सवाई १४. चाकू १५. मोठी सुई १६. विजय १८. सोशिक २०. रस्ता वापरण्याचा कर २२. पिकलेला, आतल्या गाठीचा २३. रक्षण करणारा, संकटातून सोडवणारा २५. आश्चर्य २६. हे परीक्षकांकडून दिले जातात २७. शिर्डीचे दैवत २९. हसणे ३२. वाईट कृत्य ३३. देव ३४. राजाची बायको ३५. वृत्तपत्रातील महत्त्वाचा कर्मचारी ३७. बुटका, खुजा ३८. तल्लीन ३९. टेबल ४०. जल ४१. ऋण ४२. विहीर ४३. घोडा ४४. भाताचा भाज्या घातलेला प्रकार ४५. मंजुरी ४७. विषयाची प्रस्तावना ४८. चारित्र्य ४९. झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक पेय ५०. समाविष्ट, सहभागी ५२. ऐतिहासिक घटनांची नोंद असलेले बाड ५३. माघार ५४. सुळका ५६. फळाची चिरलेली पातळ फोड ५८. सिंहासन ५९. प्रतिशोध ६०. मान्यतापत्र ६२. अग्निसंस्कार ६४. पोलिसांपुढे दिलेली साक्ष किंवा निवेदन ६५. अपुरा ६७. नामस्मरण ६८. श्रीखंडाचे पूर्वरूप ६९. देवापुढचा दिवा ७०. अशक्त ७२. पिठाची गिरणी ७३. विश्वास, खात्री ७५. ऋषी ७६. सत्व ७८. दबाव ८०. अरण्य ८१. कुर्रेबाजपणा, तोरा ८२. शोक ८३. झुंबड ८४. रचना करणारा ८६. माफी ८७. ताकद ८९. एकाग्र नजर ९१. चंद्र ९४. चहाडी ९६. मृदंग १००. निवृत्तीचे वय १०१. गवताची काडी १०३. लहान मुलींची कर्णभूषणे १०४. गणपती १०५. फासावर चढवणे १०६. दावानल १०७. दोस्त

**उभे शब्द –**

१. अपार प्रयत्नांनी गंगा पृथ्वीवर आणणारा राजा २. सोबती, जोडीदार ३. यौवन ४. घर, निवारा (हिं.) ५. आईची बहीण ६. धातूचा तंतू ७. आकर्षण ८. उत्तेजन ९. भयंकर १३. हुशार १४. चारित्र्यवान १७. पांघरुण १९. दसऱ्यापूर्वीचा उत्सव २०. विहग २१. अपक्व २३. कबजा, अंमल २४. गोष्ट २६. कोणाला कळू न देता, निमूटपणे २७. कुत्रा २८. हस्तलिखित ३०. शस्त्राची तीक्ष्ण कड ३१. पायपीट ३४. जनानखाना ३५. पाऊस ३६. दोरखंड ४०. वाळलेली पाने ४१. जास्तीतजास्त ४२. पुढे जाणे, वाटचाल ४३. कमी वजनाचा ४४. प्राचीन ४५अ. लगेच ४६. चरा ४७. लग्नकार्याची सांगता होणे ५१. कृष्णभक्त कवयित्री ५५. दुय्यम, वाम ५७. हुद्दा ६१. बदनामी ६३. उपस्थित ६४. बस्तान ६६. गोंगाट, आरडाओरडा ६९. बालकथेत कासवाशी शर्यत हरलेला ७०. साडेसाती आणणारा ग्रह ७१. मार्गातली अडचण ७२. टंचाई ७३. संसार ७४. वसाहत ७५. स्पर्धा ७७. मचूळ, बेचव ७८. जाणकार रसिक ७९. पंख, दुसऱ्याचे ८०. देणारा, दान करणारा ८१. ठसकेबाज बाई ८३. लोचट, गळ्यात पडणारा ८५. लहान खार ८६. नाशवंत ८८. लागून, शेजारी ९०. अथवा ९२. वार्धक्य ९३. पाणी भरण्याची तपेली ९४. अवघड ९५. कन्या ९७. दुष्ट पुरुष ९८. विश्व ९९. दिवस १००. प्रामाणिक १०२. मोत्यांची माळ •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६१९ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. शिंपला ३. वैजयंतीमाला ७. वैगुण्य ९. चट्टा १०. खोक १२. लीप १४. बाळ १६. रूढ १७. मातेरे १८. गलबत २१. वरात २३. कोंडमारा २५. पडाव २६. गहाळ २८. लंबकर्ण ३०. हरी ३१. लाडू ३२. ठेंगा ३३. हेला ३४. विनयशील ३६. दुही ३७. भरारी ३८. सुवास ४०. वाघ ४२. सुगी ४३. वेचा ४४. पाकीटमार ४५. आईसक्रीम ४७. रडारड ४९. भोळा सांब ५१. रवंथ ५२. तसदी ५३. नंदी ५५. गळा ५६. मेणा ५८. प्रज्ञा ५९. डमरू ६०. सरबराई ६२. समय ६५. सद ६६. धीर ६७. भिन्न ६८. वाचक ७०. मस ७२. पतकर ७४. रास्त ७६. अंधार ७७. वडीलधारा ७८. सुंठ ७९. बागुलबुवा ८१. चावा ८२. तर्र ८३. पोक ८४. सुरमा ८५. वाजी ८६. ख ८७. रसा ९०. लेक ९२. कानन ९४. गाढव ९५. नकुल सहदेव ९७. नटवा ९९. मुजोर १००. सुवार्ता १०१. सुकर १०२. दैना १०३. दरा

**उभे शब्द** : १. शिंगरू मेलं हेलपाट्यानं २. लाखो ४. जड ५. तीनतेरा ६. लाली ८. गुलाब ९. चळवळ ११. कष्ट १३. पगडा १५. आतल्या गाठीचा १७. मामा १९. लवलाही २०. तग २२. टोक २४. डझन २५. परी २७. हावरा २९. बला ३०. हलवाई ३४. विसरभोळा ३५. यम ३७. भगीरथ प्रयत्न ३८. सुटका ३९. वामा ४१. घसट ४३. वेडसर ४५. आब ४६. मरणासन्न ४८. रत ५०. सांबार ५४. दीडदमडीचा ५५. गरूड ५६. थरार ६०. सहित ६१. बधीर ६३. सावाधावा ६४. शुक ६७. भिस्त ६९. चर ७१. सलवार कुर्ता ७२. परात ७३. कडू ७४. राठ ७५. बेगुमान ७६. अंबुज ७८. सुंकले ७९. बारकावा ८०. संजीवनी ८५. वाढ ८८. साल ८९. स्वदेश ९१. कनक ९३. नमुना ९४. गारद ९५. नवा ९६. सय ९८. टर

# रखरखत्या उन्हात अन्नपाणी न घेता ३० मेपासून जरांगेंचे टोकाचे आंदोलन

पान १ वरून

करणार आहे. मात्र यावेळी मी त्यात थोडा बदल केला आहे. यावेळी उपोषण मंडपात सावलीत आणि पंख्यासमोर बसून करणार नाही. यावेळचे उपोषण मी रखरखत्या उन्हात पाय चप्पल न घालता आणि अन्न पाणी न घेता करणार आहे. मे महिन्याचा कडक उन्हाळा सध्या सुरू आहे. लोक घराबाहेर पडताना दहा वेळा विचार करत आहेत. अशा वेळी मी रणरणत्या उन्हात नुसता बाजेवर (खाटेवर) बसून उपोषण करणार आहे. त्याने मला उष्माघात होऊ द्या, वाट्टेल तेवढ्या वेदना होऊ द्या, मरण येऊ द्या, मी माघार घेणार नाही. माझा त्यात बळी गेला तर तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच जाईल. पण आता एकदाचा तुकडा पडू द्या, माझा तरी किंवा सरकारचा तरी तुकडा पडू द्या. मी कसलीही पर्वा करणार नाही. देशात कुठेही झाले नसेल असे कठोर उपोषण मी करणार आहे.

'मराठ्यांच्या लेकरांच्या आयुष्याचा या सरकारने उन्हाळा केला आहे. त्यांच्यासाठी लढण्यास मी एकटा समर्थ आहे.त्यामुळे तुम्ही कोणीही कृपा करून अंतरवाली सराटीत येऊ नका,असे आवाहन जरांगे यांनी मराठा बांधवांना उद्देशून केले. ते म्हणाले की, सरकारला मराठा समाजाबद्दल माया असती तर त्यांनी आरक्षण दिले असते. सरकार केवळ बोलत आहे. समाजासाठी काही होणार नाही. मला केवळ चर्चा नको आहे. तर माझ्या बांधवांना आरक्षण मिळणार आहे का? सरकार दुटप्पी भूमिका घेत आहे. पोलिस कट रचून आमच्यावर हल्ले करतात, त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जात नाही, आणि आमच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. सरकारकडून साधेसाधे काम केले जात नाही. मराठा-कुणबी मंत्रालय स्थापन करायला किती वेळ लागतो? पण ते केले नाही. ओबीसींनी न मागता त्यांच्यासाठी मंत्रालय स्थापन करण्यात आले. मराठा आणि कुणबी एक असून सुद्धा जीआर काढला नाही. आमच्या नोकऱ्या कोणी लाटल्या. सरकारने ५० वर्षांमध्ये आमचे वाटोळे का केले? आमच्या पाच पिढ्यांचे नुकसान कोण भरून काढणार? मराठा समाजाच्या ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत. त्यांना कुणबी प्रमाणपत्र कधी देणार? ज्यांना याआधी कुणबी प्रमाणपत्र दिली आहेत त्यांना जात वैधता प्रमाणपत्र कधी देणार आणि सातारा संस्थानाचा शासन निर्णय (जीआर) कधी काढणार?

## प्रसाद लाड, विरवे पाटील आज जरांगेंना भेटणार

जरांगे यांच्या पत्रकार परिषदेच्या काही वेळ आधी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सरकारच्या वतीने मध्यस्थी करणारे भाजपा नेते आमदार प्रसाद लाड यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, उद्या मी आणि राधाकृष्ण विरवे-पाटील (जलसंपदा मंत्री आणि मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष) अंतरवाली सराटीमध्ये जाऊन जरांगे यांची भेट घेणार आहोत. जरांगे यांना अपेक्षित असलेले उत्तर त्यांना मिळेल.

# राज्यात जातींवरून डोकी फोडणे सुरू

पान १ वरून

राजकारणी भोंदू बाबांच्या भजनी लागल्याचे दिसत आहे. आपण कोण होतो, आपली महाराष्ट्राची परंपरा किती उज्वल होती हे न बघता उत्सव, डीजे याच्यात आपल्याला गुंतवून ठेवले जात आहे. सावरकर हे प्रखर हिंदू धर्माभिमानी होते , पण म्हणून धर्मातील त्रुटींवर टीका करताना त्यांनी कधी मागेपुढे पाहिले नाही.

पुढे राज ठाकरे म्हणाले की , आज सावरकरांच्या महाराष्ट्रात त्यांच्या प्रतिमा वापरून फक्त धर्मात तेढ पसरवणे सुरु आहे. जिथे त्यांनी जाती अंताचा लढा दिला त्या महाराष्ट्रात जातींवरून डोकी फोडणे सुरु आहे. आणि याला खतपाणी सत्ताधारी घालत आहेत. उठता बसता सावरकरांचा तिरस्कार करणाऱ्यांना सोडून द्या. पण जे त्यांचा वापर स्वतःच्या राजकारणासाठी करत आहेत त्यांना नक्की कुठले सावरकर कळलेत आणि त्यांचे कुठले विचार राजकीय आचरणात आणण्याची तयारी आहे? मी गेल्या २ महिन्यांत दोन वेळेस भाषणांमधून महाराष्ट्र विचारांनी आणि कल्पनांनी किती संपन्न आणि पुढारलेला होता हे सादरीकरण करून सांगतोय. याचं कारण आपण कोण होतो हेच आपण विसरलो तर पुढे कुठे जायचं याचा मार्ग आखणार तरी कसे आहोत ? आणि यासाठी जर आपण सत्तेला आसुलेले राजकारणी आणि व्हाट्सअप विद्यापीठातील खोटी नरेटिव्ह यावर अवलंबून राहणार असू तर महाराष्ट्राचे कठीण आहे.

**जाहीर सूचना**

याद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, श्रीमती सीमा सुरेश परब या सुमेर-सेट कोहौसो लि., भाईंदर (पूर्व), ठाणे येथील तळमजल्यावरील गाळा क्र.१५ च्या धारक आहेत. सदर मालमत्तेच्या विक्रीसंदर्भातील एनओसी इतर सर्व कायदेशीर वारसांकडून प्राप्त करण्यात आले असून, त्यांनी त्यांच्या हक्कांचा विधिपूर्वक त्याग करून त्यांचा दावा माझी अशिल सौ. सीमा सुरेश परब यांच्या पक्षात हस्तांतरित केला आहे, त्यामुळे, अधोलिखित वकील याद्वारे सदर फ्लॅटच्या हस्तांतरणासंदर्भात कोणाचे काही दावा किंवा हरकती असल्यास त्या सादर करण्याचे आवाहन करीत आहे. सदर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत, कोणास काही दावा/हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या दावा/हरकतीस समर्थन करणारी संबंधित कागदपत्रे जोडून अधोलिखित वकिलांना लेखी स्वरूपात कळवावे. निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्तेवर कोणाचाही दावा नसल्याचे गृहीत धरले जाईल आणि माझी वरील नमूद अशिलास सदर मालमत्तेची विक्री करण्यास मोकळीक राहील.

**ठिकाण: भाईंदर, ठाणे**
**दिनांक: २९.०५.२०२६**

सही/-
शैलेंद्र एम. आघारकर
वकील उच्च न्यायालय

# अमेरिकेचा इराणवर, इस्त्रायलचा लेबनॉनवर हल्ला युद्धबंदी समाप्त! तणावाचे वातावरण

पान १ वरून

जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाची आहे आणि सध्या सुरू असलेल्या संघर्षाचा केंद्रबिंदू बनली आहे. पाचवा ड्रोन ज्या ठिकाणाहून उडणार होता ते इराणचे बंदर अब्बास येथील ग्राऊंड कंट्रोल स्टेशन होते. इराणने प्रत्युत्तर देत अमेरिकन हल्ल्यांनंतर अमेरिकन तळावर हल्ला केल्याचा दावा केला आहे. इराणने मात्र नेमका कोणता अमेरिकन तळ लक्ष्य केला याबाबत माहिती दिलेली नाही. इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सने निवेदनात म्हटले आहे की, आज पहाटे अमेरिकन सैन्याने बंदर अब्बास विमानतळ परिसरातील एका ठिकाणावर हवाई हल्ला केल्यानंतर त्या हल्ल्याचा स्त्रोत असलेल्या अमेरिकन हवाई तळावर ४.५० वाजता हल्ला करण्यात आला. इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सने पुढे इशारा दिला आहे की, भविष्यात अशा कारवायांना अधिक निर्णायक प्रत्युत्तर दिले जाईल.

अमेरिकेने काल उशिरा इराणच्या पर्शियन गल्फ स्ट्रेट ॲथॉरिटी या संस्थेवर निर्बंध लादले. ही संस्था इराणने होर्मूज सामुद्रधुनीतील जहाजवाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थापन केली होती. अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाच्या वेबसाईटनुसार, या संस्थेला स्पेशली डेझिग्नेटेड नॅशनल्स यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. हे निर्बंध अमेरिकेच्या ताज्या हल्ल्यांनंतर लागू करण्यात आले आहेत. ताज्या हल्ल्यांनंतर तेलाच्या किमती वाढल्या असून, आशियाई शेअर बाजारात घसरण झाली आहे.

दुसरीकडे इस्त्रायली लष्कराने आज सांगितले की, त्यांनी दक्षिण लेबनॉनमधील टायर शहर परिसरात हिजबुल्लाहच्या पायाभूत सुविधांवर हल्ले सुरू केले आहेत. हे हल्ले आयडीएफ म्हणजेच इस्त्रायली संरक्षण दलाने टायरमधील नागरिकांना परिसर रिकामा करण्याचा इशारा दिल्यानंतर करण्यात आले. इस्त्रायली लष्कराने सांगितले की, त्यांच्या एका सैनिकाचा हिजबुल्लाहच्या ड्रोन हल्ल्यात मृत्यू झाला. हा सैनिक २० वर्षीय रोटेम यानाई असून, तो उत्तर इस्त्रायलमधील ऑपरेशनल कारवाईदरम्यान मारला गेला. उत्तर इस्त्रायलमध्ये एका हल्ल्यात दोन राखीव सैनिक जखमी झाले. या सतत वाढणाऱ्या संघर्षामुळे मध्य पूर्वेत तणाव अत्यंत वाढला असून, परिस्थिती अधिक गंभीर होत चालली आहे.

### कुवेतमध्ये ड्रोन क्षेपणास्त्रांचा इशारा

अमेरिकेच्या इराणवरील ताज्या हल्ल्यानंतर काही तासांतच कुवेतमध्ये सायरन वाजू लागले. कुवेतच्या लष्कर जनरल कमांडने सांगितले की, देशाची हवाई संरक्षण यंत्रणा शत्रूचे ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले अडवत आहे. नागरिकांना इशारा देताना लष्कराने सांगितले की, जर स्फोटांचे आवाज ऐकू आले, तर ते हवाई संरक्षण यंत्रणेने शत्रूच्या हल्ल्यांना अडवल्याचे परिणाम असतील. त्यांनी नागरिकांना सुरक्षा व सावधानतेच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले.

**ओरिएंटल रेल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड** (पूर्वीची ओरिएंटल वेनीर प्रोडक्ट्स लिमिटेड)
सीआयएन: L35100MH1991PLC060686
नोंदणीकृत कार्यालय: सर्व्हे क्र. ४९, गाव अघाई, तालुका शहापूर, जिल्हा ठाणे - ४२१ ६०१, दूरध्वनी क्र.: ०२२-६१३८९४००;
फॅक्स क्र.: ०२२-६१३८९४०१ ईमेल: compliance@orientalrail.co.in वेबसाईट: www.orientalrail.com

**दि. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षाकरिता लेखापरिक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या विवरणपत्राचा सारांश**

(₹ लाखात ईपीएस वगळता)

| अ. क्र. | तपशील | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१-०३-२०२६ लेखापरिक्षित | ३१-१२-२०२५ अलेखापरिक्षित | ३१-०३-२०२५ लेखापरिक्षित | ३१-०३-२०२६ लेखापरिक्षित | ३१-०३-२०२५ लेखापरिक्षित |
| १ | कार्यातून महसूल | १५ ३४७.५५ | १६ ८५७,५३ | १४ ०२०.७५ | ५७ ३३४.९१ | ६० २२१.५५ |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपूर्व) | १,६०९.१६ | १,८३१.६८ | १,९९९.६७ | ५,६९५.०३ | ४,४४०.१७ |
| ३ | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | १,६०९.१६ | १,८३१.६८ | १,९९९.६७ | ५,६९५.०३ | ४,४४०.१७ |
| ४ | कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींपश्चात) | १,१८७.५९ | १,३८२.४६ | ५३७.३८ | ४,२२४.०० | २,९२१.५९ |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट) | १,१८७.५९ | १,३८२.४६ | ५३७.३८ | ४,२२४.०० | २,९२१.५९ |
| ६ | भरणा केलेले सम भाग भांडवल | ६७०.५९ | ६७०.५९ | ६४५.५९ | ६७०.५९ | ६४५.५९ |
| ७ | इतर सम भाग | - | - | - | - | - |
| ८ | प्रति भाग उत्पन्न (दर्शनी किंमत रु. १/- प्रत्येकी) मूळ | १.७७ | २.०६ | ०.८७ | ६.३७ | ४.६८ |
| | सौम्यीकृत | १.७७ | २.०६ | ०.८७ | ६.३७ | ४.६८ |

**स्वतंत्र तत्त्वावर वित्तीय निष्कर्ष खालीलप्रमाणे**

(₹ लाखात ईपीएस वगळता)

| अ. क्र. | | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१-०३-२०२६ लेखापरिक्षित | ३१-१२-२०२५ अलेखापरिक्षित | ३१-०३-२०२५ लेखापरिक्षित | ३१-०३-२०२६ लेखापरिक्षित | ३१-०३-२०२५ लेखापरिक्षित |
| १ | कार्यातून महसूल | ४,१२५.०५ | ५,४१४.३८ | ४,१२१.३४ | १७,२४९.५७ | १५,३१५.१४ |
| २ | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | ८३.३२ | ७१८.९९ | ४८०.०३ | १,६६४.३२ | १,४४०.८५ |
| ३ | कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | ७९.४१ | ५३६.४६ | ३२२.९३ | १,२२६.३७ | १,०२८.८९ |

**टिपा:**
१. उपरोल्लेखित निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित करण्यात आले आहेत आणि संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. २७ मे, २०२६ रोजी पार पडलेल्या सभेमध्ये त्यास मंजुरी देण्यात आली. दि. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिक/वर्षाकरिता कंपनीच्या लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांच्या संदर्भात वैधानिक लेखा परिक्षकांनी अपरिवर्तित लेखा परिक्षण मत प्रदर्शित केले आहे.
२. वरील विवरण हे सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या दि. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिक/वर्षाकरिता वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. दि. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिक/वर्षाकरिता वित्तीय निष्कर्षांचे विस्तृत प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाईट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाईट https://www.orientalrail.com वरही उपलब्ध आहे.
३. कंपनी मुख्यत्वे "भारतीय रेल्वे उत्पादने" या एकमेव विभागात कार्यरत आहे आणि म्हणून विभागीय तपशील प्रसिद्ध करणे आवश्यक नाही.
४. वर्तमान कालावधी/वर्षाच्या सादरीकरणाची पुष्टी करण्याकरिता मागील कालावधी/वर्षाची आकडेवारी नव्या स्वरुपात / पुनर्गठित करण्यात आले आहेत.

ओरिएंटल रेल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या संचालक मंडळाकरिता आणि त्यांच्या वतीने
सही/-
करीम एन. मिठीबोरवाला
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ००१७१३२६

ठिकाण: मुंबई
दिनांक: २७ मे, २०२६

## राजीव पाटील यांना भाजपाची उमेदवारी?

पान १ वरून

त्यांनी दिली. राजीव पाटील मागील विधानसभा निवडणुकीत ते भाजपामध्ये जाणार होते. मात्र त्यांची मनधरणी करण्यात आली. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीतही त्यांनी भाजपा उमेदवारांचा जाहीर प्रचार केला होता. त्यामुळे नाराज असलेले राजीव पाटील भाजपामध्ये आले तर शिवसेना आणि बविआ या दोघांना एकाच वेळी शह देता येईल, अशी भाजपाची रणनिती आहे.

# कर्नाटकात अरवेर शिवकुमार मुख्यमंत्री

पान १ वरून-

आणणे या सर्व जबाबदाऱ्या डी. के. शिवकुमार लिलया पेलत असत. त्यांची आर्थिक ताकद हा चर्चेचा विषय आहे. त्यांना मुख्यमंत्रिपद मिळावे, यासाठी गेली अनेक वर्षे प्रयत्न सुरू होते. मात्र सिद्धरमय्या हटण्यास तयार नव्हते. अखेर राहुल गांधी यांनी अल्टीमेटम दिला आणि नाराजीने का होईना सिद्धरमय्या यांनी मान्यता दिली. काँग्रेसची सत्ता आल्यानंतर अडीच अडीच वर्षे मुख्यमंत्रिपदाचा फॉर्म्युला ठरला. यानुसार गेल्यावर्षीच शिवकुमार मुख्यमंत्री बनणे अपेक्षित होते. मात्र मी सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपदी राहिलेला नेता असावा म्हणून मला एक वर्षाची आणखी मुदत द्या, अशी विनंती सिद्धरमय्या यांनी केल्याने त्यांना मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर आज अखेर सिद्धरमय्या पायउतार झाले. त्यांचे पुत्र यतिंद्र हे उपमुख्यमंत्री होण्याची शक्यता आहे. डी. के. शिवकुमार हे मुख्यमंत्री राहिले नसले तरी ते पूर्ण कार्यकाळ कर्नाटक काँग्रेसचे अध्यक्ष होते. मात्र त्यांनी आपल्या कामकाजात कधीही सिद्धरमय्या यांना आडकाठी केली नाही. त्यांच्या विरोधात जाहीरपणे कधीही वक्तव्य केले नाही. पक्ष फोडण्याचा प्रत्यक्ष प्रयत्नही केला नाही. त्यांनी सतत सिद्धरमय्या यांना सन्मान दिला. इतर राज्यात असे उदाहरण पाहायला मिळत नाही. आज अखेर शिवकुमार यांना त्यांच्या संयमाचे फळ मिळाले. सिद्धरमय्या यांनी पत्रकार परिषद घेऊन आपण पायउतार होणार असल्याचे जाहीर केले. हे सर्व सुरू असताना कर्नाटकच्या राज्यपालांनी त्यातही गोंधळ घातला.

आज सिद्धरमय्या हे राज्यपालांकडे राजीनामा पत्र सोपविणार आहेत. हे माहीत असताना कर्नाटकचे राज्यपाल आधी महाराष्ट्रात आणि नंतर इंदूरला निघून गेले. ते कर्नाटकात थांबलेच नाहीत. यामुळे सिद्धरमय्या यांनी सचिवांकडे राजीनामा सोपविला. परंतु सचिवांनी राजीनामा स्वीकारलेला नाही. यामुळे राज्यपाल जेव्हा कर्नाटकात परत येतील तेव्हाच मुख्यमंत्रिपदाचा बदल प्रत्यक्षात येणार आहे.

**पुणे महानगरपालिका, पुणे**
पुणे महानगरपालिका
**निविदा प्रक्रिया कक्ष विद्युत विभाग**
**निविदा जाहिरात - नवीन कामे**

विक्री कालावधी दिनांक:- २९-०५-२०२६ ते १२-०६-२०२६ दुपारी १४:०० पर्यंत
स्वीकृती दिनांक:- २९-०५-२०२६ ते १२-०६-२०२६ दुपारी १४:०० पर्यंत तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक: १५-०६-२०२६ दुपारी १५:००

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पूर्वगणित रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ELECTRICAL/ 2026/27 | विद्युत | पुणे महानगरपालिका ३२ MLD विठ्ठलवाडी मैलापाणी शुद्धीकरण केंद्र ०१ वर्ष चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे. | रु ६०७९/- | रु १३८५७८६४/- | रु १३८५७९/- | १२ | सोमनाथ आवळे ९६८९९३१६९४ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियेच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाईन निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न. पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ(वि)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./एन.एफ.टी. सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Yogesh Mali
कार्यकारी अभियंता,
विद्युत
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/१५८ दि. २७/०५/२०२६

**जाहीर सूचना**

याद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, माझे अशील श्री. कल्पेश एम. शाह, संचालक, मेसर्स एम के जोकाई ॲग्री प्लांटेशन प्रा. लि., हे फ्लॅट क्र. 1, 2 व 3, तळमजला, किंग्स टॉवर को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., प्लॉट क्र. 1, सब प्लॉट क्र. 15, एन. एस. रोड क्र. 10, सीटीएस क्र. 34, सर्व्हे क्र. 70, जुहू व 287, विले पार्ले पश्चिम, जेव्हीपीडी स्कीम, के पश्चिम विभाग, मुंबई – 400049 येथील मालमत्तेचे मालक आहेत. माझ्या वरील अशिलांनी असे प्रतिनिधित्व केले आहे की, वरील नमूद फ्लॅट्स म्हणजे फ्लॅट क्र. 2 व 3 संदर्भातील खाली नमूद पूर्वसंबंधित मूळ करारपत्रे / कागदपत्रे हरवलेली आहेत किंवा चुकीच्या ठिकाणी ठेवलेली आहेत किंवा ती माझ्या अशिलांच्या तसेच कोणत्याही बँक, वित्तीय संस्था किंवा इतर कोणत्याही संस्थेच्या ताब्यात नाहीत. याशिवाय, कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, वित्तीय संस्था किंवा इतर कोणत्याही संघटनेकडे वरील नमूद फ्लॅट्स संदर्भातील कोणताही दावा, हरकत किंवा मूळ कागदपत्रे ताब्यात असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून 14 कॅलेंडर दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात, ए/203, एक्सेल हाऊस, रोड क्र. 13, जेव्हीपीडी, जुहू, मुंबई – 400049 येथे त्यासंबंधित कागदोपत्री पुरावे सादर करावेत. अन्यथा, नमूद 14 कॅलेंडर दिवसांची मुदत पूर्ण झाल्यानंतर करण्यात आलेले सर्व दावे व हरकती या त्याग केलेल्या किंवा सोडून दिलेल्या मानल्या जातील.

**कागदपत्रे:**
1. फ्लॅट क्र. 2 संदर्भात, दिनांक 20 नोव्हेंबर 1980 रोजी श्री. अब्दुल्ला अब्दुल कादर कातिब यांनी सौ. मायादेवी राजकुमार पमनानी यांच्या पक्षात निष्पादित केलेला मूळ करारनामा.
2. अपूर्ण प्रत – फ्लॅट क्र. 2 संदर्भात, दिनांक 14 मार्च 1981 रोजी सौ. मायादेवी राजकुमार पमनानी आणि श्री. अब्दुल्ला अब्दुल कादर कातिब यांनी श्री. अवतार सिंग चोहन यांच्या पक्षात निष्पादित केलेला मूळ करारनामा.
3. फ्लॅट क्र. 2 संदर्भात, दिनांक 6 मे 2000 रोजीचा मूळ हस्तांतरण दस्त, जो बीडीआर-1 येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त क्र. 1709 / 2000 अंतर्गत नोंदणीकृत आहे, श्री. अवतार सिंग चोहन यांनी श्री. मयूर पटेल यांच्या पक्षात निष्पादित केलेला असून, त्यातील पृष्ठ क्र. 14 हरवलेले आहे.
4. फ्लॅट क्र. 3 संदर्भात, दिनांक 25 जून 1979 रोजी श्री. अब्दुल्ला अब्दुल कादर कातिब यांनी (1) श्री. शब्बीत एन. जरीवाला आणि (2) श्री. युसुफ एन. जरीवाला यांच्या पक्षात निष्पादित केलेला मूळ करारनामा.
5. फ्लॅट क्र. 3 संदर्भात, दिनांक 13 डिसेंबर 1994 रोजी श्री. संजय जे. जानी यांनी (1) श्री. चंपकलाल एम. पारिख आणि (2) सौ. सुजाता चंपकलाल पारिख यांच्या पक्षात निष्पादित केलेला मूळ हस्तांतरण दस्तऐवज.
6. फ्लॅट क्र. 3 संदर्भात, दिनांक 2 नोव्हेंबर 1995 रोजीचा मूळ विक्री दस्त, जो बॉम्बे येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त क्र. बीबीजे/3850 अंतर्गत नोंदणीकृत आहे, (1) श्री. चंपकलाल एम. पारिख आणि (2) सौ. सुजाता चंपकलाल पारिख यांनी सौ. उषा श्रीकांत यांच्या पक्षात निष्पादित केलेला.

ॲड. एस. के. नायर
स्कॅन ॲडव्होकेट्स ॲड कंपनी
मोबाईल: 9699474176

नवाकाळ

• पुणे । शुक्रवार २९ मे, २०२६ • पान -८

# उत्तरप्रदेश निवडणूक तयारी! महिलांसाठी स्कूटी मोफत

**लखनौ-** उत्तरप्रदेशात पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी तयारी सुरु झाली असून उत्तर प्रदेश सरकारने विद्यार्थिनींसाठी मोफत स्कूटी देण्याची योजना आखली आहे. विधानसभा निवडणुका येताच राज्यांनी लाडकी बहीण योजनेचे विविध प्रकार लागू करून मतदारांना भुलविण्याचा प्रयत्न केला आणि त्यात ते यशस्वी झाले. मात्र त्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती ढासळली. असे असूनही योजना जाहीर करणे सुरुच आहे. याचाच एक भाग म्हणून योगी सरकार स्कूटी देण्याची योजना आणण्याच्या तयारीत आहे . उत्तर प्रदेश बरोबर पंजाबचीही निवडणूक आहे. तेथील राजकीय पक्ष आता कोणती योजना आणतात त्याकडे लक्ष आहे.



# रेशन धान्य वाहतुकीच्या कंत्राटात भुजबळांनी टक्केवारी मागितली

अंजली दमानिया यांचा संशय

■ मुंबई

**राज्यातील** साडेचार हजार कोटी रुपयांच्या रेशन धान्य वाहतूक कंत्राटात मंत्री छगन भुजबळ यांच्याकडून मोठ्या प्रमाणात टक्केवारीची मागणी होत असल्याचा संशय सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी व्यक्त केला. गेली २६ वर्षे त्याच-त्याच कंपन्यांना धान्य वाहतुकीची कंत्राटे दिली जात असल्याचा दावाही त्यांनी पत्रकार परिषदेत केला. संबंधित कंत्राट प्रक्रिया तात्काळ थांबवण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या की, उच्च न्यायालयाने वर्क ऑर्डर देऊ नये, असे स्पष्ट निर्देश दिले



असतानाही काही जण टक्केवारीसाठी वर्क ऑर्डर काढण्याचा प्रयत्न करत आहेत. कंत्राटातील टक्केवारीसाठी घाई सुरू आहे. रेशन धान्य वाहतूक कंत्राट प्रक्रियेत अशा अटी-शर्ती ठेवण्यात आल्या आहेत की बाहेरील कंपन्यांना स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. न्यायालयाने या प्रक्रियेत पारदर्शकता आणि स्पर्धेचा अभाव असल्याचे नमूद केले आहे. गेली २६ वर्षे त्याच-त्याच कंपन्यांना धान्य वाहतुकीची कंत्राटे दिली जात आहेत. त्यामुळे कोणतीही अंतिम वर्क ऑर्डर देऊ नये. या निविदा कोणत्याही परिस्थितीत मंजूर करण्यात येऊ नयेत. राज्यसभेची घाई झालेल्या छगन भुजबळांना या निविदा तातडीने मंजूर व्हाव्यात आहेत. कारण त्यामधील टक्केवारी त्यांना मिळणार असल्याचा माझा संशय आहे.

# खरोशी गावाच्या जंगलात १५ वर्षीय मुलीची हत्या

**रायगड -** रायगडमध्ये उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आजीकडे आलेल्या १५ वर्षीय मुलीची दगडांनी ठेचून निर्घृण हत्या करण्यात आली. तिचा मृतदेह माणगाव तालुक्यातील खरोशी गावाच्या जंगलात फेकून देण्यात आला. या घटनेमुळे माणगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे.

मृत मुलगी मुंबईतील विलेपार्ले येथे राहत होती. ती सेंट झेवियर्स शाळेत नववीत शिक्षण घेत होती. उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी ती आई-वडील आणि भावासोबत माणगाव तालुक्यातील पळसगाव ग्रामपंचायत हद्दीतील घरोशीवाडी येथे आजीकडे आली होती. रात्री सुमारे पावणेनऊ वाजण्याच्या सुमारास मुलगी वडिलांच्या मोबाईलवर बोलत घराबाहेर पडली. त्यानंतर ती परतली नाही. कुटुंबीयांनी तिचा शोध घेतला. काहीच माहिती मिळाली नाही. आज दुपारी तिचा मृतदेह सापडला.

# राजकीय बैठकीसाठी दिल्लीत आलो नव्हतो! एकनाथ शिंदेंचे स्पष्टीकरण

■ मुंबई

**महाराष्ट्राचे** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गेल्या दोन दिवसांपासून दिल्ली दौऱ्यावर आहेत. राज्यातील तिन्ही मुख्य नेते दिल्लीत एकाचवेळी असल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. गेल्या दोन दिवसांपासून दिल्लीत असलेल्या शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, 'राजकीय बैठकीसाठी मी दिल्लीत आलो नव्हतो. राज्याच्या विकासकामासाठी आलो होतो.

शिंदे म्हणाले की, आम्ही दोन दिवसांपासून दिल्लीत आहोत. त्याबाबत एवढा प्रश्न का उपस्थित केला जात आहे? राज्यातील जनतेसाठी आणि महत्त्वाच्या योजनांसाठी केंद्राकडे भूमिका मांडणे हे आमचे कर्तव्यच आहे. महाराष्ट्रातील कांदा आणि ऊस उत्पादकांचे प्रश्न असोत किंवा जलजीवन मिशनचे प्रलंबित प्रकल्प असोत, राज्याचे रखडलेले विषय मार्गी लावण्यासाठी आम्ही केंद्राकडे जाणार नाही तर कोणाकडे जाणार? जनतेच्या हितासाठी केंद्राशी संवाद साधण्यात आम्हाला कोणताही कमीपणा वाटत नाही. आधीच्या सरकारला केंद्राशी बोलणे किंवा मदत मागणे कमीपणाचे वाटत असेल, पण आम्ही तशी भूमिका नाही. पान ५ वर

# नागपूरमध्ये २४ तासांत उष्णतेमुळे १० जणांचा मृत्यू झाल्याचा संशय

■ नागपूर

**विदर्भात** मे महिन्याच्या अखेरीस उष्णतेची तीव्रता आणखी वाढली असून नागपूरमध्ये तापमानाने ४५.७ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला आहे. या उष्णतेमुळे नागपूरमध्ये गेल्या २४ तासांत १० जणांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

नागपूर रेल्वे स्थानकावर पाच जणांचा मृत्यू नोंदविण्यात आला. यामध्ये दोन भिकारी आणि तीन रेल्वे प्रवाशांचा समावेश आहे. चर्चापल्ली-अमृत भारत एक्स्प्रेसच्या जनरल डब्यातून प्रवास करणारे मुसरिका रॉनामा ( ६०), चेन्नई सेंट्रल-नवी दिल्ली तमिळनाडू एक्स्प्रेसमधील मेहरबान केवट (३४) आणि अहमदाबाद-हावडा एक्स्प्रेसच्या एस-२ कोचमधील एका प्रवाशाचा मृत्यू झाला. या तिन्ही प्रवाशांच्या मृत्यूसाठी इतर आजार कारणीभूत असल्याचे सांगितले जात असले तरी उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा संशयही व्यक्त केला जात आहे. याशिवाय प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर निजामुद्दीन-बंगळूरू राजधानी एक्स्प्रेसजवळ एका ४० वर्षीय अज्ञात व्यक्तीचा, तर प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर ७० वर्षीय अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला.

शहरातील विविध भागांतही उष्माघातामुळे पाच जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. सक्करदरा उड्डाणपुलाखाली एक ५० वर्षीय व्यक्ती मृतावस्थेत आढळली.

# खा. श्रीकांत शिंदे- आ. चिरवलीकरांची मध्यरात्री हॉटेलमध्ये तासभर गुप्त बैठक

■ नांदेड

**राज्यात** विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असतानाच नांदेडमध्ये झालेल्या एका गुप्त बैठकीमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे आणि अजित पवार गटाचे आमदार प्रताप पाटील-चिखलीकर यांच्यात मध्यरात्री एका हॉटेलमध्ये सुमारे तासभर चर्चा झाल्याची माहिती आहे.

या बैठकीनंतर महायुतीतील अंतर्गत समीकरणांबाबत नव्या चर्चांना सुरुवात झाली असून नांदेडच्या राजकारणात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

सध्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. जागावाटप, उमेदवारी आणि पक्षीय बलाबलावरून महायुतीतील पक्षांमध्ये जोरदार खलबते सुरू आहेत. या परिस्थितीत कल्याण-डोंबिवलीचे खासदार श्रीकांत शिंदे नांदेड दौऱ्यावर असताना आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी त्यांची हॉटेलमध्ये जाऊन तासभर भेट घेतल्याने या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या गुप्त चर्चेमुळे आगामी निवडणुकांमध्ये नवे राजकीय समीकरण तयार होणार का, याची चर्चा रंगू लागली आहे. नांदेड महापालिका निवडणुकीत अजित पवार गट आणि शिंदे गटाने एकत्र येत भाजपाविरोधात आघाडी केली होती.

# मध्य रेल्वेही कारवाई करणार १६ हजार झोपड्या तोडणार

■ मुंबई

**वांद्र्यातील** गरीब नगरमध्ये पश्चिम रेल्वेकडून करण्यात आलेल्या कारवाईनंतर आता मध्य रेल्वेनेही आपल्या हद्दीतील अतिक्रमण हटवण्याचा निर्णय घेतला आहे. मध्य रेल्वेच्या सुमारे पाच लाख चौरस मीटर जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. या जागांवर तब्बल १६ हजारांहून अधिक अनधिकृत झोपड्या व बांधकामे उभी राहिली आहेत. या पार्श्वभूमीवर अतिक्रमण हटवण्यासाठी मध्य रेल्वेने मोठी मोहीम हाती घेतली असून, काही ठिकाणी नोटिसा बजावण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

अतिक्रमणविरोधी मोहिमेसाठी रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ), स्थानिक प्रशासन आणि पोलिसांच्या मदतीने टप्प्याटप्प्याने कारवाई केली जाणार आहे. संवेदनशील आणि गर्दीच्या भागांमध्ये अतिरिक्त पोलीस बंदोबस्त ठेवण्याची तयारी केली आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील अनेक ठिकाणी रेल्वेच्या जागांवर अतिक्रमण झाले आहे. कुर्ला-ट्रॉम्बे भागात ५०,३५५ चौरस मीटर क्षेत्रावर ५,५९५ झोपड्या उभ्या आहेत.

# शिक्षकांना जुन्या पेन्शनसाठी कार्यवाहीचे आदेश! मुख्यमंत्री फडणवीसांची माहिती

■ मुंबई

**राज्यातील** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी संबंधित विभागाला कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले असून, येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात यासाठी निधीची तरतूद केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात शिक्षकांच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीत दिले.

अशोकराव माने शिक्षण समूहाचे अध्यक्ष विजयसिंह माने आणि शिक्षक नेते दादासाहेब लाड यांच्या पुढाकाराने ही बैठक पार पडली. यावेळी विविध प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान मागण्यांचे निवेदनही सादर करण्यात आले. दरम्यान, महिनाभरापूर्वी झालेल्या भेटीत या विषयावर सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले होते. त्यानुसार ही बैठक घेण्यात आली. २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या विनाअनुदानित, अंशतः अनुदानित आणि नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील सुमारे २६ हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी शिष्टमंडळाने केली आहे. इतर विभागांतील २००५ पूर्वी रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू असून, शिक्षक मात्र यापासून वंचित राहिल्याची बाब शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिली.

# गुजरात उत्तराखंडनंतर आसाममध्येही समान नागरी कायद्याला मंजुरी

■ गुवाहाटी

**दिवसभराच्या** चर्चेअंती आसामच्या विधानसभेत काल समान नागरी कायद्याला मंजुरी देण्यात आली. विरोधकांनी हे विधेयक छाननी समितीकडे पाठवण्याची मागणी केली होती.मात्र विरोधकांची मागणी धुडकावत मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्या सरकारने विधेयक मंजूर केले. याबरोबरच समान नागरी कायदा लागू करणारे गुजरात आणि उत्तराखंडनंतर आसाम हे देशातील तिसरे राज्य ठरले आहे.

समान नागरी कायदा विधेयकावरील चर्चेनंतर विरोधकांनी आक्रमक होत विधेयक विशेष छाननी समितीकडे पाठवण्याची जोरदार मागणी केली.विधानसभा अध्यक्ष रणजीत कुमार दास यांनी विरोधकांची मागणी फेटाळून लावत मुख्यमंत्री सरमा यांना विधेयक मंजुरीसाठी आवाजी मत घेण्याचे निर्देश दिले.त्याला विरोध करत विरोधक अध्यक्षांसमोरील मोकळ्या जागेत उतरून घोषणाबाजी करू लागले. या गदारोळातच विधेयकाला आवाजी मतांनी मंजुरी देण्यात आली. समान नागरी कायद्यात विवाह, घटस्फोट, वारसा हक्क आणि लिव्ह इन रिलेशनशिप यांसारख्या विषयांवर सर्व धर्मियांसाठी समान न्यायाची तरतूद आहे.

# हायकोर्टाने जामीन रद्द करताच सासू गिरीबाला सिंहला अटक

■ भोपाळ

ट्विशा शर्मा आत्महत्या

**ट्विशा** शर्मा आत्महत्याप्रकरणी ट्विशाची सासू निवृत्त न्यायाधीश गिरीबाला सिंह हिचा अटकपूर्व जामीन मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर सीबीआयची दोन पथके दुपारी गिरीबाला सिंहच्या निवासस्थानी दाखल झाली.सुमारे चार तास घराची झडती घेतल्यानंतर सीबीआयने गिरीबाला सिंहला अटक केली.

गिरीबाला सिंहला सत्र न्यायालयाने दिलेल्या अटकपूर्व जामिनाला ट्विशाच्या कुटुंबियांनी मध्य प्रदेश उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.या याचिकेवर सकाळी न्या.देवनारायण मिश्रा यांच्या न्यायासनासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी आरोपी गिरीबाला सिंहवर पोलिसांनी ठेवलेले आरोप, ट्विशाच्या कुटुंबियांनी ट्विशाचा पती व सासूवर केलेले आरोप आणि ट्विशाने मृत्यूपूर्वी आपल्या कुटुंबियांना पाठवलेल्या काही व्हॉट्सअ‍ॅप संदेशांमध्ये पती, सासूवर केलेल्या आरोपांची गांभीर्याने दखल घेत न्या.मिश्रा यांनी अतिरिक्त सत्र न्यायालयाने १५ मे रोजी आरोपीला दिलेला अटकपूर्व जामीन रद्द केला. न्यायालयाने अटकपूर्व जामीन रद्द केल्यानंतर काही वेळातच सीबीआयची २ पथके गिरीबालाच्या घरी दाखल झाली.तिच्या घराची सुमारे चार तास झडती घेतल्यानंतर सीबीआयने सायंकाळी तिला अटक केली.

# अकोल्यात पतसंस्थेत ८.९७ कोटींचा अपहार! आवारे पिता- पुत्राला अटक

■ अकोला

**अकोल्यातील** श्री गजानन नागरी सहकारी पतसंस्थेत तब्बल ८ कोटी ९७ लाख रुपयांच्या आर्थिक अपहाराचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने कारवाई करत पतसंस्थेचे अध्यक्ष नारायण आवारे आणि त्यांचे पुत्र मुख्य कार्यकारी अधिकारी नंदकिशोर आवारे यांना अटक केली आहे.या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून या पतसंस्थेत हजारो ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत.

या प्रकरणी डाबकी रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. गेल्या काही महिन्यांपासून या पतसंस्थेत मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारी समोर येत होत्या. ठेवीदारांनी वारंवार पैसे परत मागूनही संस्थेकडून प्रतिसाद मिळत नव्हता. मागील सहा महिन्यांपासून ठेवीदारांना परतावा देणे बंद करण्यात आले होते. यानंतर अनेक तक्रारी आणि प्राथमिक चौकशीच्या आधारे आर्थिक गुन्हे शाखेने तपास सुरू करून मोठी कारवाई केली. चौकशीत कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले. या पतसंस्थेत सुमारे अडीच हजार ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत.

# रिंग रोड प्रकल्पग्रस्तांचा संताप! नाशिक प्रांत अधिकारी पिंडदान

■ नाशिक

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित बाह्य रिंग रोड



प्रकल्पाला विरोध करणाऱ्या बाधित शेतकऱ्यांनी नाशिकचे प्रांत अधिकारी पवन दत्ता यांच्या विरोधात आंदोलन छेडले आहे. संतप्त शेतकऱ्यांनी रामकुंड परिसरात प्रांत अधिकाऱ्यांचे पिंडदान करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळेत हस्तक्षेप करत हा प्रकार रोखला.

नाशिकमध्ये २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार असून त्यासाठी शहराभोवती ६६ किलोमीटर लांबीचा बाह्य रिंग रोड उभारण्याची योजना आहे. या प्रकल्पासाठी जमिनी संपादित केल्या जाणार असल्याने बाधित शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. प्रशासनाच्या विरोधात निषेध नोंदवण्यासाठी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी प्रांत अधिकारी पवन दत्ता यांच्या प्रतीकात्मक पिंडदान कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आपल्या मागण्यांसाठी आणि जमिनी वाचवण्यासाठी शेतकरी गेल्या चार दिवसांपासून रामकुंड परिसरात आमरण उपोषण करत आहेत.

रिंग रोडसाठी जमिनीची मोजणी सुरू असताना प्रांत अधिकारी पवन दत्ता यांनी आंदोलक शेतकऱ्यांना मारहाण केल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन पवन दत्ता यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची लेखी मागणी केली आहे.

# एव्हरेस्ट सर केल्यानंतर हैदराबादच्या तंत्रज्ञाचा मृत्यू! मृतदेह पर्वतावरच

■ काठमांडू

हैदराबाद येथील तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक अरुण कुमार तिवारी (५३) यांनी जगातील सर्वोच्च माउंट एव्हरेस्ट शिखर यशस्वीपणे सर केले. मात्र परतीच्या प्रवासात हिलरी स्टेपजवळ त्यांचा मृत्यू झाला. 'डेथ झोन'मधून मृतदेह खाली आणणे अत्यंत धोकादायक आणि असल्याने तसेच धार्मिक श्रद्धेमुळे कुटुंबीयांनी त्यांचा मृतदेह एव्हरेस्टवरच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.



अरुण तिवारी यांनी गेल्या आठवड्यात यशस्वीपणे एव्हरेस्ट शिखर सर केले होते. मात्र, खाली उतरत असताना सुमारे ८,७९० मीटर उंचीवरील हिलरी स्टेपजवळ त्यांची प्रकृती अचानक बिघडली आणि ते कोसळले. त्यांना अतिरिक्त ऑक्सिजन देण्याचा प्रयत्न झाला. पण रक्ताच्या उलट्या सुरू झाल्यानंतर त्यांचा मृत्यू झाला.

मोहिमेचे आयोजक पायनियर अ‍ॅडव्हेंचर यांनी सांगितले की, ८ हजार मीटरपेक्षा जास्त उंचीवरील 'डेथ झोन'मधून मृतदेह बाहेर काढणे अत्यंत धोकादायक असते. यासाठी ८ ते १० शेर्पांच्या पथकाची गरज भासते आणि संपूर्ण मोहिमेला अनेक दिवस लागू शकतात.

कंपनीने मृतदेह खाली आणण्यासाठी सुरुवातीला सुमारे १.१ कोटी रुपयांचा खर्च सांगितला होता. नंतर तो कमी करून जवळपास ९० लाख रुपयांपर्यंत आणला. मात्र, कुटुंबीयांनी हा पर्याय नाकारला.

# जम्मूची इन्फ्लुएन्सर रोहिंशा शर्माचा आत्महत्येचा प्रयत्न! ५ जणांवर आरोप

**जम्मू येथील सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर रोहिंशा शर्मा हिने पाच जणांवर मानसिक छळाचा आरोप करत काल रात्री आत्महत्येचा प्रयत्न केला. सुदैवाने तिला वेळीच रुग्णालयात दाखल करण्यात आल्यामुळे तिचा जीव वाचला. सध्या ती जम्मू येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) रुग्णालयात उपचार घेत असून तिची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती आहे.**

■ श्रीनगर

**आत्महत्येच्या** प्रयत्नापूर्वी रोहिंशाने सोशल मीडियावर एक व्हिडिओ पोस्ट करत सतत होणाऱ्या छळाचा आणि मानसिक त्रासाचा आरोप केला होता. हा दबाव आता सहन होत नाही. मला काही झाले तर माझ्या कुटुंबाला त्रास देऊ नका, असे ती व्हिडिओमध्ये म्हणताना दिसते. या व्हिडिओमध्ये रोहिंशाने प्रशांत गुप्ता, प्रिक्षित गुप्ता आणि रिया यांच्यासह पाच जणांची नावे घेत त्यांच्यावर छळाचे गंभीर आरोप केले आहेत. तसेच जम्मू सायबर क्राईम विभागाचे पोलीस उपअधीक्षक रोहित यांच्यावरही सहभागाचा आरोप केला आहे. आपल्या वकिलाकडे सर्व पुरावे, एफआयआर आणि संबंधित कागदपत्रे असल्याचा दावा तिने केला आहे. रोहिंशाने आपल्या वक्तव्यात भारतात, विशेषतः एकट्या राहणाऱ्या घटस्फोटित महिलांना न्याय मिळणे कठीण असल्याची खंत व्यक्त केली. 'एखाद्या मुलीला तिच्या मृत्यूनंतरच न्याय मिळतो,' असे ती म्हणाली. पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित व्हिडिओतील आरोपांच्या आधारे तपास सुरू केला आहे.

# डिझेल नसल्याचे कारण देत गरोदर महिलेला रुग्णवाहिका नाकारली

■ हिंगोली

बाळाचा मृत्यू

हिंगोली जिल्ह्यातील जवळा बाजार प्राथमिक आरोग्य केंद्रात डिझेल नसल्याचे कारण देत प्रसूतीसाठी आलेल्या गरोदर महिलेला शासकीय रुग्णवाहिका नाकारण्यात आली. वेळेत उपचार न मिळाल्याने नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील नालेगाव येथील मनीषा इंगळे या गर्भवती महिलेला प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर जवळा बाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले होते. प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारासाठी हिंगोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्याचा सल्ला दिला. हिंगोलीला नेण्यासाठी रुग्णवाहिकेची आवश्यकता होती. त्यासाठी कुटुंबीयांनी १०८ आणि १०२ या शासकीय रुग्णवाहिका सेवांशी संपर्क साधला. मात्र, रुग्णवाहिकेत डिझेल नसल्यामुळे सेवा देता येणार नाही असे सांगण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. जवळपास दीड तास आम्ही रुग्णवाहिकेची वाट पाहत होतो. त्या वेळेत माझ्या मुलीला काही झाले असते तर त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल महिलेच्या आईने उपस्थित केला.